

• पुणे, मंगळवार, २९ ऑक्टोबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 318 • वर्ष ३ रे, अंक ३१८ • किंमत ₹ ६ • पाने : १०+२ = १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



## उमेदवाराच्या खर्चावर निवडणूक आयोगाचे लक्ष

# आलीशान वाहने प्रचारासाठी ठरणार डोकेदुखी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** निवडणुकीत उमेदवारांच्या प्रचारासाठी रिक्षा, रिक्षा साउंड सिस्टीमसह, दुचाकी, टेम्पो ट्रॅव्हलर, बस, स्कॉर्पिओ, लँड क्रूझर, इनोव्हा, मर्सिडीज आदींचे दर निश्चित केले आहेत. आलिशान वाहने घेऊन उमेदवार प्रचारात उतरल्यास निवडणूक आयोग नोंद घेत असलेल्या खर्चात चांगलीच वाढ होणार आहे. कारण मर्सिडीजचे २८ हजार रुपये, लँड क्रूझर २३ हजार ५०० रुपये, व्हॅनिटी व्हॅनला २५ हजार रुपये प्रचारासाठी दर निश्चित करण्यात आले आहेत. सोफा सेटला प्रतिदिन तीनशे तर व्हीआयपी सोफा सेटला प्रतिदिन बारा हजार रुपये मोजावे लागणार आहेत.

मतदान केंद्रांवरील उमेदवारांच्या पोलिंग एजंटसह मतमोजणीला उपस्थित राहणाऱ्या प्रतिनिधीला प्रती व्यक्ती दोनशे रुपयांचा दर उमेदवाराला द्यावा लागणार आहे. लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभेच्या निवडणुकीसाठी देखील उमेदवारांच्या प्रचारसाहित्यासह इतर आवश्यक गोष्टींचे दर निश्चित केले आहेत. निवडणूक शाखेने नियुक्त केलेल्या समितीने ही दरसूची तयार केली आहे. निवडणुकीच्या खर्चामध्ये आता चहा, कॉफी, पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, नारळ पाणी, पाण्याचा जार, थंड पेय यांचाही खर्च समाविष्ट आहे. शाकाहारी ८० तर मांसाहारी जेवणाच्या प्रति थाळीला २०० रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. पोहे, उपीटपासून केळी पर्यंतच्या दरासह दरसूचीमध्ये शहरातील नामांकित हॉटेलच्या सूटचा एका दिवसाचा दर देखील समाविष्ट केला आहे.



विधानसभा निवडणुक २०२४

### निवडणूक शाखेने निश्चित केलेले प्रतिदिनाचे दर

- ड्रोन कॅमेरा : दहा हजार रुपये
- क्रेन कॅमेरा : नऊ हजार रुपये
- दुचाकी : पाचशे रुपये
- एलईडी व्हॅन : आठ हजार रुपये
- व्हॅनिटी व्हॅन : २५ हजार रुपये
- ऑडी कार : १८ हजार ३०० रुपये
- इनोव्हा, झायलो : पाच हजार ८८८ रुपये
- इर्टिगा : पाच हजार १२५ रुपये
- ऑटो रिक्षा : १२५० रुपये
- ऑटो रिक्षा (साउंड सिस्टीमसह) : दोन हजार रुपये
- तीनचाकी सायकल : तीनशे रुपये

"लोकसभेप्रमाणे विधानसभेच्या निवडणुकीसाठी प्रत्येक वस्तूंसह कामांचे दर निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार उमेदवाराच्या खर्चामध्ये त्याचा समावेश केला आहे की नाही याची शहानिशा करण्यात येईल. नसल्यास आम्ही उमेदवाराच्या खर्चामध्ये समावेश करणार आहोत.

\- **सोनप्पा यमगर,** निवडणूक खर्चाचे व्यवस्थापन नोडल अधिकारी

## शहरात उन्हाच्या चटक्यात वाढ


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरात दुपारच्या तापमानात वाढ झाली असून, उन्हाचा तीव्र चटका बसत आहे. सोमवारी (दि. २८) शहरात कमाल तापमान ३४ अंश सेल्सिअस नोंदविले आहे. तर वडगावशेरी येथील तापमान ३६ अंश सेल्सिअसवर गेले आहे. दरम्यान, शहरात थंडीची चाहूल कायम असून, सकाळी धुके पडत आहे. शहरातील वातावरण निरभ्र झाले आहे. स्वच्छ सूर्यप्रकाश जमिनीवर येत असल्याने दुपारच्या कमाल तापमानात वाढ झाली आहे. रविवारी तापमानात वाढ झाल्याने दुपारी नागरिक घामाघूम झाले होते.

शनिवारी कमाल तापमान ३३.२ अंश सेल्सिअस इतके होते. त्यात रविवारी वाढ झाली. पुढील काही दिवस उन्हाचा चटका कायम राहणार आहे. शहरात थंड वारे वाहत असल्याने पहाटे गारठा पडत आहे. रविवारी शिवाजीनगरमध्ये १७.४ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली. २९ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान आकाश अंशतः ढगाळ राहून हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

## Selected

### अमृत महोत्सवात विद्यापीठ वाटणार 'चांदीची नाणी'



**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विद्यापीठाचे बोधचिन्ह असलेले ७५ ग्रॅमचे चांदीचे नाणे वाटण्यात येत आहे. एकीकडे आर्थिक अंदाजपत्रकात तूट दाखवली जात असताना दुसरीकडे चांदीचे नाणे देण्यात येत असल्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.

विद्यापीठाचे २०२३-२४ हे वर्ष अमृत महोत्सवी वर्ष होते. त्यानिमित्त लाखो रुपये खर्च करण्याचा घाट घालण्यात येत आहे. मागील काही वर्षांपासून विद्यापीठाची आर्थिक स्थिती अडचणीची झाल्याचे सांगितले जात असताना चांदीच्या नाण्यांवर खर्च करण्याची गरज काय, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

नाणे वाटण्याच्या मुद्द्यावरून अनेकदा अधिसभेत वाद झाला आहे, तरीही आता चांदीचे नाणे देण्यात येत आहे. विद्यापीठातून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सोन्याचे नाणे देण्याची पद्धत बऱ्याच वर्षांपासून आहे. आजवर या नाण्यांवर बराच खर्च करण्यात आला आहे.

अमृत महोत्सवी असूनही अनेक नियोजित कार्यक्रम निधीअभावी झाले नाहीत त्यामुळे हे वर्ष कोरडे गेल्यानंतर बहुतांश नियोजित कार्यक्रम आता ७६ व्या वर्षात ढकलले गेले आहेत. चांदीच्या नाण्यांचे वाटप हा त्यापैकीच एक उपक्रम होता.

### मार्जिनमनीच्या प्रश्नावरून रेशन दुकानदारांचे आंदोलन स्थगित



**पुणे :** रेशन दुकानदारांनी दि. १ नोव्हेंबरपासून धान्यवाटप बंद आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिवांशी झालेल्या चर्चेनंतर हे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले आहे. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर प्रलंबित मागण्यांबाबत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या मार्जिनमनीच्या प्रश्नावरून रेशनदुकानदारांनी संपाचा इशारा दिला होता.

दुकानदारांच्या न्याय व प्रलंबित मागण्यांसाठी दोन्ही राज्य संघटनेच्या वतीने १ नोव्हेंबरपासून राज्यातील सर्व ५६ हजार २०० रेशन दुकानदारांनी धान्य उचल बंद, धान्यवाटप बंद, दुकान बंद आंदोलन पुकारले होते.

याबाबत मुंबई येथे मंत्रालयात अन्य व नागरी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी महासंघाचे राज्य अध्यक्ष डी. एन. पाटील व फेडरेशनचे राज्य अध्यक्ष गणपत डोळसे, तसेच दोन्ही संघटनांबरोबर नुकतीच बैठक घेतली.

### चितळे बंधूंच्या मिठाई दुकानावर चोरट्यांचा डल्ला



**पुणे :** दिवाळी अगदी तोंडावर आल्याने मिठाईच्या दुकानांमध्ये होणारी गर्दी लक्षात घेऊन चोरट्याने औंध, बाणेर रोडवरील एका मिठाईच्या दुकानाला लक्ष्य केले. चितळे बंधू मिठाईवाले यांच्या दुकानाचे शटर उचकटून चोरट्याने दुकानातील १ लाख ४१ हजार रुपये आणि दोन चांदीचे शिक्के घेऊन पोबारा केला. रविवारी पहाटे ४:०० ते ५:००च्या सुमारास औंध - बाणेर रोडवरील दुकानात ही घटना घडली.

चितळे बंधू मिठाईवाले यांचे औंध-बाणेर रोडवरील दुकान रविवारी सकाळी उघडण्यासाठी कामगार आले. तेव्हा त्यांना शटर उचकटलेले दिसून आले. चोरट्याने शटर उचकटून आत प्रवेश केला. टेबलाचे ड्रॉव्हर उचकटून त्यातील १ लाख ४१ हजार रुपये आणि २५० ग्रॅमचे २ चांदीचे शिक्के चोरून नेले. सीसीटीव्हीमध्ये चोरटा कैद झाला असून, पहाटेच्या सुमारास ही चोरी झाली झाल्याची माहिती मिळाली.

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

### १२५० रुग्णांना 'दगडूशेठ' तर्फे श्रवणयंत्र वाटप

सामाजिक उपक्रम

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आणि सूर्योदय फाऊंडेशन मुंबई व ओएनजीसी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील १२५० ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना श्रवणयंत्र वाटप करण्यात आले. सदाशिव पेठेतील फडके हॉल पुणे येथे तीन दिवसीय शिबीराचे आयोजन करण्यात आले. राज्यासह पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यातून ज्येष्ठ नागरिक व मुले या शिबीराकरिता आली होती.यावेळी ट्रस्टचे विश्वस्त, मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शिबीरात ४५० ज्येष्ठ नागरिक व ८०० लहान मुलांना श्रवणयंत्र देण्यात आले. आजपर्यंत अनेक रुग्णांना यंत्राचे वाटप करण्यात आले आहे. केवळ पुण्यातच नाही, तर इतरही शहरात या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. यावरुनच समाजातील मोठी व्यथा समोर येत असल्याचे दिसून आले आहे. या शिबीरात बार्शी, सोलापूर, धाराशिव यांसह इंदापूर, बारामती, आंबेगाव, जुन्नर, मंचर, भोर, वेल्हा, पिंपरी-चिंचवड आदी भागातील ज्येष्ठ नागरिक व मुलांचा सहभाग होता.

ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, मुलांना ऐकायला येत नसेल तर ती केवळ ऐकू शकत नाहीत, असे नाही तर यामुळे अनेक मुले बोलायला देखील शिकत नाहीत. त्यामुळे याकडे लक्ष देऊन श्रवणयंत्र विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. लहान मुलांना ऐकायला येत नाही, हे पालकांना लवकर कळत नाही. त्यामुळे याविषयी जनजागृती करण्याकरिता हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जी मुले आर्थिकदृष्टया दुर्बळ आहेत, त्यांना विनामूल्य श्रवणयंत्र दिले जात आहे. तसेच ज्येष्ठांनाही मोफत यंत्र देण्यात आले.



## सन्मान गुणवंतांचा...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** सोमेश्वर फाऊंडेशन तर्फे गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना 'विनायक निम्हण गौरव शिष्यवृत्ती' वाटप करण्यात आले.

### आंधारातून उजेडाकडे घेऊन जाणारा उपक्रम

# गुणवंत विद्यार्थ्यांना 'विनायक निम्हण गौरव शिष्यवृत्ती'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "समाजात व्यक्ती गेल्यावर होर्डिंग लावली जातत, वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम घेतले जातत. बराचसा पैसा वेगवेगळ्या कारणाने खर्च केला जातो, मात्र निम्हण कुटुंबियांनी वेगळेपण जपत समाजातील गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन त्यांना आंधारातून उजेडाकडे घेऊन जाणारा उपक्रम राबविला आहे. माणसं आपलं दु:खं कुरवाळत बसतात पण आपल्या दु:खाबरोबर समाजाची जाणीव असणारी माणसं खूप कमी आहेत. म्हणून हा निम्हण कुटुंबियांचा वेगळेपणा आहे." असे मत प्राचार्य भाऊसाहेब जाधव यांनी व्यक्त केले.

दिवंगत आमदार विनायक निम्हण यांच्या द्वितीय स्मृति-दिनानिमित्त शनिवार (ता.२६) बालगंधर्व रंगमंदीर येथे सोमेश्वर फाऊंडेशन तर्फे गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना 'विनायकी', 'विनायक निम्हण गौरव शिष्यवृत्ती' वाटप कार्यक्रमात प्राचार्य जाधव बोलत होते. यावेळी पद्मभूषण शां.ब मुजूमदार, प्राचार्य भाऊसाहेब जाधव, प्राचार्य दिलीप ओक यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना 'शिष्यवृत्ती'चे वाटप करण्यात आले. पद्मभूषण शां.ब मुजूमदार म्हणाले, " मुलं हुशार असतात, प्रथमिक, माध्यमिक वर्गामध्ये पहिले, दूसरे, तीसरे असतात. पण दुर्दैवाने ते उच्च महाविद्यालयात जाऊ शकत नाहीत. ह्याचं कारण? त्यांना मिळालेला दारिद्र आणि गरिबीचा श्याप. तो लागू नये म्हणून, निम्हण यांनी हा प्रयोग चालू केला. भारतामध्ये व्यक्ती, राज्य देशाचा विकास व्हायचा असेल तर शिक्षणाला पर्याय नाही. यावेळी माजी महापौर दत्ता गायकवाड, माजी नगरसेविका स्वाती विनायक निम्हण, माजी उपमहापौर मुकारी अलगुडे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित मुरकुटे यांनी केले तर आभार उमेश वाघ यांनी मानले.

# वडगावशेरी निवडणुकीत गावकी-भावकीचे राजकारण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वडगाव शेरी मतदारसंघात महाविकास आघाडी, महायुतीतील अंतर्गत पक्षांचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्यातील अंतर्गत धुसफूस उफाळून येऊ लागलेली आहे. त्यामुळे कोणता झेंडा हाती घ्यायचा, कोणत्या उमेदवाराचे काम करायचे, कोणाला पाठिंबा द्यायचा याबाबत कार्यकर्ते, पदाधिकारी, माजी नगरसेवक यांच्यात संभ्रम असल्याचे चित्र आहे. वडगावशेरी विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत गावकी-भावकीचे राजकारण महत्त्वाचे ठरणार आहे. येथे महायुती विरुध्द महाविकास आघाडी असा सामना रंगणार असला, तरी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार मैदानात उतरले आहेत. तर, येथून भाजपचे माजी आमदार जगदीश मुळीक हे निवडणूक लढविण्यावर अद्यापही ठाम असल्याने मोठा तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे.त्यामुळे या मतदात संघातून गुलाल कोणाचा, याबाबत उत्सुकता निर्माण झालेली आहे.

या मतदारसंघात आतापर्यंत कोणत्याही एका राजकीय पक्षाचे सातत्याने वर्चस्व राहिलेली नाही. त्यात स्थित्यंतरे झालेली आहेत. या मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी सर्वच पक्षांकडून इच्छुकांचा अधिक भरणा आहे. तब्बल ४९ इच्छुकांनी उमेदवारांनी अर्ज नेले आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस-अजित पवार पक्षाकडून विद्यमान आमदार सुनील टिंगरे, तर राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाकडून बापुसाहेब पठारे यांना अधिकृतपणे उमेदवारी जाहीर झालेली आहे. भाजप, कॉंग्रेस या पक्षांच्या कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्या बैठकांचे सत्र जोर धरू लागलेले आहेत. या पक्षांच्या इच्छुकांकडूनही निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने इच्छा प्रदर्शित केली जात आहे.

लोकसभा निवडणुकीत वडगावशेरीतून मुरलीधर मोहोळ यांना मताधिक्य मिळवून देण्यात माजी आमदार जगदीश मुळीक यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. त्यामुळे या मतदार संघातून निवडणुकीत उमेदवार देण्यासाठी भाजपचे कार्यकर्ते, पदाधिकारी आग्रही आहेत. मुळीक यांनी निवडणूक लढविण्यासाठी जोरदार तयारीही ठेवली असून, ते निवडणूक लढवण्यावर ठामच आहेत.मात्र, भाजप नेत्यांकडून जो आदेश देईल त्याचे पालन मुळीक यांना करावे लागणार आहे. मुळीक हे भाजपचे निष्ठावंत असल्याने ते भाजप सोडून अन्य कोणत्याही पक्षाकडून निवडणूक लढविण्याचा कधीही विचार करणार नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

वडगावशेरीत मनसेचे सुमारे २५ हजारांच्या आसपास मतांचे "पॉकेट' आहे. पक्षाकडून काही जण इच्छुकदेखील आहेत. मात्र, पक्षाकडून तसा निर्णय आलेला नाही. त्यामुळे मनसेही कोणत्या उमेदवाराला पाठिंबा देणार, असा प्रश्नही उपस्थित होऊ लागलेला आहे. महायुतीने जागा वाटपात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) ला राज्यात एकही जागा दिलेली नाही. रामदास आठवले यांच्या आदेशाची कार्यकर्त्यांना प्रतीक्षाही लागलेली आहे. या मतदारसंघात बसपा, राष्ट्रीय समाज पक्ष आणि अन्य राजकीय पक्षांकडूनही उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहणार आहेत.

# दिवाळीची सुरुवात होणार पावसाने?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिवाळीची सुरुवात पावसानेच होणार आहे. ओडिशा राज्यात तयार झालेल्या तीव्र कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यातील वातावरणात पुन्हा वेगाने बदल होत आहे. कमी झालेला पाऊस वाढणार असल्याचा नवा अंदाज पुणे हवामान विभागाने रविवारी जाहीर केला. राज्यातील २१ जिल्ह्यांना २९ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान मुसळधारेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

बंगालच्या उपसागरात येऊन गेलेल्या दाना चक्रीवादळामुळे वातावरणात खूप वेगाने बदल होत आहेत. त्यामुळे हवामान विभागाचेही अलर्ट सारखे बदलून नव्याने जाहीर केले जात आहेत. शनिवारी हवामान विभागाने २७ ते २९ पर्यंत हलक्या पावसाचा अंदाज जाहीर केला होता. मात्र रविवारी ओडिशा किनारपट्टीवर कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने क्षीण झालेले पावसाचे अलर्ट पुन्हा तीव्र झाले. त्यामुळे आता राज्यातील २१ जिल्ह्यांना २९ ते ३१ ऑक्टोबर या दिवाळीच्या तीन दिवसांत मुसळधार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. या कालावधीत २० ते ३० मी.मी. पावसाचा अंदाज आहे.

## निवडणूक आयोगाने केले सी-व्हिजिल ॲप विकसित

# ११ आचारसंहिता भंगाच्या तक्रारींची दखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार, नागरिकांना थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाने सी-व्हिजिल ॲप विकसित केलेले आहे. या ॲपवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या




अनुषंगाने जिल्ह्यात सी-व्हिजिल ॲपवर आदर्श आचारसंहिता भंगाच्या ३३३ तक्रारीवर कार्यवाही करण्यात आली आहे. त्यापैकी ३०१ तक्रारींवर पहिल्या १०० मिनिटांत कार्यवाही करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली.

या ॲपवर जिल्ह्यात नागरिकांकडून ३५३ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी ३३३ तक्रारींवर कार्यवाही करण्यात आली आहे. तर त्यापैकी आंबेगाव मतदार संघात ५ तक्रारी, बारामती १२, भोसरी १, चिंचवड ६, दौंड ४, हडपसर ३, इंदापूर १, जुन्नर ३, कसबा पेठ २८,

खडकवासला ५, मावळ ६, पर्वती ६१, पिंपरी २, पुणे कॅन्टोन्मेंट २०, शिवाजीनगर ७ आणि वडगाव शेरी मतदार संघात १३७ अशा ३०१ तक्रारींवर पहिल्या शंभर मिनिटांत कार्यवाही करण्यात आली आहे.

### सविस्तर माहिती पोस्ट करणे आवश्यक

- सी व्हिजिल ॲप अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशील, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओ अपलोड करणे आवश्यक आहे. या ॲपवर तक्रार दाखल करणाऱ्या तक्रारदाराची ओळख गुप्त राखण्यात येते, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

#रा

• पुणे, मंगळवार, २९ ऑक्टोबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 318 • वर्ष ३ रे, अंक ३१८ • किंमत ₹ ६ • पाने : १० + २ = १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



आता विद्यापीठाचे उपकेंद्र दुबईतही P8




दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी लक्ष्मण भारतीय संघाचे कोच P10

## अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस : अनेक मल्ल विधानसभेच्या आखाड्यात

# बंडोबांची बंडखोरी... निष्ठेला तिलांजली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या राज्यात विधानसभेचे वारे मोठे वहात असताना दुसरीकडे मात्र पक्षातून तिकीट न मिळाल्याने नाराज बंडोबांनी बंडखोरी करत अर्ज भरण्याच्या पुर्व संध्येला काही नेत्यांनी मोठे शक्तीप्रदर्शन करत आपली उमेदवारी अर्ज भरला आहे. पुण्यात काँग्रेस पक्षाकडून शिवाजीनगर मतदार संघातून मनिष आनंद( अपक्ष), पर्वतीमधून आबा बागुल (अपक्ष), कसब्यातून कमल व्यवहारे (स्वराज्य पक्ष), मुक्तार शेख तर पिंपरी चिंचवड मधून नाना काटे (अपक्ष), भाऊसाहेब भोईर (अपक्ष) उमेदवारी दाखल केली आहे. त्यामुळे एकेकाळी पक्षाचे कट्टर कार्यकर्ते म्हणून ओळख असणारे नेते आज दुसऱ्या पक्षातून अथवा अपक्ष निवडणूक लढवित तत्वाला तिलांजली देत असल्याचे बोलले जात आहे.



विधानसभेच्या निवडणुकीत उमेदवारी मिळवण्यापासूनच जोरदार चुरस निर्माण झाली असल्याने महायुती आणि महाविकास आघाडीसमोर बंडखोरी रोखण्याचे मोठे आव्हान आहे. दोन्ही राजकीय गटांमध्ये प्रत्येकी तीन पक्ष आहेत आणि या तीन पक्षांमध्ये किमान दोन जण बंडखोरी करताना दिसत आहे.

कसब्यातून धंगेकर यांना महाविआकडून काँग्रेसकडून तिकीट मिळाले आहे. परंतु नाराज झालेल्या काही नेत्यांनी सावध भुमिका घेत आपला अपक्ष उमेदवारीचा अर्ज भरला आहे. यामध्ये प्रमुख नेत्यांना नाराज नेते व कार्यकर्त्यांची नाराजीच दुर करता करता अक्षरशः दमछाक होताना दिसत आहे.

आज जरी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असला तरी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत कोण आपला अर्ज ठेवणार आहे? हे पाहणे ओत्सुकाचे राहणार आहे.

आज अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे नाराज नेत्यांमुळे पुन्हा बंडखोरी उसळणार आहे. काही नेत्यांनी उघड बंडखोरी केलेली नसली तरी पुढील राजकारणात आपल्याला अडचण येऊ नये म्हणून पक्षाच्याच अधिकृत उमेदवाराचा पराभव कसा होईल याचे नियोजन ते पक्के करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होणार आहे. आत्ताच काही नेते त्या पद्धतीने काम करू लागले आहेत.

विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी काँग्रेसकडून इच्छुक असलेल्या पर्वती विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आबा बागुल यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्ष आणि अपक्ष असे तीन अर्ज दाखल केले आहेत.

जिल्ह्यातील सर्वच मतदारसंघांमध्ये हे चित्र आहे. जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात सर्वच पक्षात प्रस्थापित नेत्यांची संख्या प्रचंड प्रमाणावर आहे. अखंड राष्ट्रवादी काँग्रेस असताना ज्येष्ठ नेते खा. शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोन नेत्यांच्या लगत अशा नेत्यांची मांदियाळी झाली, या दोन्ही नेत्यांनी तालुका- तालुक्यात एक-दोन सुभेदार तयार केले आहेत, पक्ष फुटीनंतर आपापल्या गटात हे नेते आता त्यांना डोईजड झाले आहेत.

आपल्याशिवाय दोन्ही पवारांचे घोडे अडणार अशा समजुतीने ते उमेदवारीसाठी भांडू लागले आहेत, काही ठिकाणी या दोन्ही नेत्यांच्या गटातून पलटी मारून उमेदवारी खेचण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भाजपमध्येही राज्यातील सध्याच्या अडीच वर्षांच्या तसेचं पूर्वीच्या पाच वर्षांच्या सत्तेच्या उबेने काही नेते गलगठ्ठ झाल्याचे दिसून येत आहे.

## दोन एसटी-बसची समोरा-समोर धडक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दौंड :** पुणे सोलापुर राष्ट्रीय महामार्गावर वरवंड (ता.दौंड) येथे दोन एसटी बस गाडयांची समोरा समोर धडक होवून भीषण अपघात झाला. यामध्ये एक महीला मयत तर गंभीर व किरकोळ असे तब्बल ६९ प्रवासी जखमी झाले.सोमवारी सव्वा एक वाजता हा अपघात झाला. सुवर्णा होले रा.पाटस ता.दौंड जि.पुणे असे मयत झालेल्या महीलेचे नाव आहे. दोन्ही एसटीत रक्ताचा पडलेला सडा,अडकलेले प्रवासी,रडण्या-ओरडण्याचा आवाज या भयानक दृष्याने नागरीकांचे अक्षरशः काळीज पिळवटुन गेले. यावेळी तत्काळ उपस्थीत झालेल्या तब्बल १० ते १२ रुग्णवाहीकेतून जखमींना उपचारासाठी तालुक्यातील काही दवाखान्यात दाखल करण्यात आले. सध्या दिवाळीच्या सुटयांमुळे महामार्गावर वाहनांची वर्दळ वाढली आहे. सोमवार दोन एसटी वाहनांच्या अपघातात हादरुन गेला. महामार्गाने जामखेड-पुणे ही एसटी (एमएच११बीएल९४११) जामखेडहून पुण्याकडे जात होती.

## मुख्यमंत्र्यांविरोधात हेम्ब्रोमांना उमेदवारी

**रांची :** झारखंड विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने आपली दुसरी यादी जाहीर केली आहे. या यादीत मुख्यमंत्री आणि झारखंड मुक्ती मोर्चा (जेएमएम)चे नेते हेमंत सोरेन यांच्या विरोधात बऱ्हेत मतदारसंघातून गमलियाल हेम्ब्रोम यांना उमेदवारी देण्यात आली आहे. हेम्ब्रोम यांनी २०१९ मध्ये 'एजेएसयू' पक्षाच्या तिकिटावर बऱ्हेतमधून निवडणूक लढवली होती.

## बॉम्बची धमकी बंगळूर-अयोध्या विमानाचे लँडिंग

**बंगलुर :** - विमानात बॉम्ब असल्याच्या धमकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी बंगळूर-अयोध्या विमानाचे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. बंगळूरहून अयोध्येला जाणाऱ्या आकाश एअरलाइन्सच्या विमानाचे अयोध्येच्या वाल्मीकी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले.

# भाजपची तिसरी यादी जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची २५ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. यामध्ये देखील अनेक विद्यमान आमदारांना त्याच मतदारसंघातून पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. यामध्ये माळशिरसमधून राम सातपुते यांना तर लातूरमधून अर्चना चाकूरकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तसेच बीड जिल्ह्यातील आष्टीमधून उमेदवारी देण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारांची तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत २५ उमेदवारांनासंधी देण्यात आलीआहे. भाजपने तिसऱ्या यादीसहआतापर्यंत १४६ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. तिसऱ्या यादीत विदर्भातील बहुतांश जागांचा समावेश करण्यात आला आहे.

### २५ जणांची तिसरी यादी घोषित

- मुर्तिजापूर - हरिश पिंपळे
- कारंजा - सई डहाके
- तिवसा -राजेश वानखेडे
- मोर्शी - उमेश यावलकर
- आर्वी - सुमित वानखेडे
- काटोल - चरणसिंग ठाकूर
- सावनेर - आशिष देशमुख
- नागपूर मध्य - प्रवीण दटके
- नागपूर पश्चिम - सुधाकर कोहले
- नागपूर उत्तर - मिलिंद माने
- साकोली - अविनाश ब्राह्मणकर
- चंद्रपूर - किशोर जोरगेवार
- आर्णी - राज तोडसाम
- उमरखेड - किशन वानखेडे
- देगलूर - जितेश अंतापूरकर
- डहाणू - विनोद मेढा
- वसई - स्नेहा दुबे
- बोरीवली - संजय उपाध्याय
- वर्सोवा - भारती लव्हेकर
- घाटकोपर पूर्व- पराग शाह
- आष्टी - सुरेश धस
- लातूर शहर -अर्चना चाकूरकर
- माळशिरस - राम सातपुते
- कराड उत्तर - मनोज घोरपडे
- पलुस कडेगाव - संग्राम देशमुख

भाजपने या यादीत लोकसभेत पराभूत झालेल्या राम सातपुते यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास दाखवला असून त्यांना माळशिरमधून उमेदवारी देण्यात आली आहे. त्याचबरोबर तिसऱ्या यादीत बोरिवलीच् विद्यमान आमदार सुनिल राणे यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. त्यांच्याऐवजी संजय उपाध्याय यांना भाजपाने मैदानात उतरवले आहे.



## पुणेकरांचा जीव धोक्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या पुण्यामध्ये शिवाजीनगर ते स्वारगेट असा मेट्रोचा प्रवास सुखकर करण्यासाठी केंद्र सरकारने पुणेकरांच्या जीवावर उदार होऊन मेट्रो आणण्याचा प्रयत्न केला पण पुणेकरांचा प्रवास खरंच सुखाचा आहे का याचं सत्य उदाहरण काल प्रशांत कांबळे आम आदमी पार्टी शहराध्यक्ष सामाजिक न्याय विभाग यांनी पहिल्यांदाच मेट्रोने प्रवास केला 2 वाजून 38 मिनिटं वेळ होती मंडई ते स्वारगेट असा प्रवास होता या प्रवासादरम्यान स्वारगेटला अवघ्या » पान ७ वर

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीची सात उमेदवारांची चौथी यादी जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** विधानसभा निवडणूक २०२४ साठी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने चौथी उमेदवार यादी जाहीर केली आहे. त्यात ७ उमेदवारांचा समावेश आहे. काटोलमधून अनिल देशमुख यांच्या जागी त्यांचे चिरंजीव सलील देशमुख यांच्या नावावर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. तर, दौंडमध्ये रमेश थोरात यांना मैदानात उतरवण्यात आले आहे.

लोकसभेतील दणदणीत यशानंतर शरद पवार हे नव्या जोमानं विधानसभा निवडणुकीच्या रणमैदानात उतरले आहेत. महाविकास आघाडीचं जागावाटप करताना मित्रपक्षांशी

- माण - प्रभाकर घार्गे
- काटोल - सलील अनिल देशमुख
- खानापूर - वैभव सदाशिव पाटील
- वाई - अरुणादेवी पिसाळ
- दौंड - रमेश थोरात
- पुसद - शरद मैंद
- सिंदखेडा - संदीप बेडसे

कुठलाही वाद न घालता शरद पवार यांच्या पक्षानं महत्त्वाचे मतदारसंघ स्वत:कडं राखण्यात यश मिळवलं आहे. यातील बहुतेक मतदारसंघात त्यांच्या पक्षाचा अजित पवारांच्या उमेदवारांशी सामना होणार आहे.

» राजकीय

याआधी शरद पवारांच्या पक्षानं जवळपास ८५ जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. त्यानंतर आता आणखी ७ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे.

## भारतात जनगणनेची तयारी सुरू; आकडेवारी २०२६ मध्ये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** चार वर्षांच्या विलंबानंतर केंद्र सरकार २०२५ मध्ये जनगणना सुरू करणार आहे. जनगणनेची आकडेवारी २०२६ मध्ये प्रसिद्ध केली जाऊ शकते. साधारणपणे दर दहा वर्षांनी होणारी जनगणना २०२१ मध्ये होणार होती; परंतु कोरोना महामारीमुळे ती पुढे ढकलावी लागली. जनगणनेनंतर लोकसभेच्या जागांचे सीमांकन सुरू होईल आणि ही प्रक्रिया २०२८ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे.

आता जनगणनेच्या चक्रातही बदल अपेक्षित आहे. आता पुढील जनगणना २०३५ मध्ये होणार आहे. आत्तापर्यंत अस्तित्वात असलेल्या चक्रात, १९९१, २००१ आणि २०११ सारख्या दशकाच्या सुरुवातीस दर १० वर्षांनी जनगणना केली जात होती; मात्र आता २०२५ नंतर पुढील जनगणना २०३५, २०४५, २०५५ मध्ये होईल. पंथाबाबतही प्रश्न विचारले जातील.

### तृतीय पंथियांचाही विचार

• या जनगणनेदरम्यान भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच ट्रान्सजेंडर्सची संख्याही विचारात घेण्यात आली. उत्तर प्रदेश हे अंदाजे २० कोटी लोकसंख्येचे सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य आहे आणि ११ कोटींहून अधिक लोकसंख्येसह महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. सिक्कीम हे सर्वात कमी लोकसंख्येचे सहा लाख राज्य आहे.

काही राजकीय पक्षांनी जात जनगणनेची मागणी करूनही सध्या सरकारकडे जात जनगणनेला परवानगी देण्याची कोणतीही योजना नाही. जेव्हा जनगणना केली जाते, तेव्हा धर्म आणि वर्गाबद्दल प्रश्न विचारले » पान ७ वर

## पाटील - बालवडकर यांचे मनोमिलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काल अखेर चंद्रकांत पाटील आणि अमोल बालवडकर यांचे मनोमिलन झाले आहे. बालवडकर यांनी विधासभा निवडणुकीतून माघार घेतली असून ते चंद्रकांत पाटील यांना पाठिंबा देणार आहेत. कोथरूडमधून संधी न मिळाल्याने नाराज अमोल बालवडकर यांची काल चंद्रकांत पाटील यांनी भेट घेतली आणि पेढा भरवत त्यांची समजूत काढली व नाराजी दूर केली केली. पुण्यातील कोथरूड विधानसभा मतदारसंघात भाजपने चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. यानंतर पक्षातील काही इच्छुक नाराज असल्याचे सांगितले जात होते.यामध्ये अमोल बालवडकर यांचा देखील समावेश होता. विधानसभा उमेदवारी न मिळाल्यान बालवडकर यांनी वेगळी भूमिका घेत आपण » पान ७ वर

## मनोमिलन :

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे :** चंद्रकांत पाटील आणि अमोल बालवडकर यांचे मनोमिलन झाले आहे. बालवडकर यांनी विधासभा निवडणुकीतून माघार घेतली असून ते चंद्रकांत पाटील यांना पाठिंबा देणार आहेत. कोथरूडमधून संधी न मिळाल्याने नाराज अमोल बालवडकर यांची काल चंद्रकांत पाटील यांनी भेट घेतली आणि पेढा भरवत त्यांची समजूत काढली व नाराजी दूर केली केली.

## पाच दिवस कोसळला, आज मात्र तेजीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सलग पाच दिवसांच्या घसरणीनंतर सोमवारी भारतीय बाजारात तेजीची नोंद झाली. या सर्व परिस्थितीत विदेशी बाजारात विक्री सुरूच राहिली आणि कंपन्यांच्या तिमाही निकालांमध्ये घसरण दिसून आली. 'आयसीआयसीआय बँके'चे शेअर्स आजच्या वाढीमध्ये मुख्य भूमिका बजावत आहेत. त्यांचा सप्टेंबर तिमाहीचा नफा अपेक्षेपेक्षा चांगला आहे. सकाळी १०:४२ च्या सुमारास 'बीएसई सेन्सेक्स' ९०० अंक किंवा १.१६ टक्के वाढून ८०,२९५.२२ वर व्यापार करत होता, तर निफ्टी ५० १८३ अंकांनी किंवा १.०१ टक्क्यांवर २४,४२५.३० च्या सुमारास व्यवहार करत होता. 'बीएसई'वर सूचीबद्ध सर्व कंपन्यांचे मार्केट कॅप ५.०६ लाख कोटी रुपयांनी वाढून ४४२.०४ लाख कोटी रुपये झाले आहे.

## खासगी साखर उद्योगांचा थेट कारखाने बंद ठेवण्याचा इशारा

# यंदा ११० लाख टन साखर निर्मितीचे आव्हान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** यंदा १४ लाख हेक्टरवरील ऊस गाळप करीत ११० लाख टन साखर निर्मितीचे आव्हान उभे आहे. परंतु साखरेच्या 'एमएसपी'त आणि इथेनॉलच्या खरेदी दरात वाढ न केल्यामुळे यंदा धुराडी पेटवणेच साखर उद्योगाला अडचणीचे वाटते आहे. साखर व इथेनॉलचे दर वाढवून देण्यास केंद्र शासन टाळाटाळ करीत असल्याने संतप्त झालेल्या खासगी साखर उद्योगाने थेट कारखाने बंद ठेवण्याचा इशारा दिला आहे. राज्याचा गाळप हंगाम दोन आठवड्यांवर येऊन ठेपला आहे.



"केंद्रीय अन्न व नागरी पुरवठामंत्री प्रल्हाद जोशी, पेट्रोलियममंत्री हरजितसिंह पुरी यांच्याशी साखर उद्योगाने पत्रव्यवहार केला आहे. आम्हाला साखरेच्या 'एमएसपी'त प्रतिकिलो सात रुपये आणि इथेनॉलच्या खरेदी दरात प्रतिलिटर पाच ते सात रुपये दरवाढ हवी आहे. आमच्या मागण्यांकडे केंद्र दुर्लक्ष करते आहे. » पान ७ वर

> विस्मा "किमान साखर विक्री किंमत आणि इथेनॉलचे दर वाढविण्याची मागणी आम्ही वारंवार केंद्राकडे केली आहे. मात्र निर्णय घेतला जात नाही. त्यामुळे साखर उद्योगावर आर्थिक संकट आले आहे. यंदा कर्जाच्या बोजा वाढून अनेक साखर कारखाने बंद पडतील."- पी.जी. मेढे, साखर उद्योग अभ्यासक "साखर व इथेनॉल दरवाढीकडे केंद्राने दुर्लक्ष करणे दुर्दैवी आहे. यामुळे विस्माने घेतलेली भूमिका योग्य आहे. कारखाने भरमसाट कर्जे काढून उसाची बिले देत आहेत. दुसऱ्या बाजूला कामगारांचे पगार, व्यापाऱ्यांची बिले थकलेली आहेत. केंद्राने अजूनही जागे व्हावे व योग्य निर्णय घ्यावा. अन्यथा, शेतकरी व साखर उद्योग मोठ्या आर्थिक संकटात सापडतील.
>
> — बी.बी.ठोंबरे

#रा

## पुण्यात राहुल गांधी यांचा रोड-शो

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात जाहीर सभेऐवजी राहुल गांधी यांचा रोड शो होईल. त्याची तारीख लवकरच निश्चित केली जाईल, असे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी सांगितले. महाविकास आघाडीच्या पुण्यातील सर्व उमेदवारांसाठी हा रोड शो असेल असेही त्यांनी नमूद केले. पुण्यात प्रचारासाठी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा रोड शो होणार आहे. पुणे शहर काँग्रेस समितीकडून याबाबत विनंती पत्र पाठवण्यात आले होते. त्याला राहुल यांनी होकार कळवला आहे.

शिराळा मतदारसंघात भाजपने सत्यजीत देशमुख यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर नाराजी उफाळून आली आहे. इच्छुक सम्राट महाडिक » पान ७ वर

# यंदा ७१ कर्मचाऱ्यांनी पुणे महापालिकेतून दिला राजीनामा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एकीकडे पालिकेची नोकरी मिळवण्यासाठी बरेच तरुण धडपडत असतात. परंतु याच पालिकेत नोकरी मिळाल्यानंतर कामाचा ताण झाल्याने अनेकजण नोकरी सोडत आहेत. ही खूप मोठी शोकांतिका आहे.

यंदा ७१ कर्मचाऱ्यांनी पुणे महापालिकेतून राजीनामा दिला असून १३ कर्मचाऱ्यांनीही स्वत:च्या इच्छेने सेवानिवृत्ती घेऊन मुदतपूर्व नोकरी सोडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार नोकरी सोडणाऱ्यांमध्ये कनिष्ठ कर्मचाऱ्यांपासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांचा सहभाग आहे. नोकरी सोडण्यामागे कामाचा ताण, कामातील बदल, आरोग्य आणि मानसिक समस्या ही कारणे कर्मचाऱ्यांनी सांगितली आहे.

२०२२ मध्ये भरतीवरील बंदी उठल्यानंतर, १३५ कनिष्ठ अभियंत्यांची भरती करण्यात आली आणि सर्व विभागांमध्ये एकूण ४४८ विविध पदे भरण्यात आली. तसेच दोन टप्प्यातील भरतीमध्ये सुमारे ८०८ पदे भरण्यात आली होती, ज्यात लिपिक, कनिष्ठ अभियंता, अग्निशमन दलाचे सहायक अतिक्रमण विरोधी निरीक्षक, विभागीय वैद्यकीय अधिकारी आणि इतर दर्जाच्या कर्मचाऱ्यांचा समावेश होता. यातील अनेक कर्मचाऱ्यांनी चांगल्या नोकऱ्यांच्या शोधात राजीनामा दिला. » पान ७ वर

# कौटुंबिक लढती!

महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे यांच्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची पहिली ४५ उमेदवारांची यादी नुकतीच जाहीर करण्यात आली. यात विद्यमान आमदारांसह नवीन चेह–यांना संधी देण्यात आली आहे. यात सर्वाधिक चर्चेच्या बारामती मतदारसंघात अजित पवार विरुद्ध त्यांचा पुतण्या युगेंद्र पवार (शरद पवार गट) अशी लढत होणार आहे. काका विरुद्ध पुतण्या ही कौटुंबिक लढत लक्षवेधी ठरणार यात शंका नाही. विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर आणि मंगळवारपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाल्यापासून राज्यातील 'निवडणूक फिव्हर' खूपच वाढला आहे. ज्या राजकीय पक्षांनी आपले उमेदवार जाहीर केले आहेत ते पाहता एक गोष्ट प्रामुख्याने नजरेत भरते, ती म्हणजे एकाच घरात विविध पक्षांकडून उमेदवारी मिळालेले(मिळवलेले) उमेदवार आहेत. म्हणजे कुणीही जिंकला तरी सत्ता आपल्याच घरात नांदणार चित भी मेरी, पट भी मेरा! भाजपचे ज्येष्ठ नेते नारायण राणे खासदार आहेत. त्यांचा पुत्र नितेश राणेला भाजपने कणकवली मतदारसंघातून आमदारकीचे तिकिट दिले आहे. दुसरा पुत्र निलेश राणेसुद्धा उमेदवारीसाठी इच्छुक होता परंतु भाजपने त्याला नाकारले होते. त्यामुळे निलेशने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची वाट धरली आणि कुडाळ मतदारसंघातून उमेदवारी मिळवली. नारायण राणे स्वत: खासदार, त्यांच्या एका मुलाला उमेदवारी मिळाली तरीही दुस–या मुलाला उमेदवारी मिळावी हा अट्टाहास कशासाठी? नारायण राणे यांचे अनेक विश्वासू कार्यकर्ते आहेत. त्यापैकी एका कार्यकर्त्याला मोठे होण्याची संधी का नाकारण्यात आली? कार्यकर्ते केवळ नेत्यांचे आदेश पाळण्यासाठी आणि सतरंज्या उचलण्यासाठी आहेत काय? राजकीय पदे नेहमी आपल्याच घरात ठेवण्याचा अट्टाहास का? 'हे विश्वचि माझे घर' ऐवजी 'हे घरच माझे विश्व' ही प्रवृत्ती राजकीय नेत्यांमध्ये वरचेवर बळावत चालली आहे. माजी मंत्री गणेश नाईक यांना भाजपने ऐरोली मतदारसंघातून उमेदवारी दिली. त्यांचे पुत्र संदीप नाईक यांनाही उमेदवारी हवी होती परंतु ती देण्यास भाजपने असमर्थता दाखवली तेव्हा संदीप नाईक यांनी थेट शरद पवार गटात प्रवेश करत तुतारी हाती घेतली. म्हणजे एकाच कुटुंबात सत्ता कशी राहील हेच राजकीय घराण्यांकडून सातत्याने बघितले जाते. महाराष्ट्रातील नव्हे देशातील राजकारण केवळ काही घराण्यांपुरते सीमित असल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थात ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने सर्वसामान्य घरातील कार्यकर्त्यांना सरपंच, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष अशी पदे मिळत आहेत. मात्र, त्यांच्यासाठी अजूनही विधानसभा आणि लोकसभेची दारे उघडल्याचे दिसून येत नाही. खरे पाहता सत्ता ही सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली पाहिजे. वंचित समाज घटकातील नेते जेव्हा या देशाच्या सत्ताकारणाच्या पटलावर जातील तेव्हाच ते आपल्या शोषित–पीडित समाजाच्या वेदना जाणून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करतील. महाराष्ट्रात घराणेशाहीचे राजकारण सातत्याने सुरू आहे. काही दशकांपूर्वी म्हणजे १९६० ते ८०च्या दशकापर्यंत पक्षाकडून सर्वसामान्य आणि काम करणा–या कार्यकर्त्यांना उमेदवारी दिली जायची. मात्र, सर्वसामान्य कार्यकर्त्याला एकदा का संधी दिली की, तो देखील प्रस्थापित नेता बनू लागला आणि त्याचे पाय जमिनीवर राहिनासे झाले! याचे उदाहरण म्हणजे खासदार निलेश लंके! ते खासदार झाल्यानंतर पारनेर मतदारसंघात सर्वसामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी देण्याऐवजी त्यांच्या पत्नी राणीताई लंके यांना उमेदवारी देण्यात आली. यावरून सर्वसामान्य कार्यकर्त्याचा विचार केला जात नाही हेच खरे. जर सर्वसामान्य कार्यकर्त्याला संधी दिली तर तो आपल्याला धोबीपछाड मारेल अशी भीती या नेत्यांना वाटत असावी. त्यामुळे सर्व पदे आपल्या भोवतीच ठेवण्याचा या नेत्यांचा प्रयत्न असतो. विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर दलबदलूंचा, आयाराम–गयारामांचा सुळसुळाट सुरू झाला. ती प्रवृत्ती वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे एकदा राजकारणात प्रवेश केल्यानंतर आणि सत्तापदावर गेल्यानंतर त्या ठिकाणी कुटुंबशाही निर्माण करण्याची प्रवृत्ती! गत सात दशकांपासून हेच चालू आहे. भारतीय माणसाचे सरासरी आयुर्मान ७० वर्षांचे आहे परंतु राजकारणात ८० ते ९० ओलांडलेले नेतेही मोठ्या प्रमाणात आहेत. या नेत्यांची दुसरी–तिसरी पिढीही राजकारणात असून आपली कुटुंबशाही चालवते आहे. हे करताना कुटुंबशाहीमागचा मुख्य विचार म्हणजे सत्ता ही जातीबाहेर जाऊ नये आणि कुटुंबाबाहेरही जाऊ नये! कुटुंबशाहीला कोणताही पक्ष अपवाद नाही. सगळ्याच पक्षांमध्ये विद्यमान आमदार असताना आपल्याला तिकिट मिळत नसेल तर दुस–या पक्षात जाण्याची इच्छुकांची प्रवृत्ती वाढली आहे. आता ही प्रवृत्तीच लोकशाहीच्या मुळावर उठलेली दिसते. अमुक पक्षात घराणेशाही आहे, कुटुंबशाही आहे असे एकमेकावर आरोप–प्रत्यारोप केले जातात. पण ही 'शाही' आटोक्यात आणण्याचा, संपवण्याचा प्रयत्न कोणीच करताना दिसत नाही. आता हे काम मतदारांनाच करावे लागेल. असो. सध्या महाराष्ट्र दिल्लीपुढे झुकत चालला आहे अशी चर्चा आहे. त्याचे कारण म्हणजे महाराष्ट्राच्या उमेदवारांची यादी दिल्लीत अंतिम होते असे गत काही दिवसांत दिसून आले आहे. राज्यात महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांनी कितीही बैठका घेतल्या तरी दिल्लीतून अंतिम मंजुरी घ्यावी लागते. महायुतीची यादी अंतिम करावी यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्लीच्या किती वा–या केल्या याची गणना नाही. काँग्रेसची यादीही दिल्लीत बैठक झाल्यावरच निश्चित झाली. इतके सारे करूनही मविआ आणि महायुतीचे काही उमेदवार अजूनही जाहीर व्हायचेच आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख चार दिवसांवर आली असली तरी मविआ आणि महायुतीमधील अंतिम जागावाटप अजून झालेले नाही. काँग्रेसने आपली ४८ उमेदवारांची पहिली यादी गुरुवारी जाहीर केली. त्यात प्रस्थापितांवर भर देण्यात आला असून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, यशोमती ठाकूर, विश्वजीत कदम, नितीन राऊत, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे दोन्ही सुपुत्र अमित आणि धिरज देशमुख यांचा समावेश आहे.

**लेबनान आणि हमासविरोधातील इस्राईलचा संघर्ष तीव्र होताना दिसत आहे. त्यावरुन भविष्यात इस्राईल 'ग्रेटर इस्राईल'साठी द्विराष्ट्र नीतीच्या गाभ्यांला नख लावणार असे दिसते. हे युद्ध अनेक आघाड्यांवर सुरू आहे, आणि अतिशय गंभीर स्वरूप धारण केले आहे. इराणचा मित्रपक्ष हिजबुल्ला, सीरिया आणि इराकमधील मिलिशियाही यामध्ये उतरले आहेत. इस्राईल ज्या पद्धतीने युद्ध लढत आहे, त्यावरून त्यांना लष्करी बळाच्या माध्यमातून गाझामध्ये कहर करायचा आहे. पॅलेस्टिनींना बाहेर काढून 'एक राज्य' या तोडग्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करायची आहे. यासाठी इस्राईल गाझामध्ये विध्वंस घडवून आणण्याच्या तयारीत आहे.**

# इस्राईलचा गेम प्लॅन काय?

अलिकडच्या दिवसांत इस्राईलने लेबनॉन आणि गाझावर वाढविलेल्या हल्ल्यांची तीव्रता पाहता भविष्यात वास्तवातील द्विराष्ट्र नीतीच्या गाभ्याला नख लावत ग्रेटर इस्राईल स्थापन करण्याचा उद्देश तडीस नेण्याचा उद्देश दिसून येतो. अर्थात इस्राईल–पॅलेस्टाईनचा संघर्ष आणि १९४८ मध्ये इस्राईल देश स्थापनेच्या वेळी रोवली गेलेली अविश्वासाची पाळेमुळे अजूनही शाबूत होती. मात्र ७ ऑक्टोबर २०२३ मध्ये हमासने सीमेपलिकडे बॉम्बवर्षाव केला आणि त्यात १२०० जण मारले गेले आणि शेकडो नागरिकांना ओलीस ठेवण्यात आले. यानंतर युद्ध पेटले. प्रारंभी हे युद्ध हमास आणि इस्राईल यांच्यापुरतेच होते, परंतु आता त्याची व्याप्ती वाढली आहे. इराण देखील या युद्धात उतला आहे. इराणच्या आश्रयावर पोसलेली हिज्बुल्लाह, सीरिया आणि इराक येथील मिलिशिया देखील यामध्ये सहभागी झाले आहेत. परिणामी अनेक आघाड्यांवर युद्ध सुरू असून त्याने गंभीर वळण घेतले आहे.

गाझा भागात शतकातील सर्वात विध्वंस पाहवयास मिळत आहे. हजारो नागरिकांचा मृत्यू झाला आहे आणि त्यात सर्वाधिक संख्या मुलांची आहे. संयुक्त राष्ट्राचे अनेक कर्मचारी आणि पत्रकार यामध्ये मारले गेले आहेत. जमीन ताब्यात घेण्याच्या मोहिमेमुळे १९४८ मधील इस्राईलच्या निर्मितीनंतर आतापर्यंतचे सर्वाधिक स्थलांतर झाले आहे. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार पायदळी तुडविले जात असल्याची प्रकरणे समोर येत आहेत. या भागातील निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्या संकटात आहे. गाझा, लेबनॉन, सीरियात सातत्याने होणाऱ्या हवाई हल्ल्याने मालमत्तेची विपुल हानी होत आहे. इराणची आघाडी इस्राईलचे शहर आणि सैन्यांच्या ठिकाणांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले करत आहे.



युद्धाची बदलणारी दिशा – सुरुवातीला इराण हा प्रत्यक्षपणे न येता सहकाऱ्यांच्या आड इस्राईलविरोधात आघाडी उघडत होता. मात्र इस्राईलकडून सीरियातील इराणच्या वाणिज्य दुतावासावर हल्ला झाल्यानंतर दोन्ही बाजूंनी क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केले जात आहेत. या हल्ल्यात हमासचा नेता इस्माईल हानिया आणि हिज्बुल्लाचा म्होरक्या हसन नसरल्ला मारले गेले. दळणवळण साधनांच्या माध्यमातून स्फोट घडवून आणले आणि दोन्ही बाजूंनी सुरू झालेले युद्ध आता अनेक आघाड्यांवर लढले जात आहे. आता हे युद्ध शेजारील देश लेबनॉन, सीरिया अणि येमेनपर्यंत पोचले. त्यामुळे या भागात अस्थिरता निर्माण झाली आहे. संघर्ष कमी करण्याचे राजनैतिक प्रयत्न अपयशी ठरले आहेत. दोन्ही बाजू आपापल्या भूमिकेवर ठाम आहेत आणि कोणीही माघार घेण्यास तयार नाही. पश्चिम आशियात व्यापक प्रमाणात सत्तासंघर्ष पेटण्याची शंका उपस्थित केली जात आहे. अमेरिकेसारखा देश इस्राईलच्या मदतीसाठी आला आहे. त्याला सैन्यांसह शस्त्रपुरवठा केला जात आहे. शिवाय आर्थिक, राजनैतिक आणि संयुक्त राष्ट्र संघटनाही राजनैतिक पाठबळ देत आहेत. रशियाही या संकटात ओढला गेला आणि राजनैतिक, कुटनिती संबंध अधिकच गुंतागुंतीचे झाले. परिणामी शांतता आणि स्थैर्याला मोठा धोका निर्माण झाला आहे. सैन्याच्या बाजूने पाहिले तर इस्राईल हा इराण आणि त्याच्या सहकाऱ्याच्या तुलनेत सरस आहे. त्याच्याकडे उत्तम सैन्यदल असून सक्षम हवाई दल प्रणाली आहे. आर्थिक रुपाने खंबीर आहे. हेरगिरी यंत्रणा देखील सक्षम आहे अणि अमेरिकेकडून त्याला चांगले तंत्रज्ञान मिळत आहे. तुलनेने इराण आणि त्याचे सहकारी मागे आहेत. लोकसंख्येच्या आघाडीवर इराण चांगल्या स्थितीत असला तरी त्याचा फारसा पडणार नाही. कारण इराण आणि इस्राईलच्या भौगोलिक सीमा एकमेकांलगत नाहीत. म्हणूनच अन्य देशांना यात पडायचे नाहीये. पारंपरिक युद्ध इराणसाठी उपयुक्त नसले तरी नेतान्याहू यांचे राजकीय अस्तित्व आणि इस्राईलने बाळगलेल्या काही इच्छा पाहता ते पूर्ण करण्यासाठी हे युद्ध पुरेसे आहे.

इस्राईलची दीर्घकालीन रणनीती पाहिली तर इराण आणि त्यांच्या साथीदारांचा प्रभाव कमी करण्याचीच राहिली आहे. हा प्रभाव इस्राईलला अस्तित्वासाठी धोकादायक वाटतो. सामरिक शक्ती अणि गुप्तचराच्या मदतीने सैन्य मोहीम राबवत इस्राईल लक्ष्य भेदत आहे. ७ ऑक्टोबर २०२३ च्या हल्ला झाल्यानंतर नेतान्याहू यांनी भूमिका मांडली. ''इस्राईल हा हमासला संपूर्णपणे नेस्तनाबूत करू इच्छित आहे. गाझाकडून पुन्हा इस्राईलच्या नागरिकांवर हल्ले होणार नाहीत, याचा बंदोबस्त करू इच्छित आहे.'' इस्राईलच्या ओलिस नागरिकांची सुटका करण्याचे प्रयत्न देखील सुरू आहेत. त्यांच्या मते, हे लक्ष्य फक्त आणि फक्त

## मेजर जनरल डॉ. एस. बी. अस्थाना(नि.)

सैन्याच्या शक्तीवर साध्य करता येईल. म्हणूनच नेतान्याहू हे युद्ध आणखी काळ सुरू ठेवत राजकीय करियरचा ग्राफ वाढवू इच्छित आहेत.

सध्या नेतान्याहू यांची रणनीती पाहिली तर ते सैन्यदलाच्या बळावर गाझा पट्टीची चाळण करू इच्छित आहेत. अप्रत्यक्षरित्या गाझात कोणीही राहू नये, असेच त्यांचे मनसुबे दिसत आहेत. यासाठी पॅलेस्टाईनच्या नागरिकांना नाईलाजाने ही जागा सोडण्यास प्रवृत्त करु इच्छित आहेत. म्हणूनच स्वत:ची मानवी आणि वित्तहानी कमी ठेवत 'आयडीएफ'ने गाझा आणि लेबनॉनमध्ये प्रचंड उलथापालथ घडवून आणली. लपण्याच्या जागा वेचत इस्राईलच्या सैनिकांनी शेकडो इमारती जमीनदोस्त केल्या. हिज्बुल्ला मैदानात उतरल्याने इस्राईलला उत्तरेकडील भाग रिकामा करावा लागला. आता नेतान्याहू यांची रणनिती दक्षिण लेबनॉनला बफर झोन करण्याची आहे. ही योजना ते हल्ले घडवत अमलात आणण्याचा प्रयत्न करत आहेत. नेतान्याहू यांनी हिज्बुल्लाचे कंबरडे मोडण्याचा विडा उचलला असून भविष्यात उत्तर इस्राईलला कोणताही धोका राहणार नाही, यानुसार कारवाई करत आहेत. शिवाय त्यांचे नागरिक या ठिकाणी पुन्हा वास्तव्य करू शकतील, अशा रितीने नियोजन करत आहेत.

इस्राईलच्या गुप्तचर संघटनांनी त्यांना अनुरुप काम केले असले तरी सैन्य मोहिमेच्या मदतीने ओलीसांना सोडविण्यात त्यांना यश आले नाही. प्रत्यक्षात हेच त्यांचे प्रमुख ध्येय होते. आतापर्यंत जे काही ओलीस सुटले ते चर्चेच्या आधारावरच मायदेशी परतले. तेथे बंदुकीची गोळी फुसकी ठरली. एवढे होऊनही नेतान्याहू युद्ध रोखणाऱ्या चर्चेपासून पळ काढत आहेत. कारण त्यांना ही योजना राजकीय अस्तित्वासाठी संयुक्तिक वाटत नाही. जेव्हा जेव्हा बाह्य आणि अंतर्गत दबावातून चर्चेच्या माध्यमातून युद्ध थांबविण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी मोठ्या कुशलतेने त्याकडे दुर्लक्ष केले आणि बायडेन प्रशासनाला गरजेचे साहित्य आणि पाठबळ मिळवण्यासाठी तयार केले. त्यांनी अमेरिकेच्या हिटलिस्टमध्ये असलेल्या काही दहशतवाद्यांचा खात्मा करत अमेरिकेची मान्यता मिळवली. हमास अणि हिज्बुल्ला संघटनेचां पूर्णपणे सफाया शक्य नाही. कारण त्या विचारसरणींच्या आधारावर चालणाऱ्या संघटना आहेत. अमेरिका तालिबान आणि अल कायदाला २९ वर्षात नेस्तनाबूत करू शकले नाही तर आयडीएफ हमास आणि हिज्बुल्ला संघटनेचे नामोनिशाण कसे मिटवू शकेल ? मोसादचे मुख्यालय, इस्राईलच्या अनेक कट्टरपंथीयांवर आणि दोन हवाई तळावर इराणने क्षेपणास्त्र सोडल्यानंतर अमेरिका आता इराणच्या आण्विक ठिकाणांवर हल्ले करू इच्छित आहे. अर्थात हा जोखमीचा पर्याय आहे. कारण लक्ष्य भेदण्यात अपयश आले तर इराण तातडीने प्रत्युत्तर म्हणून आण्विक हल्ले करण्याचा पर्याय निवडू शकते आणि या गोष्टी एवढ्या वेगाने घडतील की त्याची कल्पना अमेरिका आणि इस्राईलने देखील केलेली नसेल. याप्रमाणे घडले तर त्याचे जगावर भयंकर परिणाम होईल. यामुळे भविष्यात पश्चिम आशियात अमेरिका आणि इस्राईलची स्थिती बिकट होईल. तेल सुविधांवर हल्ले केल्याने जागतिक आर्थिक आणि ऊर्जा क्षेत्रांवर व्यापक परिणाम होईल आणि प्रसंगी त्यांना जागतिक पातळीवर टीकेचा सामना करावा लागू शकतो. इस्राईल–इराण युद्धाची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे. मात्र उभय देश कितपत तग धरू शकतील यावर सर्वकाही अवलंबून असेल. युद्ध सुरू राहिले तर जागतिक पातळीवर महागाई वाढेल. लाल समुद्र अणि पारस खाडीत जलवाहतुक संकटात सापडेल. तेलाचा पुरवठा विस्कळीत झाल्याने आर्थिक आणीबाणी निर्माण होऊ शकते. भारतासाठी देखील ही स्थिती चिंताजनक राहू शकते. १२ यू २ आणि भारत मध्य पूर्व युरोप आर्थिक कॉरिडॉर (इंडिया–मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर) प्रकल्प थांबविण्याची वेळ येऊ शकेल. इराण–रशिया, चीन–उत्तर कोरिया आणि सीरिया एकत्र येऊन अमेरिका–इस्राईल आणि त्याच्या पश्चिम साथीदारांविरोधात एकजूट दाखवू शकतात. सर्वाधिक धास्ती तर इराणकडून आण्विक पर्याय वापरण्याची आहे.

**( लेखक प्रख्यात सामरीकतज्ज्ञ आहेत.)**

गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**मंगळवार, दिनांक २९ ऑक्टोबर २०२४**
अश्विन कृ. १२, उत्तरा फाल्गुनी, भौमप्रदोष. धनत्रयोदशी. धन्वंतरी जयंती, गुरू द्वादशी, यमदीपदान, श्री शके १९४६,विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू **नक्षत्र** : उत्तरा, योग : ऐंद्र, करण : गरज **सूर्योदय :** स.०६.१७
**सूर्यास्त :** सायं. ०५.३७ वा.
**राहू काळ :** दुपारी : ३:०० ते ४:३०

**दिनविशेष**

▶**१६१८:** भटका भुसंशोधक, इंग्लडचा राजदरबारातील मानकरी, लेखक सर वॉल्टर रॅले यांचा शिरच्छेद, इंग्लंडमध्ये सर्वप्रथम तंबाखू आणि बटाटा आणण्याचे श्रेय त्यांना दिले जाते. ▶**१६५६:** धूमकेतूसाठी प्रसिद्ध असलेल्या एडमंड हॅले या खगोलशास्त्रज्ञाचा जन्म. ▶**१८१४:** महाराष्ट्र ग्रंथोत्तोजक सभेची स्थापना. ▶**१९०१:** सायकल थांबविण्यासाठी ब्रेक शोधून काढणाऱ्या जे केंप स्टलिंगचे निधन. ▶**१९५८** : महर्षी धोंडो केशव कर्वे यांना 'भारतरत्न' पुरस्कार. ▶**१९९४:** माजी पंतप्रधान व जवाहरलाल नेहरु यांचे निकटचे सहकारी सरदार स्वर्णसिंग यांचे निधन. ▶**१९९६:** कल्पक्कम येथील स्वदेशात बनविलेली 'कामिनि' ही ३० मेगावॅट क्षमतेची अणुभट्टी कार्यान्वित. युरेनियम २३३ हे इंधन वापरणारे ही आशियातील पहिली अणूभट्टी. ▶**२००३:** संसदेवर केलेल्या हल्ल्याप्रकरणातून दिल्ली उच्च न्यायालयीन एस.ए.आर. गिलानी व अफसाना गुरु यांची निर्दोष मुक्तता केली.

**राशीभविष्य**

▲ **मेष** : सरकारी कामात यश. ▲ **वृषभ** : मजेत वेळ जाईल. ▲ **मिथुन** : अपेक्षित पत्रे हाती येतील. ▲ **कर्क** : नको त्या कामात वेळ जाईल. ▲ **सिंह** : विनाकारण खर्च कराल. ▲ **कन्या** : नवीन स्थळांना भेटी द्याल. ▲ **तुळ** : मतभेदात समेट होईल. ▲ **वृश्चिक** : उत्साह कमी होईल. ▲ **धनु** : कामात गुप्तता राखा. ▲ **मकर** : आनंदमय दिवस. ▲ **कुंभ** : अनपेक्षित लाभ. ▲ **मीन** : आरोग्य सांभाळा.

**चिंतन**

आयुष्यात सुख दु:ख कोणाला नसते? सगळ्यांनाच असते. सुखात आपण अगदी अनंदी असतो. निदान तसे भासवतो. पण हे खरे आहे का? याचा विचार करा. भास हा सत्य नसतो. ते एक प्रकारचे मृगजळच म्हणायला हवे. सुख दु:ख हे आयुष्यातले प्रसंग पचवून पुढे जायचे असेल तर शांतपणे विचार करायला हवा. पडत्या काळात माघार घ्यायला हवी. तीही विचारपूर्वक आणि पुढे झेप मारायची असले तर तीही विचारपूर्वक! सर्व गोष्टींचा स्थिर मनानेच विचार करायला हवा. तोही स्वत:चा स्वत:. विचार आणि प्राप्त परिस्थितीचा विचार करुनच हे ध्यानात घ्या.

**व्यक्तीविशेष**

## महर्षी धोंडो केशव कर्वे

'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित झालेले पहिले महाराष्ट्रीय व्यक्तिमत्त्व म्हणजे महर्षी धोंडो केशव कर्वे. दि. २९ ऑक्टोबर १९५८ रोजी त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला. भारतातील स्त्री शिक्षणाला व स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीला कारणीभूत झालेले हे व्यक्तिमत्त्व. त्यांनी स्वत: विधवेशी पुनर्विवाह करून आपण क्रियाशील समाजसुधारक आहोत, हे दाखवून देणाऱ्या महर्षी कर्वे यांनी विधवांच्या कल्याणासाठी एक संस्थाही उभारली. स्त्री शिक्षणासाठी त्यांनी हिंगणे येथे उभारलेल्या शाळेचेच पुढे भारतातील पहिल्या आणि एकमेव महिला विद्यापीठात रूपांतर झाले. सात्विक वृत्ती, चिकाटी, ध्येयनिष्ठा आणि धवल चरित्र्याच्या बळावर सामाजिक कामाचा डोंगर उभा केला. ग्रामशिक्षण आणि समता संघाचेही काम उभे केले. फर्ग्युसन महाविद्यालयात गणिताचे अध्यापन केलेला, सारे आयुष्य स्त्री शिक्षणासाठी घालविलेला हा समाजसेवक.

**बोधकथा**

## एकीचे बळ

एका माणसाचा कुक्कुट पालनाचा व्यवसाय होता. आपल्या कोंबड्यांची तो खूप मनापासून काळजी घेत असे. त्यांची अंडी विकण्याचा व्यवसाय तो करत होता. एकदा त्याच्या कोंबड्यांना कसल्याशा रोगाची लागण झाली. त्या आजारी पडू लागल्या. या कोंबड्यांना एका चांगल्या डॉक्टरांची गरज आहे असा तो विचार करू लागला.आपल्या बायकोशी यासंदर्भात तो बोलला. बायको म्हणाली, 'खरंच आपल्याला एक चांगला डॉक्टर शोधावाच लागेल. अन्यथा आपल्या कोंबड्यांचं काही खरं नाही.'' दोघांच हे बोलणं एक बोका दाराआडून ऐकत होता. त्यानं मनाशी विचार केला, ही चांगली संधी आहे कोंबड्यांना खतम करण्याची. आपण एक युक्ती करू या, डॉक्टरांचा वेष करून या कोंबड्यांच्या खुराड्यापाशी जाऊ. त्यांना सांगू, मी डॉक्टर आहे मला तुमच्या मालकांनी तुम्हाला तपासाण्यासाठी पाठवलं आहे. तेव्हा तुम्ही दार उघडा, आणि मला तपासू द्या.'' एकदा आत शिरलो की मस्त मेजवानी मिळेल, नाही का?' स्वत:च्या मनाशीच असा विचार करून बोका स्वत:वरच खूश झाला. दुसऱ्याच दिवशी मालक आणि त्याची बायको तालूक्याच्या गावी डॉक्टरांना बोलवायला गेले. बोक्यानं त्यांना जाताना पाहिलं आणि थोड्याच वेळात डॉक्टरांचा वेष घेऊन कोंबड्यांच्या खुराडापाशी गेला. पांढरा कोट, हातात बॅग घेऊन आलेला बोका कोंबड्यांनी पाहिला. (पूर्वार्ध)

**जिज्ञासा**

## हवेच्या दाबाचा सिद्धांत

गॅलिलिओने मांडलेला, निर्वात पोकळीत सर्व वस्तू एकाच वेगाने प्रवास करतात हा सिद्धांत बॉईल यांनी सप्रयोग सिद्ध करून दाखविला. इतकेच नव्हे तर निर्वात पोकळीत आवाज ऐकू येत नाही हे देखील प्रयोगाद्वारे दाखविले. आम्ल, क्षार आणि निष्क्रिय पदार्थ यामधील फरक त्यांनी प्रथमच स्पष्ट केला. १६९१ मध्ये त्यांनी 'द केप्टीकल केमेस्ट्री' या नावाने पुस्तक काढले. बॉईल यांनी प्रयोग प्रसिद्ध करण्यावर भर दिला, जेणेकरून कुठल्याही व्यक्तीला या प्रयोगाची सत्यता पडताळून पहाणे शक्य व्हावे. त्याकाळात शास्त्रज्ञ आपले प्रयोग गुप्त ठेवत असतं. त्यामुळे लोकांन ते समजत नसे. नंतर त्या शोधाच्या श्रेयावरुन वादंगही माजत असे. अशावेळी रॉबर्ट यांनी, संशोधकांनी आपले संशोधन गुपित न ठेवता सर्व तपशील खुले पणाने लवकरात लवकर पुढे आणावे, म्हणजे वाद निर्माण होणार नाही आणि नव्या उपलब्ध वैज्ञानिक माहितीच्या आधारे वैज्ञानिक संशोधक पावले पुढे टाकू शकतील असे आवाहन केले. या मोकळ्या देवाणघेवाणीमुळे विज्ञानातील शास्त्रीय प्रगतीला वेग मिळाला. त्याचा फायदा शास्त्रज्ञांबरोबर जगालाही झाला. हवेच्या दाबाच्या सिद्धांताबरोबरच त्यांच्या या खुल्या विचारांमुळे रॉबर्ट बॉईल यांचे नांव विज्ञान क्षेत्रात अजरामर झाले. (उत्तरार्ध)

**सामान्यज्ञान**

## उंदीर खाणारे झाड

ही वनस्पती केवळ किटकच नाही तर उंदरेही गिळंकृत करते. शास्त्रज्ञांनी या वनस्पतीचे नाव प्रसिद्ध नैसर्गिक इतिहास विशेषज्ञ सर डेव्हीड ॲटर्नबोरो यांच्या नावावरून ठेवले आहे. या वनस्पतीचा रंग लाल, वांगी आणि हिरवा असून त्याची रचना अशी आहे की उंदराएवढे जीव सहजपणे त्याच्यामध्ये जाऊ शकतील. सामान्य किटकभक्षी वनस्पतीपेक्षा आकाराने या अधिक मोठी आहे. फिलिपिन्सच्या पालावाल द्वीप येथील माऊंट व्हिक्टोरिया येथे ही वन्सपती सापडली आहे. (क्रमश:)

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक : ४८२**

| | | | |
|---|---|---|---|
| | 2 | 3 | |
| | 3 | | |
| | | | 1 |
| 2 | | 4 | |

**क्रमांक : ४८० चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 4 | 1 | 2 |
| 2 | 1 | 4 | 3 |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 4 | 3 | 2 | 1 |

**भूगोल**

## मॉन्सून वारे

विशाल भूखंड आणि त्यालगतचे समुद्र यांच्या तापमानामध्ये हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात होणाऱ्या फरकांमुळे प्रचलित वाऱ्यांच्या दिशांमध्ये व्युत्क्रमण होते. ऋतूंप्रमाणे उलटसुलट दिशांनी वाहणारे वारे निर्माण यास मॉन्सून वारे म्हणतात. विस्तीर्ण भूखंडीय भागावरील जलवायूमानावर या विशाल पवनव्यूहाचा प्रभाव पडत असतो. अरबी समुद्रावर हिवाळ्यात ईशान्येकडून आणि उन्हाळ्यात नैऋत्येकडून वाहणाऱ्या ऋतुकालिक वाऱ्यांना प्रथम अ रबांनी मॉन्सून हे नाव दिले. अरबी भाषेत मौसीम म्हणजे ऋतू. त्यावरून मॉन्सून हे नाव पडले. या वाऱ्यामुळे केवळ अरबी समुद्रावरीलच नव्हे तर लगतच्या आफ्रिकेच्या भागावरील व संपूर्ण दक्षिण आणि विशेषतः आग्नेय आशियाच्या विशाल क्षेत्रावरील पवनदिशांत आणि हवामानात ऋतूंप्रमाणे मूलभूत स्वरुपाचे बदल घडून येतात. पृथ्वीच्या वातावरणात उष्णतेचे फार मोठ्या प्रमाणावर परिवहन घडवणारी यंत्रणा म्हणजे मॉन्सून वारे होत.

**महिलायन**

## सौंदर्य प्रसाधनांची निगा

एखादे प्रसाधन कडक किंवा जास्त पातळ झाले असल्यास तेही टाकून द्यावे. एखादे प्रसाधन आहे त्या स्थितीत असेल पण त्याची मुदत संपली असेल तर ते वापरू नये. त्यामुळे त्वचा खराब होऊ शकते. लिपस्टीक ही बहुतेक महिला नियमितपणे वापरतात. कुठल्याही लिपस्टिकचा वापर जास्तीत जास्त एक वर्षांपर्यंत करावा. इतकेच नाही तर लिपपेन्सिलही वर्षाच्या आतच बदलावी. डोळ्यांना वापरण्यात येणारे आयशॅडो सहा ते १२ महिने वापरावे. अधिक काळ वापरायचे असल्यास आयशॅडो लावण्याचा ब्रश किंवा स्पंज अधूनमधून धुवावा.



मस्करादेखील सहा ते आठ महिनेच वापरावा. नंतर तो बदलावा. मस्कऱ्याचा ब्रश खाली पडू देऊ नये. कारण तो थेट डोळ्यांच्या संपर्कात येत असल्यामुळे जंतूसंसर्ग होण्याची शक्यता असते. पॅनकेक लावताना स्पंज ओला करायचा असतो. ते लावल्यानंतर स्पंज धुवून सुकू द्यावा आणि मगच डबीमध्ये ठेवावा. अन्यथा ओला स्पंज तसाच ठेवल्यास पुढच्या वेळी वापरताना स्पंजला खराब वास येतो. पाण्यामुळे स्पंज कुजू शकतो. तसेच लिपस्टीक, लिपग्लॉज, आयब्रो पेन्सिल, पॅन केकचे स्पंज यांसारख्या वस्तू प्रत्येकाच्या स्वतंत्र असाव्यात. कारण याद्वारे एकाचा संसर्ग दुसऱ्याला होण्याची शक्यता असते. तसेच स्वतःचा कंगवादेखील प्रत्येकाने स्वतंत्र ठेवावा. दोन–तीन दिवसाआड तो गरम पाण्याने धुवावा. म्हणजे केसांमध्ये संसर्ग होत नाही आणि कोंडा किंवा तत्सम तक्रारी निर्माण होऊ शकत नाही. (उत्तरार्ध)

**बालांगण**

## मृण्मय खडक

हा एक गाळाच्या खडकांचा गट आहे. वातावरण क्रियेद्वारे खडकांची झीज होऊ निर्माण होणाऱ्या सर्वात सूक्ष्म कणांपासून हे खडक बनतात. धूळ, चिखल, पंकाश्म, शैल ही मृण्मय खडकांची उदाहरणे असून हे सर्वात विपूलपणे आढळणारे गाळाचे खडक होत. मृत्तिका आणि चिखल यांमध्ये कमीजास्त प्रमाणात पाणी असते आणि खडक घट्ट होताना ते निघून जाते. अशा काही खडकांमध्ये थर निर्माण झालेले आढळतात. यांपैकी जे खडक स्तरणतलाला अनुसरून सहज फुटू शकतात. त्यांना शेल म्हणतात आणि थर असलेल्या व नसलेल्या इतर खडकांना पंकाश्म म्हणतात. (पूर्वार्ध)

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# विश्ववेध ३

## स्मार्टफोन वाढवतोय नैराश्य!



सध्याच्या धकाधकीच्या, असुरक्षिततेच्या जगात अनेक लोक नैराश्याच्या गर्तेत अडकत आहेत. नैराश्य आल्यानंतर अनेक जण स्मार्टफोनचा आणि समजमाध्यमांचा आधार घेतात. व्हॉट्झस्ॲप, फेसबुक यांच्या साहाय्याने मित्रांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतात, पण स्मार्टफोन तुमचे नैराश्य दूर करीत नाही, तर तो आणखी वाढवितो, असे एका संशोधनात दिसून आले आहे. विशेष म्हणजे भारतीय संशोधक व मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीच्या 'कॉलेज ऑफ कम्युनिकेशन आर्ट्स अँड सायन्सेस' या संस्थेचे अधिष्ठाता प्रभू डेव्हिड यांचाही या संशोधनात मोठा वाटा आहे.

लोक अलीकडे मानवी संवादाला इलेक्ट्रॉनिक यंत्रांच्या माध्यमातून संवाद साधून पर्याय निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, असा सार्वत्रिक अनुभव आहे, पण ते विश्व आभासी असते त्यातून मानवी पातळीवरील संवादातून मिळणारे समाधान मिळत नाही, असे या वैज्ञानिकांचे मत आहे. नकारात्मक भावनांचा सामना करण्यासाठी अनेक जण तात्पुरत्या विरंगुळ्यासाठी मोबाईल फोनचा वापर करतात आणि कालांतराने ते त्यावर विसंबून राहतात. आपण तंत्रज्ञानात कितीही प्रगती केली असली, तरी मानवी पातळीवरील संवादाला खूप महत्त्व आहे. मोबाईल फोन मानवी संवादाची नक्कल करू शकतो, ते सगळे जग खरे आहे, असे वाटू लागते पण ते आभासी व कृत्रिम असते. सेऊल येथील सॉँगँग विद्यापीठाचे जुंग युन किम यांनी सांगितले, की दोन व्यक्तींमधील संवादामुळे नकारात्मक भावनांपासून खरोखर थोडे संरक्षण मिळते, त्यामुळे मोबाईल फोनमुळे नैराश्यात होणारी वाढही कमी करते. मोबाईलच्या अतिआहारी जाण्यापेक्षा समोरासमोर संभाषणाची सवय करण्याची वेळ आता आली आहे. स्मार्टफोनच्या वापरामुळे एक तर वेळ कसा काढायचा ही समस्या सुटते आणि दुसरे म्हणजे नकारात्मक भावना कमी होतात, असे वापरकर्त्यांना वाटते, पण ते खरे नाही.डेव्हिड यांच्या मते मोबाईल फोनमुळे मानसिक समस्या सुटत नाहीत उलट वाढतात. गंमत किंवा करमणुकीसाठी काही वेळा लोक मोबाईलचा वापर करतात त्याचा मात्र खूप दुष्परिणाम होत नाही. कुटुंबातील व्यक्तींनी एकमेकांना मोबाईलच्या माध्यमातून म्हणजे व्हॉटस्ॲप, फेसबुक या मार्गांनी भेटण्यापेक्षा प्रत्यक्ष संवाद साधला पाहिजे. मित्रांशी, कुटुंबीयांशी संपर्काचे ते साधन आहे पण भेटणे अगदीच शक्य नसते, तेव्हा ते वापरणे ठीक आहे. अन्यथा मानवी संवादाची जागा जेव्हा आभासी जग घेऊ लागते, तेव्हा मानसिक समस्या आणखी प्रबळ होतात. 'कॉम्प्युटर्स इन ह्यूमन बिहेवियर' या नियतकालिकात हा शोधनिबंध प्रसिद्ध झालेला आहे.

## पेट्रामध्ये शोध डझनभर सांगाड्यांचा



सध्या जगातील सात आश्चर्यांपैकी एक असणाऱ्या जॉर्डनमधील पेट्रा येथे पुरातत्त्व संशोधकांना उत्खननात एक कबर आढळून आली. ही कबर जागतिक वारसास्थळ असणाऱ्या ट्रेजरी इमारतीच्या अल खजनेह इथं सापडली. तिथे १२ सांगाडेही आढळले आहेत. तसेच काही प्राचीन भांड्यांचे अवशेषही इथे आढळले. याचठिकाणी 'इंडियाना जोन्स अँड द लास्ट क्रुसेड' यासारख्या चित्रपटांचे शूटिंगही झाले होते.

पेट्रा हे एक प्राचीन शहर असून, वाळवंटातील दऱ्या-खोऱ्यांमध्ये खडकांवर हातांनी कोरीवकाम करून शहर वसवण्यात आल्याचे संदर्भ आढळतात. 'राकेमे' अशी या शहराची स्थानिकांमध्ये असणारी ओळख. व्यापाराच्या निमित्ताने स्थलांतर करणाऱ्या आणि नाबातियन अरब समुदायानं साधारण इसवीसन पूर्व पाचव्या शतकात हे शहर वसवल्याचं सांगितलं जातं. पेट्राच्या नजीकच्या भागात ९००० वर्षांपासून मानवी वावर आढळतो. याच पेट्रा शहराच्या पोटात नेमकं दडलंय काय, याविषयी संशोधन सुरू असतानाच अतिशय गूढरित्या दडलेली ही कबर समोर आली. इलेक्ट्रोमॅग्नेटिक कंडक्टिविटी आणि रिमोट स्कॅनिंग, ग्राऊंड पेनेट्रेटिंग रडारच्या माध्यमातून या कबरीमध्ये नेमकं काय आहे याची माहिती मिळवण्यात आली. ज्यावेळी कबरीची एकंदर संरचना पाहिली गेली तेव्हा इथं तातडीनं उत्खनन सुरू करण्यात आलं. स्कॉटलंडमधील सेंट एंड्र्यूज यूनिवर्सिटीतील जियोफिजिसिस्ट रिचर्ड बेट्स यांच्या मते, हे एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन असून, पेट्रा शहर कसं वसलं आणि नाबातियन कोण होते याची उकल होण्यास मदत होणार आहे. इथं एक सांगाडा मातीच्या भांड्याला पकडून असल्याचं दिसून आलं, तर कबरीच्या भिंती पहिल्या शतकाच्या मध्यापासून दुसऱ्या शतकादरम्यानच्या असल्याचं सांगितलं जात आहे.

## 'रामलीला'ची भारतबाह्य लोकप्रियता



प्राचीन काळातील बृहद्भारताच्या खुणा आजही आशियातील अनेक देशांमध्ये पाहायला मिळतात. त्यामध्ये आग्नेय आशियातील इंडोनेशिया, मलेशिया, कंबोडियासारख्या अनेक देशांचाही समावेश आहे. इंडोनेशियात जगातील सर्वात जास्त मुस्लिम लोक राहतात; मात्र याठिकाणी आजही रामायण लोकप्रिय असून बाली बेटावर तर आजही मूळ इंडोनेशियन हिंदू बहुसंख्य आहेत. नवरात्रीच्या काळात आपल्याकडे, विशेषतः उत्तर भारतात ठिकठिकाणी 'रामलीला' आयोजित केली जाते. विजयादशमी म्हणजेच दसऱ्याला रावणवधाने या रामलीलेची सांगता होते; मात्र इंडोनेशियात वर्षातून अनेक वेळा असे रामायणावर आधारित प्रयोग होत असतात. हे प्रयोग बॅले किंवा नृत्यनाटिकेच्या रूपात असतात व ते स्थानिक जनतेत आणि परदेशी पर्यटकांमध्येही लोकप्रिय आहेत.

या देशातील जावा आणि बालीमध्ये रामायण बॅलेचा अद्भुत अनुभव इथले लोक वर्षानुवर्षे घेत आहे. हे नृत्यनाट्य रामायणावर कथांवर आधारित ते संगीत, नृत्य आणि अभिनयाच्या माध्यमातून संवादाशिवायच सादर करण्यात येते. इंडोनेशियातील बालीमध्ये १० व्या शतकात एक हिंदू मंदिर बांधण्यात आले. यावेळी इथे रामायणावर आधारित नृत्यनाट्य सादर करण्यात आले. या कलात्मक प्रेरणांचा स्रोत हे वाल्मिकींनी लिहिलेले रामायण होते. आजही रामायण नृत्यनाट्याची परंपरा आशिया खंडातील देशांमध्ये दिसून येते. इंडोनेशियातील जावा आणि बालीमध्ये या नृत्यनाट्याला 'केंद्रातरी' रामायण या नावाने ओखळले जाते, तर थायलंडमध्ये याला 'रामकीन' नृत्य आणि कंबोडियामध्ये त्याला 'रेमकर' नृत्य असे म्हटले जाते. विशेष म्हणजे इंडोनेशियामध्ये सादर केलेल्या या रामायण नृत्यनाट्याला २०१२ मध्ये गिनिज बुकने जगातील सर्वात रंगवलेले नृत्यनाट्य म्हणून नामांकन दिले आहे.

## मन जाणून घेणारी आज्ञावली



एखाद्याने आपल्या मनातली गोष्ट ओळखली तर आपण त्याला मनकवडा म्हणतो खरे, पण तो केवळ योगायोग असतो. एखाद्या व्यक्तीच्या मेंदूतून आलेले संदेश गोळा करून त्यांचे विश्लेषण करून लोकांचे विचार जाणून घेण्याचा प्रयोग वैज्ञानिकांनी यशस्वी केलेला असून, त्यात एका भारतीय वैज्ञानिकाचा समावेश आहे. या प्रयोगात माणसाच्या मनातील विचार ओळखण्यात ९६ टक्के यश आले आहे. माणसाचे मन म्हणजे त्याचे विचार सांगणारी आज्ञावली तयार करण्यात आली आहे. वॉशिंग्टन विद्यापीठातील मेंदूवैज्ञानिक राजेश राव यांनी सांगितले की, मानवी मेंदूला वस्तूंचे आकलन कसे होते व दुसरे म्हणजे एखादी व्यक्ती वास्तवात काय विचार करीत आहे हे संगणकाद्वारे कसे सांगता येईल हे आमचे दोन उद्देश होते. वैद्यकीयदृष्ट्या तुम्ही आमचे निष्कर्ष हे सकारात्मक कारणासाठी वापरू शकता. जे लोक विकलांग आहेत त्यांना मेंदूचे संदेश अवयवांपर्यंत न पोहोचल्याने हालचाली करता येत नाहीत. ही अडचण आमच्या संशोधनातून दूर होऊ शकते. फेफरे किंवा अपस्माराचा विकार असलेल्या सात रुग्णांवर अमेरिकेतील हाबरेव्ह्यू मेडिकल सेंटर येथे प्रयोग करण्यात आला. त्यात प्रत्येकाला अपस्माराचे झटके येत होते. यामुळे त्यांच्यावर शस्त्रक्रिया झालेल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या मेंदूतील कुंभखंड म्हणजे टेम्पोरल लोबमध्ये इलेक्ट्रोड बसवण्यात आले, असे विद्यापीठाचे मेंदू शल्यक्रियातज्ज्ञ जेफ ओजेमन यांनी सांगितले.

यात आज्ञावलीने मानवी मेंदूतील संदेशाचे दर सेकंदाला १००० वेळा विश्लेषण करण्यात आले. आता या आज्ञावलीने इलेक्ट्रोडचे ठिकाण व संदेश यांचीही सांगड घातली. त्या व्यक्तीने प्रत्यक्ष काय पाहिले हे सांगता आले. लोकांच्या प्रतिसादावर आधारित दोन तृतीयांश प्रतिमांवर त्यांना काय विचार आले असतील याचा शोध मेंदूतील संदेशातून घेण्यात आला. एक तृतीयांश प्रतिमा या लोकांना माहिती नसताना त्यांनी त्या वीस मिलिसेकंदात ९६ टक्के अचूकतेने ओळखल्या. हे तंत्र ब्रेन मॅपिंगसाठी वापरता येईल व कुठल्या माहितीवर मेंदूतून काय प्रतिसाद येतो हे कळू शकेल, असे राव यांचे म्हणणे आहे. 'प्लॉस काम्प्युटेशनल बायॉलॉजी' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे.

## सर्वात छोटा साप



जगात विषारी आणि बिनविषारी प्रजातीचे अनेक साप पाहायला मिळत असतात. किंग कोब्रा हा जगातील सर्वाधिक लांबीचा विषारी सर्प आहे. ॲनाकोंडा, अजगरासारखे साप बिनविषारी असतात, पण अतिशय मोठ्या आकाराचे असतात. जगाच्या पाठीवर एक अतिशय चिमुकला सापही पाहायला मिळतो. त्याला पाहिले की आपण एखाद्या गांडुळाला पाहतो आहे की काय असे कुणालाही वाटावे, इतका त्याचा लहान आकार असतो. या सापाला बार्बाडोस थ्रेड असे नाव आहे. एखाद्या थ्रेड म्हणजेच धाग्यासारखाच त्याचा देह असतो !

हा साप इतका लहान असतो की आपल्या तळहातावरही तो सहज सामावू शकतो. त्याची लांबी ३.९४ सेंटीमीटर ते ४.०९ सेंटीमीटर इतकी असते. हा साप बहुतांशी मुंग्या व वाळवी खाऊन उदरभरण करतो. पूर्व कॅरेबियन बेट बार्बाडोसमध्ये हा साप आढळतो. त्यामुळे त्याचे नाव या बेटावरूनच ठेवण्यात आले आहे. हा साप बिनविषारी आहे. त्याने दंश केला तर किरकोळ वेदना किंवा हलकी जखम होऊ शकते. त्याच्यापासून माणसाला कोणताही धोका संभवत नाही. इतका चिमुकल्या आकाराचा साप अर्थातच लोकांच्या कुतुहलाचा विषय बनतो. त्याच्या लहान आकारामुळे त्याच्या जीवाला धोकेही बरेच असतात. निसर्गाची अनोखी करामत म्हणून या सापाकडे पाहिले जात असते.

## 'लाल ठिपक्याला' झालंय काय?



आपल्या ग्रहमालिकेतील सर्वात मोठा ग्रह म्हणजे गुरु. या ग्रहाच्या पृष्ठभागावरील लालसर ठिपका सर्वांचे लक्ष वेधून घेत असतो. हा ठिपका म्हणजे निव्वळ वायूचा गोळा असलेल्या या ग्रहावरील अनेक वर्षांपासून सुरू असलेले अतिशय मोठे वादळ आहे. त्याचा आकारही खगोलशास्त्रज्ञांचे लक्ष वेधून घेत असतो. आता हा ठिपका वेळोवेळी दबला जात असल्याचे आढळून आले आहे. त्याची रुंदी दबली जात आहे किंवा तो आकसत असल्याचे निरीक्षण नोंदवले गेले आहे. त्याचे कारण मात्र संशोधकांना समजू शकलेले नाही. या ठिपक्याला ग्रेट रेड स्पॉट (जीआरएस) म्हणून ओळखले जाते. हबल अंतराळ दुर्बिणीने याबाबतचे नवे निरीक्षण नोंदवले आहे. दर ९० दिवसांनी हा ठिपका आतील बाजूस दबला जाऊन पुन्हा बाहेर येत असल्याचे दिसून आले आहे. जणु काही या ठिपक्याला पिळा पडून तो सैल होत असल्यासारखे चित्र दिसते. गेल्या अनेक दशकांपासून हा ठिपका आकसत चालला आहे. सध्या त्याचा आकार १४,७५० किलोमीटरचा असल्याचे सांगितले जाते. मात्र ॲस्ट्रोफोटोग्राफर डॅमियन पीच यांनी तो सध्या १२,५०० किलोमीटर आकाराचा असल्याचे म्हटले आहे. या ठिपक्याचे गूढ नेहमीच संशोधकांना बुचकळ्यात टाकत असते. नासाच्या गोडार्ड स्पेस फ्लाईट सेंटरमधील ॲमी सायमन यांनी सांगितले की हबलने या ठिपक्याची हाय रिझोल्युशन प्रतिमा टिपल्या आहेत. त्यावरून विशिष्ट कालावधीत तो दबला जातो व पूर्ववत होतो असे दिसून आले. हे अतिशय अनपेक्षित असून त्याचे सध्याच्या घडीला कोणतेही हायड्रोडायनॅमिक स्पष्टीकरण नाही. खगोलशास्त्रज्ञ सायमन यांनी हबल दुर्बिणीच्या सहाय्याने या ठिपक्याचे डिसेंबर २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत दर ८८.५ दिवसांनी निरीक्षण केले. या काळातील प्रतिमांचा टाईमलॅप्सही बनवण्यात आला. त्यामधून असे आढळले की विशिष्ट कालावधीत हा ठिपका आकसतो आणि पसरतो. हे नेमके कशामुळे घडत आहे हे अद्याप समजू शकलेले नाही.


## चवीला कडू, आरोग्यासाठी गोड

बहुतांश लोक आरोग्याच्या विचार न करता बहुतांशी चवीसाठीय खात-पित असतात; मात्र शरीराचे आरोग्य चांगले राहिले तरच आपल्याला सुखोपभोग घेता येतील किंवा वेगवेगळ्या क्षेत्रात कर्तृत्व गाजवता येईल, हे विसरले जाते. काही पदार्थांची चव आपल्याला तितकीशी आवडत नाही; मात्र हे पदार्थ आरोग्यासाठी गुणकारी असल्याने त्यांचे सेवन करणे गरजेचे ठरते, असे आहारतज्ज्ञ सांगतात. अशास काही पदार्थांची ही माहिती....

**कडुलिंब :** कडुलिंब एक असे झाड आहे ज्याचा प्रत्येक भाग औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. कडुलिंबाची पाने, साल, बिया आणि फळे हे सर्व आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. कडुलिंबाचा उपयोग त्वचा रोग, दंत समस्या, मधुमेह आणि इतर अनेक आजारांवर केला जातो. कडुलिंबामध्ये अँटिबॅक्टेरियल, अँटिफंगल आणि अँटि-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात जे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात. तुम्ही कडुलिंबाच्या पानांचा उष्टा पिऊ शकता किंवा कडुलिंबाचे तेल वापरू शकता. कडुलिंबाची पाने गुढीपाडव्याला गुळ वगैरे घालूनही खाल्ली वातात.



**मेथी दाणे :** मेथीचे दाणे हे एक लहान बियाणे आहे जे अनेक आरोग्य फायद्यांनी भरलेले आहे. मेथीचे दाणे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास, कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करतात. मेथीचे दाणे भाज्या मसूर किंवा सूपमध्ये वापरता येतात. तुम्ही मेथीच्या दाण्यांची पावडरही बनवून पाण्यात मिसळून पिऊ शकता.





**तुळस :** तुळशी ही एक पवित्र वनस्पती आहे जी अनेक आरोग्य लाभांनी भरलेली आहे. तुळशीचा उपयोग सर्दी, खोकला, ताप आणि इतर अनेक आजारांवर केला जातो. तुळशीमध्ये अँटिऑक्सिडेंट, अँटिबॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात जे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात. तुम्ही तुळशीच्या पानांचा डेकोक्शन पिऊ शकता किंवा तुळशीची पाने चघळू शकता.

**कारले :** कारले ही एक कडू भाजी आहे जी अनेक आरोग्य फायद्यांनी भरलेली आहे. कारले रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास, वजन कमी करण्यास आगि दुष्टी सुधारण्यास मदत करते. कारल्याचा वापर भाज्या, सुप किंवा ज्यूसमध्ये करता येतो. तुम्ही कारल्याचे लोणचेही बनवू शकता.





**काळी मिरी :** काळी मिरी हा एक असा मसाला आहे जो अनेक आरोग्य फायद्यांनी भरलेला आहे. काळी मिरी पचन सुधारण्यास, वजन कमी करण्यास आणि सर्दी-खोकल्यापासून आराम देण्यास मदत करते. काळी मिरी स्वयंपाकात वापरली जाऊ शकते. काळी मिरी पावडर बनवून त्यात पाण्यात मिसळून प्या.

## चमत्कारीक मूर्ती



आपल्या देशात अनेक अनोखी मंदिरे आहेत. प्रत्येक मंदिराचे एक वेगळे वैशिष्ट्यही असते जे सध्याच्या २१ व्या शतकातही कायम आहे. कर्नाटकातही अशी अनेक मंदिरे आहेत. रायचूर जिल्ह्यामध्ये ९०० वर्षांपूर्वीचे श्री लक्ष्मी-व्यंकटेश मंदिरही असेच वेगळे वैशिष्ट्य असलेले आहे. या मंदिरातील श्री व्यंकटेशाच्या पाषाण मूर्तीवर रोज सकाळी गरम पाण्याने अभिषेक घातला जातो. असे म्हटले जाते की, हे उकळलेले पाणी ज्यावेळी मूर्तीच्या डोक्यावरील मुकुटावर ओतले जाते त्यावेळी ते पायापर्यंत येता येताच थंड होते.

सर्वसाधारणपणे एक लिटर पाणी १०० अंश सेल्सिअस तापमानापर्यंत गरम केले तर ते थंड होण्यासाठी दोन तासांचा कालावधी लागत असतो. मात्र, या मूर्तीच्या डोक्यावर ओतलेले असे उष्ण पाणी पायापर्यंत येता-येताच थंड होते. याउलट जर डोक्यावर थंड पाणी ओतले तर ते पायापर्यंत येत असताना उष्ण होते, असे सांगितले जाते. मात्र, जर मूर्तीच्या बेंबी किंवा पायावर उष्ण किंवा थंड पाणी ओतले तर ते आहे त्याच स्वरुपात वाहून जाते. या मूर्तीच्या काळ्या पाषाणात किंवा मूर्तीमध्ये असे कोणते वैशिष्ट्य आहे, ज्यामुळे डोक्यावर ओतलेले उष्ण पाणी तत्काळ थंड होते, याबाबत भाविकांना नेहमीच कुतुहल वाटत असते. कर्नाटकातच गदगमध्ये व्यंकटपुरा नावाचे गाव आहे. याठिकाणीही श्री लक्ष्मी-व्यंकटेश मंदिर आहे. या मंदिरातील मूर्तीचेही एक वेगळे वैशिष्ट्य आहे. याठिकाणी केवळ एक पाषाणच होता. त्यावर व्यंकटेशाची आकृती असलेल्या पुसटशा रेषा कोरलेल्या होत्या. शंभर वर्षांपूर्वीपासून हळूहळू या आकृतीमधून आपोआपच व्यंकटेशाची आकृती उत्थान पावत आकार घेऊ लागली. सध्या तिथे या पाषाणातून निर्माण झालेली सुंदर मूर्ती पाहायला मिळते, असे सांगितले जाते.

## महापालिकेचे दरवर्षी कोट्यवधींचे उत्पन्न बुडित

# करचोरीतील अडीच लाख मालमत्ता 'रडार'वर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील तब्बल २ लाख ५५ हजारांपेक्षा अधिक मालमत्तांची नोंदणी करण्यात आली नसल्याने महापालिकेचे दरवर्षी कोट्यवधीचे उत्पन्न बुडत होते. सर्वेक्षणात या मालमत्ता रडारवर आल्या असून, त्यांना कर लावण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शहरात अनेक निवासी व बिगरनिवासी मिळकतींची महापालिकेच्या करसंकलन विभागाकडे नोंदणी करण्यात आलेली नाही.

मालमत्ताकर लागू होऊ नये म्हणून नोंद करण्यात येत नव्हती. त्यामुळे महापालिकेचे दरवर्षी कोट्यवधींचे उत्पन्न बुडत होते. नोंद नसलेल्या मालमत्ता शोधून काढण्यासाठी महापालिकेने प्रत्यक्ष आणि ड्रोनद्वारे शहरात सर्व मालमत्ता आणि मोकळ्या जागेचे सर्वेक्षण केले. करसंकलन विभागाने शहरात १४८ गट तयार केले आहेत. त्यानुसार, प्रत्येक इमारत, घर, मोकळी जागा यांना युपीक आयडी क्रमांक देण्यात आले आहेत.

रेड झोन आणि झोपडपट्टी या दाट लोकवस्तीतही युपीक आयडी क्रमांक देण्यात येत आहेत.

सर्वेक्षणात आढळलेल्या नोंद नसलेल्या मिळकतींना कर लावण्यात आला आहे. वापरात बदल आणि वाढीव बांधकाम केले असल्यास त्यानुसार कर आकारला जात आहे आकारला जात आहे.

नसलेल्या मालमत्ता आढळून आल्या आहेत. त्यात निवासी मालमत्तांची संख्या सर्वाधिक आहे. त्या मालमत्तांना कर लागू केल्याने महापालिकेचे दरवर्षी तब्बल ३०० कोटीने उत्पन्न वाढणार आहे. त्यातून महापालिकेच्या तिजोरीत भर पडणार आहे.

### महापालिका महसुलात मोठी वाढ होणार


● शहरात ड्रोनच्या सहाय्याने मालमत्ता सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. शहरातील सर्व मालमत्तांना युपीक आयडी क्रमांक टाकण्यात आले आहेत. आत्तापर्यंतच्या सर्वेक्षणात २ लाख ५५ हजारांपेक्षा अधिक नवीन मालमत्ता आढळून आल्या आहेत. सध्याच्या आणि सर्वेक्षणात आढळलेल्या नवीन अशा सुमारे ८ लाख ७५ हजार मालमत्ता नोंदणीकृत होणार आहेत. यातून महापालिकेला मोठ्या प्रमाणात महसूल मिळणार आहे, असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सांगितले.

### दस्त नोंदणीनंतर मालमत्तेस थेट लागणार नाव

● पिंपरी-चिंचवड शहरातील मालमत्तेची खरेदी-विक्री व्यवहाराची दस्त नोंदणी करार नोंदणी व मुद्रांक विभागाकडे



झाल्यानंतर तात्काळ महापालिकेच्या करसंकलन विभागाकडे त्या मालमत्तेवर नव्या मालमत्ताधारकांचे नाव लागणार आहे. त्यामुळे नव्याने हस्तांतरण प्रक्रिया करण्याची गरज राहणार आहे. नोंदणीस विलंबही होणार नाही. त्यात महापालिका कर्मचाऱ्यांचा हस्तक्षेप राहणार नाही. त्यामुळे दस्त झालेल्या मालमत्तेची महापालिकेच्या करसंकलन विभागाकडे नोंदणीतून पळबाट काढता येणार नाही. तसेच, मालमत्ताकर चोरी करता येणार नाही.



### यापुढे कर चोरी करता येणार नाही

● शहरात नियमितपणे ड्रोन सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्यामुळे नव्याने निर्माण झालेल्या मालमत्तांची नोंद महापालिकेकडे होणार आहे. हे सर्वेक्षण अचूक असल्याने त्यात मालमत्तेचे मोजमापही उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नव्या मालमत्तेस कर लागू होणार आहे. त्यामुळे या पुढे कर चोरी करण्यास आळा बसणार आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

» Selected

## चिंचवडमध्ये स्वीप टीमच्या वतीने मतदान जनजागृती



**चिंचवड :** लोकशाहीमध्ये प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे. या अधिकाराचा वापर योग्य पद्धतीने करण्याची जबाबदारी ही प्रत्येक मतदाराची आहे. कोणत्याही अमिषाला बळी न पडता योग्य उमेदवारास मत देऊन आपल्या शहराच्या, राज्याच्या आणि देशाच्या विकासात हातभार लावावा आणि २० नोव्हेंबर रोजी प्रत्येकाने आपले राष्ट्रीय कर्तव्य बजवावे, असे आवाहन चिंचवड विधानसभा मतदारसंघ स्वीप टीमचे नोडल अधिकारी राजीव घुले यांनी केले. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील मतदान टक्केवारी कमी असलेल्या भागात निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप टीमच्या वतीने मतदान जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. आज या टीमद्वारे पवनानगर, रॉजस स्कुल तसेच काळेवाडी येथील भारतमाता चौक या परिसरात जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी नागरिकांना मतदानाचे महत्व सांगताना राजीव घुले बोलत होते. या अभियानावेळी स्वीप टीमचे दिपक यन्नावार, मनोज माचरे, अंकुश गायकवाड, गणेश लिंगडे, प्रिन्स सिंह, सचिन लोखंडे, पांडुरंग जाधव, पल्लवी गायकी, ज्योती पाटील, संजू भाट, विजय वाघमारे तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## चिमुकल्यांसाठी रेडिमेड किल्ले बाजारात दाखल

**पिंपरी :** दिवाळीची सुटी लागली की बच्चेकंपनीला वेध लागतात ते किल्ला बनविण्याचे. स्वतःच्या हातांनी मातीचा किल्ला बनविण्याची बच्चेकंपनीची धावपळ सध्या काही प्रमाणात कमी झाल्याचे दिसून येते. वाढत्या शहरीकरणामुळे तसेच किल्ला बनविण्यासाठी माती मिळविणे बच्चेकंपनीला अवघड होत असल्याने सध्या बाजारात रेडिमेट किल्ले मिळत आहेत. दिवाळी म्हणजे लहानांपासून ते मोठ्यापर्यंत असणारी आनंदाची पर्वणी असते. दिवाळीच्या सुटीत बच्चे कंपनी आपल्या पारंपरिक किल्ला बनविण्याच्या खेळात दंग होतात. बाजारात बच्चे कंपनीसाठी विविध आकाराचे छोटे मोठे किल्ले विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. याचबरोबर किल्ला सजवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज, मावळे, शिपाई, गवळण, वाघ, सिंह, ससे, बकर्या, गाई, बैल, तोफा, हत्ती घोडे, पोपट, रणगाडे, लक्ष्मीची, सैनिक, शेतकरी अशा विविध प्रकारच्या छोट्या मूर्ती दुकानात विक्रीस उपलब्ध आहेत. किल्ला रेडिमेड असो की बनविलेला त्याला सजविण्यासाठी मूर्तीची आवश्यकता लागतेच. किल्ला बनविण्याच्या निमित्ताने मुलांमध्ये इतिहास जागविला जातो. पुस्तकात दाखविला जाणारा किल्ला प्रत्यक्षात साकार करताना त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो. आजकाल मोबाईल, इंटरनेटच्या जगात मुले या गोष्टीपासून दूर जातात. पण हे किल्ला तयार करताना आणि सजविताना छत्रपती शिवाजी महाराज ते शेकडो मावळ्यांपर्यंतच्या प्रतिकृती किल्ल्यांवर मांडताना नकळतपणे इतिहासाला उजाळा दिला जातो. नुकत्याच प्रथम सत्र परीक्षा संपल्या असून, बच्चेकंपनी किल्ले तयार करण्याच्या कामाला लागली आहेत.



## महिला मेळावा

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** रहाटणी येथील सिंहगड कॉलनी, बळीराज कॉलनी आणि साई सागर कॉलनी याठिकाणी महिला मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला रहाटणी परिसरातील महिलांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# रहाटणीत महिला मेळाव्यांचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप - शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस - आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांच्या विजयासाठी आमदार अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली रहाटणीतील लाडक्या बहिणी सरसावल्या असून 'अबकी बार शंकरभाऊ आमदार'चा नारा देत महाविजयाचा निर्धार केला आहे.

शंकर जगताप यांच्या प्रचारानिमित्त आमदार अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली रहाटणी येथील सिंहगड कॉलनी, बळीराज कॉलनी आणि साई सागर कॉलनी याठिकाणी महिला मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला रहाटणी परिसरातील महिलांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या मेळाव्याला मार्गदर्शन करताना अश्विनी जगताप म्हणाल्या की, सर्वसामान्य नागरिकांना डोळ्यासमोर ठेवून स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांनी चिंचवड विधानसभा मतदारसंघात विविध विकासकामे केली. थेरगावचे रुग्णालय असेल, गल्लोगल्ली रस्त्यांचे सिमेंट काँक्रिटिकरण असेल, त्याचबरोबर शंकर जगताप यांच्या सहकार्यातून आणि पुढाकारातूनही अनेक विकासकामे झाली आहेत. ही विकासकामे अशीच अखंडितपणे सुरू राहावीत यासाठी शंकर जगताप यांच्यासारख्या उच्चशिक्षित उमेदवाराला यावेळी काम करण्याची संधी द्या. यासाठी येत्या २० तारखेला कमळाला मतदान करा, असे आवाहन त्यांनी उपस्थित महिलांना केले.

## पवन मावळात भातपिकाचे नुकसान



**मावळ :** पवन मावळ विभागातील अनेक गावांतील भात पिकाला परतीच्या पावसाचा जोरदार फटका बसला आहे. यंदा परिसरात भात पीक अतिशय जोमात आले होते. परंतु नुकत्याच झालेल्या परतीच्या पावसाने याठिकाणच्या भात पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. यंदा भात पिकाला सुरूवातीपासूनच पोषक हवामान मिळाल्याने पीक जोमदार आलेले, त्यामुळे शेतकरी राजा देखील समाधानात होता. कोजागिरी पौर्णिमेनंतर भाताची कापणी सुरू करायची तयारी सुरु होती. यंदा दिवाळीत चांगले पैसे हातात मिळण्याची संधी शेतकऱ्यांना होती. परंतु मागील आठवड्यात झालेल्या परतीच्या पावसाने पिकाचे मोठे नुकसान झाले. भाताचे पीक पूर्णपणे तयार झाले असताना जोरदार पावसाने उभे पीक जमीनदोस्त केले. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतकऱ्याची मेहनत, त्याची स्वप्ने आणि दिवाळीचा आनंद सगळं काही हिरावून नेले आहे. शेतकऱ्यांनी तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

## ज्येष्ठ नागरिक संघाचा मतदान करण्याचा निर्धार



**पिंपरी :** पिंपळे सौदागर येथील लिनियर गार्डन येथे चैतन्य हास्य क्लब व ज्येष्ठ नागरिक संघाच्या दैनंदिन कार्यशाळेत सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये मतदान करण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी पिंपरी चिंचवड महपलिकेच्या आवाहनाला ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व मतदान करण्याची शपथ घेतली. सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या पिंपरी, भोसरी आणि चिंचवड मतदार संघात मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त तथा स्वीप नोडल विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली उप आयुक्त अण्णा बोदडे यांच्या नियंत्रणाखाली मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने आज सकाळी पिंपळे सौदागर येथील लिनियर गार्डन येथे चैतन्य हास्यक्लब व ज्येष्ठ नागरिक संघाच्या दैनंदिन कार्यशाळेत " करूया योगा, हो मतदार राजा जागा" हा मतदान जनजागृती अभियानाचा उपक्रम राबविण्यात आला.

# गुंठेवारी विकासासाठी पीएमआरडीएला अर्जांची प्रतिक्षा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** पीएमआरडीए गेल्या आठवडाभरात अद्याप एकही अर्ज दाखल करून घेतलेला नाही. दरम्यान, याबाबत इनवर्ड करणे, चलन काढणे अशी प्रक्रिया सुरू असलेले अंदाजे १५ अर्ज आहेत. कागदपत्रांची पूर्तता केलेल्या अर्जांचाच स्वीकार पीएमआरडीए प्रशासनाकडून करून घेण्यात येत आहे. त्यामुळे अर्ज करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांकडे सर्व कागदपत्रे नसतील तर त्यांना कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत सूचना दिल्या जात आहेत, अशी माहिती प्रशासकीय सूत्रांनी दिली.

पीएमआरडीएकडे गुंठेवारी कायद्यानुसार घरांच्या नियमिती-करणासाठी नागरिकांना आता ३१ मार्च २०२५ पर्यंत अर्ज करण्यासाठी मुदतवाढ दिलेली आहे. यापूर्वी गुंठेवारीसाठी मिळालेला अल्प प्रतिसाद लक्षात घेता प्रशासनाने त्यासाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्कात ॲम्नेस्टी स्कीमनुसार ५० टक्के सूट देण्याचा निर्णय घेतलेला आहे. 31 मार्चपर्यंत मंजूर होणाऱ्या प्रकरणांनाच त्याचा फायदा मिळू शकणार आहे. त्यानंतर मात्र प्राधिकरणाने निश्चित केलेले दर लागू होणार आहेत.

पीएमआरडीए हद्दीमध्ये नागरिकांनी गुंठा, दोन गुंठे जमिनी घेऊन घरे बांधली आहेत. ही बांधकामे करताना पुरेसे सामासिक अंतर न सोडणे, मंजूर चटई क्षेत्रापेक्षा जादा बांधकाम करण्याचे प्रकार घडलेले आहेत.

या पार्श्वभूमीवर अशी बांधकामे नियमित करता यावीत म्हणून पीएमआरडीएकडून २६ जुलै २०२३ पासून ३० एप्रिल २०२४ पर्यंत अर्ज मागविले होते.

या कालावधीत पीएमआरडीए प्रशासनाकडे गुंठेवारीनुसार बांधकामे नियमित करण्यासाठी १६० नागरिकांनी अर्ज केले. त्यापैकी ४० अर्जांना मंजुरी देण्यात आली. सध्या काही अर्जांवर कार्यवाही सुरू आहे. तर, काही अर्जांबाबत नागरिकांना पत्राद्वारे त्रृटी कळविलेल्या आहेत. ३१ डिसेंबर २०२० पूर्वी गुंठेवारी पद्धतीने विकसित झालेले अनधिकृत भूखंड/ बांधकामे यामध्ये नियमित केली जात आहेत.

# जन्म-मृत्यू नोंदणीतील अडथळा दूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) जन्म-मृत्यू नोंदणीसाठी निर्माण झालेला इंटरनेटचा अडथळा दूर झाला आहे. त्याचप्रमाणे, सर्व्हर डाऊनची समस्यादेखील सुटली आहे. गेल्या दोन दिवसांपासून हे कामकाज सुरळीत सुरू झाले आहे.

महापालिकेच्या सर्व विभागांना जोडणारी इंटरनेटची केबल ही रस्त्याचे काम करताना तुटल्याने इंटरनेट सेवा बंद झाली होती. त्याचप्रमाणे, जन्माची नोंदणी सेंट्रलाईज पद्धतीने होण्यासाठी केंद्र सरकारने नुकतेच सीएसआर पोर्टल सुरू केले आहे.त्यातच सर्व अर्जाची नोंद घेणे अनिवार्य आहे. या पोर्टलमध्येदेखील तांत्रिक अडचणी येत होत्या. त्यामुळे वायसीएम रुग्णालयात १८ ते २३ तारखेदरम्यान जन्म-मृत्यूची नोंद ऑनलाईन पद्धतीने घेण्यामध्ये अडचणी येत होत्या.

त्यामुळे नागरिकांना त्यासाठी वारंवार हेलपाटे मारण्याची वेळ येत होती. दरम्यान, शुक्रवारपासून (दि. २५) इंटरनेट सेवा पूर्ववत सुरू झाली. त्या दिवशी दिवसभरात ४० ते ५० दाखले देण्याचे कामकाज करण्यात आले.

## नागरिक व खेळाडूंची होतेय गैरसोय...

# महापालिकेचे जलतरण तलाव अद्याप बंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या जलतरण तलावातील पाण्याचे शुद्धीकरण केले जात नसल्याने तलावातील पाणी घाण झाले आहे. त्यामुळे शहरातील काही तलाव पोहण्यासाठी बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे जलतरण बंद असल्याने नागरिकांची गैरसोय होत असून नागरिक व खेळाडू नाराजी व्यक्त करत आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने केशवनगर, संभाजीनगर, कासारवाडी, पिंपरी वाघेरे, यमुनानगर, पिंपळेगुरव, नेहरुनगर, वडमुखवाडी, भोसरी, मोहननगर, थेरगाव, सांगवी, आकुर्डी या भागांत १३ जलतरण तलावांची उभारणी करण्यात आली आहे. शहरातील नागरिक, लहान मुले, महिला पोहण्यासाठी जलतरण तलावाकडे जात असतात. पण, महापालिकेचे विविध भागांतील १३ जलतरण तलावांपैकी काही तलाव सुरू आहेत, तर अद्यापही पाच ते सहा जलतरण तलाव बंद आहेत. त्यातच सुरू असलेल्या तलावाचे ऑनलाइन बुकिंग सुरू झाले की लगेच हाऊसफुल्ल होत आहेत.



### तलाव बंद न ठेवण्याचे निर्देश

● तलावाचे पाणी शुद्ध करण्याच्या सूचना संबंधित ठेकेदारांना देण्यात आल्या आहेत. त्या संदर्भात गुरुवारी (दि. २४) बैठक झाली आहे. त्यावर तातडीने कार्यवाही केली जात आहे. कोणताही तलाव बंद राहणार नाही, असे सक्त निर्देश ठेकेदारांना देण्यात आले आहेत, असे महापालिकेच्या क्रीडा विभागाचे उपायुक्त पंकज पाटील यांनी सांगितले.

#रा

### जनता माझ्या पाठीशी, जगताप आणि कलाटे हे माझ्यासाठी आव्हान नाही - नाना काटे

# चिंचवडमधून नाना काटे यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पिंपरी :** पिंपळे सौदागर येथील महादेव मंदिरात दर्शन घेऊन नाना काटे यांच्या रॅलीची सुरवात झाली. यावेळी त्यांच्या सोबत माजी नगरसेवक प्रशांत शितोळे, विनोद नढे, संतोष कोकणे, उषा माई काळे, हरिभाऊ तिकोणे, खंडुशेठ कोकणे, शिरीष साठे, शेखर चद्रंकात काटे, शाम जगताप सचिन काळे, तानाजी जवळकर, नवनाथ नढे, चद्रकांत तापकीर, बापु कातळे, विष्णु शेळके, सागर कोकणे,

**» निवडणूक विशेष**

संगिता कोकणे, प्रशांत सपकाळ, सुमित डोळस, काळुराम कवितके यांच्यासह अनेक माजी नगरसेवक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

अर्ज दाखल करायला निघालेल्या नाना काटे यांचे चौकाचौकात फटाके फोडत, फुलांची उधळण करत जनतेने स्वागत केलं. जनता आपल्या सोबत असल्याने ही लढाई आपल्यासाठी अवघड नाही. त्यामुळेच महाविकास आघाडीचे उमेदवार राहूल कलाटे आणि महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांचं आव्हान आपणं मानत नसल्याचेही काटे माध्यमांशी बोलताना म्हणालेत.काटे म्हणाले की, चिंचवडची जागा लायकी नसलेल्या आणि ज्यांचं डीपोझिट जप्त झालं होतं अशा उमेदवाराला दिली आहे.

चिंचवडच्या सर्वांगीण विकासासाठी मी मैदानात उतरलो आहे. महायुतीचे तिकीट जाहीर झाल्यावर मी महाविकास आघाडीकडे तिकीट मागितलं होत. पण वरच्या नेत्यांना अंधारात ठेऊन खालच्या नेत्यांनी कलाटे यांना तिकीट दिल. मागच्या निवडणुकीत माझ्यासोबत एक लाख मतदान होत. यावेळी या एक लाख मतदानासह अनेक नागरिक माझ्यासोबत आहेत हा माझा विश्वास आहे. याच मतदारांनी दाखवलेल्या विश्वासावर मी ही निवडणूक जिंकेल असा विश्वास नाना काटे यांनी व्यक्त केला आहे

**चिंचवड विधानसभेतून राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नाना काटे यांनी बंडखोरी करत जोरदार शक्तिप्रदर्शन**



### शक्तिप्रदर्शन नव्हे ही तर महाविजयाची पूर्वतयारी

# महायुतीचे उमेदवार जगताप यांनी भरला उमेदवारी अर्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी- :** : चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे भाजप - राष्ट्रवादी काँग्रेस - शिवसेना - आरपीआय (आठवले) मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांनी आज हजारो चिंचवडकरांच्या साक्षीने थेरगाव 'ग' क्षेत्रीय कार्यालय याठिकाणी उमेदवारी अर्ज चिंचवड विधानसभेचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांच्याकडे सादर केला.याप्रसंगी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, गुजरातचे गृहमंत्री प्रदीप सिंह जडेजा, खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, आमदार अश्विनी जगताप, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, माजी महापौर माई ढोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल, शिवसेना उपनेते इरफान सय्यद, भाजप प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, सदाशिव खाडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शिवसेना शहरप्रमुख निलेश तरस, आरपीआय शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, बाळासाहेब भागवत, माजी स्थायी समिती अध्यक्ष राजेंद्र राजापुरे हे उपस्थित होते. लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मृतिस्थळाचे दर्शन घेऊन पदयात्रेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी महायुतीचे कार्यकर्त्यांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळत होता. सुवासिनींचे औक्षण, फटाक्यांची आतिषबाजी, फुलांची पुष्पवृष्टी, ढोल ताशांच्या गजर आणि 'अबकी बार, शंकरभाऊ आमदार', 'आले



रे आले, कमळ आले', 'अमर रहे, अमर रहे, लक्ष्मणभाऊ अमर रहे', अशा घोषणा देत भव्य दिव्य अशी पदयात्रा पिंपळे गुरव, पिंपळे सौदागरमार्गे रहाटणी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून पुढे तापकीर चौक मार्गे 'ग' क्षेत्रीय कार्यालयापर्यंत काढण्यात आली. या पदयात्रेला सुमारे ५० हजारांहून अधिक कार्यकर्ते व नागरिक स्वयंस्फूर्तीने उपस्थित होते. विशेषतः महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी रस्त्यांच्या दुतर्फा उभे राहून तसेच घरांच्या छतावरून नागरिकांनी शंकर जगताप यांच्यावर जोरदार पुष्पवृष्टी केली. नागरिकांचा हा उत्स्फूर्त उत्साह आणि पदयात्रेला उपस्थित कार्यकर्त्यांची गर्दी पाहून ही पदयात्रा म्हणजे शक्तिप्रदर्शन नसून ही महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या महाविजयी यात्रेची पूर्वतयारी असल्याची भावना, यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

# अवयव आणि देहदानाबद्दल ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपळे सौदागर :** देहदानाच्या माध्यमातून डॉक्टरांच्या प्रशिक्षण कार्याला मदत होते तर अवयवदानातून प्रत्यारोपणाद्वारे एखाद्याला जीवनदान मिळू शकते तेंव्हा सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून देह आणि अवयवदानासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवा असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत आपटे आणि नीलताई आपटे यांनी केले. येथील ऑल सिनियर सिटीझनच्यावतीने आयोजित " देहदान आणि अवयवदान " या विषयावरील मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते.

कुणाल आयकॉन रोडवरील बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर रविवार दि. २७ रोजी झालेल्या या कार्यक्रमाचा प्रारंभ गुरुवंदनाने करण्यात आला. त्यानंतर सुरेखा पाटील, राजूदादा देवतारे , अनघाताई यांनी गाणी सादर केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शकुंतला शिंदे यांनी केले तर अनिल कुलकर्णी यांनी आभार मानले . प्रमुख पाहुण्यांचे स्वागत असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार आणि शोभा राजगुरे तसेच निर्मला कासार यांनी केले. कार्यक्रमास ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे पदाधिकारी डॉ. सुभाष पवार, शोभा राजगुरे, निर्मला कासार, सखाराम ढाकणे, रमेश चांडगे, अनिल कुलकर्णी, अशोक येळंमकर, अनिलकुमार शाह, जयपाल सिदनाळे आदिंसह ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## » Selected



## आठव्या आंतरराष्ट्रीय डेअरी व पशुखाद्य प्रदर्शनाचे उद्घाटन

**पिंपरी :** डेअरी, पोल्ट्री, मत्स्यपालन, पशुखाद्य व्यावसायिक आणि शेतकऱ्यांसाठी आयोजित आठव्या आंतरराष्ट्रीय डेअरी व पशुखाद्य प्रदर्शनाला शेतकऱ्यांसह दूध, पोल्ट्री व्यावसायिकांचा, युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पिंपरीतील ऑटोक्लस्टर एक्झिबिशन सेंटरमध्ये बेनिसन मीडियाच्या पुढाकारातून आयोजित या प्रदर्शनात जवळपास १०० दूध व दुग्धजन्य उत्पादने आणि यंत्रसामुग्री पुरवणाऱ्या कंपन्यांनी सहभाग घेतला. प्रदर्शनाचे उद्घाटन क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद मेश्राम, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे (गोकुळ दूध) चेअरमन अरुण डोंगळे, जाफा कॉम्फीडचे व्यवस्थापकीय संचालक प्रसाद वाघ, द वर्ल्ड व्हेटर्नरी पोल्ट्री असोसिएशनचे डॉ. जितेंद्र वर्मा, पोल्ट्री फार्मर्स अँड ब्रीडर्स असोसिएशनचे वसंतकुमार शेट्टी, कंपाउंड लिव्हस्टॉक मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनचे चेअरमन दिव्याकुमार गुलाटी, संयोजक प्राची अरोरा व आनंद गोरड यांच्या उपस्थितीत झाले. डॉ. मिलिंद मेश्राम म्हणाले, "महाराष्ट्रात दूध उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. दुधाचे उत्पादन व त्यांची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी दुभत्या जनावरांचे आरोग्य चांगले ठेवणे गरजेचे असते. जनावरांना चांगला चारा, पौष्टिक पशुखाद्य देण्यासह त्यांच्या आरोग्याची काळजी घेणेही महत्वाचे आहे. त्यामुळे नियमित लसीकरण, गरजेनुसार उपचार व्हायला हवेत." अरुण डोंगळे म्हणाले, "डेअरी आणि पशुखाद्याची सुरक्षा घेऊन होत असलेले हे प्रदर्शन शेतकरी व शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्यांसाठी उपयुक्त आहे. तंत्रज्ञान वेगाने बदलत असून, डेअरी व्यवसायाला पूरक आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आपण केला पाहिजे. गोकुळने दर्जा जपत संकलन वाढवले आहे. लाखो लिटर दुधाचे संकलन आणि हजारो शेतकरी बांधव गोकुळचे सभासद आहेत." प्रकाश कुतवळ म्हणाले, "व्यवसायात नावीन्य असणे प्रगतीचे लक्षण आहे. डेअरीत चांगल्या दर्जाचे दूध मिळत नाही. दुधाच्या भेसळीवर चर्चा करण्यापेक्षा त्यावर काम करणे अधिक महत्वाचे आहे. सहकार आणि खासगी अशा दोन शाखा या क्षेत्रात काम करतात. एखादी डेअरी किती दूध संकलित करते, यापेक्षाही त्याचा दर्जा काय, हे जास्त महत्वाचे आहे." प्राची अरोरा म्हणाल्या, "प्रदर्शनाचे आठवे वर्ष असून, यंदाची संकल्पना 'मिल्क अँड फीड सेफ्टी' अशी आहे. जनावरांचे आरोग्य व आहार व्यवस्थापन, डेअरी प्लांट मशीनरी, दूध प्रक्रिया व दुग्धजन्य पदार्थ निर्मितीचे आधुनिक तंत्रज्ञान, आईस्क्रीम व मिठाई उत्पादन, निर्यातीमधील संधी, पोल्ट्री, मत्स्य व पशुखाद्य मार्केट यावर तज्ज्ञांची मार्गदर्शन सत्रे, कार्यशाळा झाली." गेल्या सातही प्रदर्शनांमध्ये अत्याधुनिक मशिनरींची प्रात्यक्षिके पाहून व तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन अनेक शेतकऱ्यांनी व ग्रामीण युवक युवतींनी स्वतःचा लघु व मध्यम स्वरूपाचा दुग्धजन्य पदार्थ किंवा पशुखाद्य निर्मिती प्रकल्प उभारून स्वतःच्या ब्रँडनेमने विक्री यंत्रणा सुरु केली आहे, असे आनंद गोरड यांनी नमूद केले. जयाविजया राव यांनी सूत्रसंचालन केले तर अश्वनीकुमारांनी आभार मानले.



## हिंदूंचा गौरवशाली इतिहास जपायचा असेल तर राजकीय हिंदू बना

**चिंचवड :** रामकृष्ण मोरे सभागृह चिंचवड येथे भव्य हिंदू स्नेह मेळावा पार पडला. चिंचवड मधील भारत माता सत्संग मंडळ व प्रबोधन मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या स्नेह मेळावा मध्ये चिंचवड येथील अनेक जण सहपरिवार उपस्थित होते.रामकृष्ण मोरे सभागृह गच्च भरले होते. ह्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विजय कुलकर्णी (दै.राष्ट्रसंचार मुख्य उपसंपादक) आणि प्रमुख वक्ते श्री. निलेश धायरकर हे होते. तसेच मंचावर भारत माता सत्संग मंडळाचे अध्यक्ष श्री. प्रशांत हरहरे हे देखील मंचावर उपस्थित होते.प्रमुख वक्ते निलेश धायरकर यांनी हिंदूंच्या गौरवशाली इतिहासाचे आठवण करून देत खलील मुद्दे मांडले यावेळी बोलताना श्री धायरकर म्हणाले की, हिंदूंनी त्यांचे शत्रू ओळखणे गरजेचे आपण अजूनही जर एकत्र आलो नाही तर हिंदू संपायला वेळ लागणार नाही. , छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, सावरकर, आंबेडकर ह्यांची पूजा करा आणि त्यांनाच आपले पितर मानून पूजन करा.संपूर्ण सरकार हिंदूंचे असणे अत्यंत गरजेचे त्यासाठी आपण एकत्रित येऊन मतदान करणे गरजेचे आहे.जर आपला गौरवशाली इतिहास जागृत ठेवायचा असेल तर हिंदू म्हणून एकत्रित येणे गरजेचे आहे. आता वेळ आहे ती राजकीय हिंदू होण्याची आहे.

## » पान १ वरून

### भारतात जनगणनेची तयारी...

जातात. सामान्य, अनुसूचित जाती, जमाती श्रेणी मोजल्या जातात. या वेळी लोकांना ते कोणत्या पंथाचे अनुयायी आहेत, असा प्रश्नही विचारला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, कर्नाटकात, लिंगायत, जे सामान्य श्रेणीतील आहेत, ते स्वतःला एक वेगळा पंथ मानतात. काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि इतर अनेक पक्ष अनेक दिवसांपासून जात जनगणनेची मागणी करत आहेत. बिहारमधील संयुक्त जनता दलासारख्या भाजपच्या सहयोगी पक्षांनीही तशी मागणी केली आहे.

### पाटील - बालवडकर यांचे मनोमिलन

विधानसभा निवडणूक अपक्ष लढवणार असल्याची घोषणा केली होती. त्यामुळे महायुतीचे उमेदवार चंद्रकांत पाटील यांचे टेन्शन वाढले होते. परंतु आता ते कमी झाले आहे

### पुणेकरांचा जीव धोक्यात

पाच मिनिटात गाडी पोहोचली मेट्रो तर्फे अनुस करण्यात आले दरवाजा उजव्या बाजूने उघडेल दरवाजा उघडला त्यावेळेस प्लॅटफॉर्म उजव्या बाजूला नव्हते प्लॅटफॉर्म हे डाव्या बाजूला असून चुकीच्या बाजूने दरवाजा उघडल्यामुळे मोठा अनर्थ टळला यासंदर्भात सुरेश पवार स्टेशन कंट्रोलर यांना भेटून चूक सांगण्यात आली त्यांच्याकडून चूक हे मान्य करून तातडीने त्यांनी हालचाली सुरू केल्या व या संदर्भात अधिकाऱ्यांशी बोलून यावरती कारवाई करणार असे साग्यात आले. संबंधित व्यक्तींवरती कारवाई होईल तेव्हा होईल पुणेकरांचा एवढा मोठा पैसा खर्च करून खरंच प्रवास सुकर आहे. का असा प्रश्न उद्भवतो असा अखेर अनेक प्रवाशांनी जीव मोठीत धरून स्वास सोडला.

### शरद पवारांच्या राष्ट्रवादीची...

उमेदवाराचा समावेश आहे. तर, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या काटोल मतदारसंघातून त्यांचे चिरंजीव सलील देशमुख यांचं नाव निश्चित करण्यात आलं आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. तर, २३ नोव्हेंबर रोजी निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. त्यामुळं जवळपास सर्वच पक्षांनी उमेदवार जाहीर करण्याचा धडाका लावला आहे.

### पाच दिवस कोसळला...

झाले आहे. दरम्यान, निफ्टी ५० २७ सप्टेंबरच्या विक्रमी उच्चांकावरून जवळपास ८ टक्के खाली आहे. गेल्या २० सत्रांपासून परदेशी गुंतवणूकदारांनी भारतातून पैसे काढून चीनमध्ये गुंतवणूक केली आहे. चीन सरकारने मदत पॅकेज जाहीर केल्यानंतर हा बदल झाला आहे. परदेशातील विक्री व्यतिरिक्त, कमकुवत कमाईमुळे गुंतवणूकदारांच्या भावना दुखावल्या गेल्या आणि विक्रीचा दबाव वाढला, असे विश्लेषकांनी सांगितले. येथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी (एफआयआय) २५ ऑक्टोबर रोजी ३,०३६ कोटी रुपयांचे समभाग विकले, तर त्याच दिवशी देशांतर्गत संस्थागत गुंतवणूकदारांनी ४,१५९ कोटी रुपयांचे समभाग खरेदी केले.

'जिओजित फायनान्शिअल सर्व्हिसेस'चे मुख्य गुंतवणूक धोरणशास्त्रज्ञ डॉ. व्ही.के. विजयकुमार म्हणाले, की एचडीएफसी बँक आणि आयसीआयसीआय बँक या बँकिंग कंपन्यांची चांगली कामगिरी पाहता तेजीचा कल कायम राहण्याची शक्यता आहे. इराणवरील इस्रायलच्या हल्ल्यानंतर जागतिक बाजारपेठ अनुकूल झाली असावी. इराणी तेल क्षेत्र वगळता कच्च्या तेलाच्या किमती झपाट्याने घसरल्या आहेत. आगामी अमेरिकन अध्यक्षपदाची निवडणूक आणि त्यासंबंधीची अनिश्चितता यामुळेही बाजारावर दबाव कायम राहण्याची अपेक्षा आहे.

### यंदा ११० लाख टन साखर निर्मितीचे आव्हान

मात्र आम्ही १५ नोव्हेंबरपर्यंत वाट पाहू व त्यानंतर देखील निर्णय न घेतल्यास कारखाने बंद ठेवण्याचा पर्याय वापरू. तसे झाल्यास साखर उद्योग, शेतकरी वर्ग आणि केंद्राचा इथेनॉल मिश्रण कार्यक्रम यावर गंभीर परिणाम होतील. त्याची जबाबदारी अर्थातच केंद्राची राहील," असा इशारा 'विस्मा'ने दिला आहे. वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उसाच्या रास्त व किफायतशीर दरात (एफआरपी) केंद्र सरकारने पाच वेळा वाढ केली आहे. एफआरपी आता प्रतिक्विंटल ३४०० रुपयांपर्यंत वाढविली आहे. साखरेचा उत्पादन खर्च सध्या प्रतिक्विंटल ४१.६६ रुपये इतका वाढला आहे.

### यंदा ७१ कर्मचाऱ्यांनी...

आता त्यामुळे 71 पदे रिक्त झाली आहे. प्रशासकीय अधिकारींनी सांगितले की, राजीनामा दिलेल्यांपैकी बहुतेक जण स्पर्धा परीक्षांची तयारी करत होते आणि काहींना चांगल्या नोकऱ्या मिळाल्यामुळे त्यांनी पीएमसीचा राजीनामा दिला.

# महायुती एकदिलाने निवडणुकीला सामोरे जाणार – खा. श्रीरंग बारणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** राज्यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत. त्यामुळे विकासात्मक मुद्दे घेऊन विधानसभा निवडणुकीला महायुती एकजुटीने सामोरे जात आहे. जनता महायुतीच्या मागे आहे. पिंपरी चिंचवड शहरासाठी मेट्रो, पाणी, रस्ते असे अनेक प्रश्न महायुतीने मिटवले आहेत. आम्ही सर्वजण एकत्र असून एकदिलाने निवडणुका लढून जिंकणार असल्याचा निर्धार खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. महायुती व इतर घटक पक्ष यांच्या वतीने रविवारी चिंचवड विधानसभेचे उमेदवार व भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप, पिंपरी विधानसभेचे उमेदवार, आमदार अण्णा बनसोडे आणि भोसरी विधानसभेचे उमेदवार आमदार महेशदादा लांडगे यांचे प्रतिनिधी कार्तिक लांडगे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष योगेश बहल, आमदार अश्विनीताई जगताप, उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे आदींसह महायुतीतील घटक पक्षाचे पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. चिंचवड विधानसभेचे उमेदवार व भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जास्तीत जास्त उमेदवार राज्यातून आणि शहरातील तीनही उमेदवार निवडून आणण्यासाठी भाजप सह सर्व घटक पक्ष एकत्रित काम करीत आहेत. त्याला त्या सरकारच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली विकासाची गंगा आणि वेग आणखी वाढवण्याचे व्हिजन आहे. पिंपरी चिंचवड शहराचे नाव देशातच नव्हे तर जगात उंचावण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्नशील आहोत, यासाठी जनता आमच्या पाठीशी आहे असा विश्वास शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

### पन्नासहून अधिक पालकांचा या सोहळ्यात सहभाग

# सिबारमध्ये गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ आणि पालक संमेलनाचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन ऍण्ड रिसर्च, कोंढवा, पुणे येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ त्यांच्याच पालकांच्या हस्ते करण्यात आला. सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन अँड रिसर्च तर्फे विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता आणि ५० हूनही अधिक पालकांनी या सोहळ्यात सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे उद्घाटन विद्येची देवता - सरस्वतीच्या पूजन करून करण्यात आले.

सिबारचे डायरेक्टर प्रो.डॉ.धनंजय मंडलिक यांनी कार्यक्रमासाठी गुणवंत विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाच्या आयोजक डॉ. उर्मिला निकम यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली, तसेच आलेल्या पालकांचे स्वागत केले. या सोहळ्याचा मुख्य हेतू असा की प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षाच्या विद्यार्थांच्या सत्कार समारंभ पाहून प्रेरणा मिळावी. आपापल्या क्षेत्रात अव्वल ठरलेल्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांच्या हस्ते सत्कार या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

पालकांसाठी ही हा अदभुत सोहळा अविस्मरणीय असाच होता. पालक ही मोठ्या संख्येने या कौतुक सोहळ्यात सहभागी झाले आणि या सुंदर कार्यक्रमाचे साक्षीदार झाले.सर्व पालकांनी, प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमाचा मनापासून आनंद घेतला.सिंहगड संस्थेच्या वतीने संचालक डॉ. धनंजय मंडलिक सरांनी सर्व कर्मचाऱ्यांना प्रेरित केले. कार्यक्रमाचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक एम एन नवले यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थापक सचिव डॉ.सुनंदा नवले, डॉ. रोहित नवले उपाध्यक्ष एचआर आणि डॉ. रचना नवले अष्टेकर उपाध्यक्ष प्रशासन सर्वांनी आपले मोलाचे मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रो. श्र्वेतलाना काटकर व प्रो. पूजा कदम यांनी केले. डॉ. उर्मिला निकम यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# अविनाश सुभेदार यांच्या 'सुभेदारी' आत्मकथनाचे प्रकाशन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** "चांगला माणूसच एक चांगला अधिकारी बनू शकतो. माणुसकीचा ओलावा, परिस्थितीची जाणीव, सामान्यांची कणव आणि त्याच्यातील चांगुलपणा लोकाभिमुख अधिकारी घडवतो. कृतज्ञतेच्या वृत्तीने समाजासाठी झटणाऱ्या मोजक्या अधिकाऱ्यांमुळेच राज्य चालतेय," असे प्रतिपादन राज्याचे माजी माहिती आयुक्त व ज्येष्ठ साहित्यिक-संपादक विजय कुवळेकर यांनी केले.

माजी सनदी अधिकारी (आयएएस) अविनाश सुभेदार लिखित मनोविकास प्रकाशन प्रकाशित 'सुभेदारी' या आत्मकथन प्रकाशन सोहळ्यात विजय कुवळेकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कृषिशास्त्रज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक होते. कर्वे रस्त्यावरील हर्षल हॉल येथे झालेल्या सोहळ्यात माजी विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी, माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड, गप्पाष्टककार डॉ. संजय उपाध्ये, लेखक अविनाश सुभेदार, मनोविकास प्रकाशनाचे अरविंद पाटकर, पुस्तकाचे शब्दांकन केलेले नितीश साळुंके आदी उपस्थित होते.

जॉर्जिया, दुबई, सौदी, कझाकिस्तानमध्येही सुरु करण्याचा प्रयत्न

# आता विद्यापीठाचे उपकेंद्र दुबईतही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक नुकतीच झाली. या परिषदेत दुबईमध्ये विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. हे उपकेंद्र सुरू करण्याबाबत पुणे विद्यापीठाच्या प्रशासनाला विचारणा करण्यात आली आहे. याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कतारनंतर आता दुबईमध्ये आपले शैक्षणिक उपकेंद्र सुरू करण्यासाठी पाऊल उचलले आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या नुकत्याच झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली आहे. त्यात दुबईला उपकेंद्र सुरू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.





"दुबईमध्ये उपकेंद्र सुरू करण्याबाबत आम्ही सकारात्मक आहोत. त्याप्रमाणे व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत शनिवारी सकारात्मक चर्चा करण्यात आली. आंतरराष्ट्रीकरण करण्याच्या दृष्टीने पुणे विद्यापीठ प्रयत्नशील आहे."
— कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी

दुबईसोबतच जॉर्जिया, सौदी अरेबिया, कझाकिस्तान येथेही उपकेंद्रे सुरू करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे.

पुणे विद्यापीठातर्फे सुमारे तीन वर्षांपूर्वी कतार येथे विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करण्यात आले. कतारच्या धर्तीवर विद्यापीठाने इतर ठिकाणी सुद्धा उपकेंद्रे सुरू करण्यास सकारात्मकता दर्शविली आहे. काही महिन्यांपूर्वी जॉर्जिया, दुबई, सौदी, कझाकिस्तानमध्ये विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू करावे, यासंदर्भात काही संस्थांकडून विद्यापीठाकडे पत्रव्यवहार केला होता. त्यानुसार विद्यापीठाने त्यावर सकारात्मक पाऊल उचलले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कतार येथील उपकेंद्र साधारण तीन वर्षांपूर्वी सुरू झाले आहे. या केंद्रातून कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेमधून पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जात आहे. या उपकेंद्रात भारतीय विद्यार्थ्यांची संख्या चांगली आहे. या पार्श्वभूमीवर दुबईमध्ये अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत विद्यापीठ सकारात्मक आहे. कतार येथील एका संस्थेकडून उपकेंद्र चालविण्यात येत आहे. याच संस्थेकडून दुबई येथे उपकेंद्र सुरू करण्याचा विद्यापीठाचा विचार आहे.

# सिबारमध्ये गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ संपन्न



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस अ‍ॅडमिनिस्ट्रेशन ऍण्ड रिसर्च, कोंढवा, पुणे येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ त्यांच्याच पालकांच्या हस्ते करण्यात आला. सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस अ‍ॅडमिनिस्ट्रेशन अँड रिसर्च तर्फे विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता आणि ५० हूनही अधिक पालकांनी या सोहळ्यात सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे उद्घाटन विद्येची देवता - सरस्वतीच्या पूजन करून करण्यात आले.

सिबारचे डायरेक्टर प्रो. डॉ. धनंजय मंडलिक यांनी कार्यक्रमासाठी गुणवंत विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाच्या आयोजक डॉ. उर्मिला निकम यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली, तसेच आलेल्या पालकांचे स्वागत केले. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना व्दितीय वर्षाच्या विद्यार्थांच्या सत्कार समारंभ पाहून प्रेरणा मिळावी. हा या सोहळ्याचा मुख्य हेतू होता. आपापल्या क्षेत्रात अव्वल ठरलेल्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांच्या हस्ते सत्कार या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. पालकांसाठी ही हा अदभुत सोहळा अविस्मरणीय ठरला.

सिंहगड संस्थेच्या वतीने संचालक डॉ. धनंजय मंडलिक सरांनी सर्व कर्मचाऱ्यांना प्रेरित केले. कार्यक्रमाचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक एम एन नवले यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थापक सचिव डॉ.सुनंदा नवले, डॉ. रोहित नवले उपाध्यक्ष एचआर आणि डॉ. रचना नवले अष्टेकर उपाध्यक्ष प्रशासन सर्वांनी मार्गदर्शन केले.

## अवतीभवती
CITY UPDATE



### शक्तीप्रदर्शन करत माधुरी मिसाळ यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

**पुणे :** पर्वती विधानसभा मतदार संघातून आमदार माधुरी मिसाळ यांनी शक्तिप्रदर्शन करीत आज उमेदवारी अर्ज दाखल केला. सारसबाग येथील गणपती आणि महालक्ष्मी देवीचे दर्शन घेऊन मिसाळ यांच्या पदयात्रेला प्रारंभ झाला. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मार्केट यार्ड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक पद्मावती, अण्णा भाऊ साठे स्मारक, स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक, बाळासाहेब ठाकरे स्मारक, अहिल्यादेवी होळकर स्मारक या महापुरुषांना अभिवादन केले. केंद्रीय सहकार आणि हवाई उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, माजी खासदार प्रदीप रावत, निवडणूक प्रमुख दीपक मिसाळ, गणेश बिडकर, सुभाष जगताप, श्रीकांत पुजारी, करण मिसाळ, संतोष नांगरे, प्रशांत दिवेकर, सुधीर कुरुंकर यांची प्रमुख उपस्थिती होती. निवडणूक निर्णय अधिकारी मनोज खैरनार यांच्याकडे उमेदवारी अर्ज सादर केला.

मोहोळ म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या नेतृत्वात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. माधुरी ताईंनी या मतदारसंघातील विकास कामांना गती दिली, लाभार्थ्यांपर्यंत योजना पोचवल्या, त्यांचा जनसंपर्क उत्तम आहे. त्यामुळे त्या मोठ्या बहुमताने विजयी होतील."

### यंदाही कसबा आम्हीच जिंकणार - रवींद्र धंगेकर यांचा विश्वास



**पुणे :** कसबा हा कुणाचाच गड नाही तर कसबा हा केवळ जनतेचा गड आहे. यंदाही कसबा आम्हीच जिंकणार असा विश्वास महाविकास आघाडी, इंडिया फ्रंट व मित्र पक्षांचे कॉग्रेस पक्षाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी व्यक्त केला. माझ्या विरोधात भाजप संपूर्ण ताकद वापरत आहेत पण जनता माझ्या बाजूने असल्याने विजय माझा निश्चित आहे, असे त्यांनी सांगितले. विरोधक अपप्रचाराची खेळी करण्याचा प्रयत्न करत आहे, मात्र जनता त्यांचा डाव हाणून पाडणार असेही यावेळी त्यांनी नमूद केले. श्री कसबा गणपतीचे आशीर्वाद घेतल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.

उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी महाविकास आघाडी, इंडिया फ्रंट व मित्र पक्षांचे कॉग्रेस पक्षाचे उमेदवार आमदार रविंद्र धंगेकर यांनी पत्नीसह मानाचा पहिला कसबा गणपतीची आरती करून गणरायाचा आशीर्वाद घेत आपल्या उमेदवारीचा अर्ज सोमवारी श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे दाखल केला. श्री कसबा गणपतीची आरती करून व आशीर्वाद घेऊन उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी रॅली काढण्यात आली. लाल महालातील राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आशीर्वाद घेतला. यावेळी काढलेल्या रॅलीत नागरिक, कार्यकर्ते व महिलांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. तरुणाई बरोबरच महिला व ज्येष्ठांनी रॅलीत सहभाग घेतला. रवींद्र धंगेकर यांचा विजय असो, असा जयघोष करण्यात आला.

जेष्ठ नागरिकांबरोबरच गरोदर मातांनाही दिलासा

# आता पुणे विमानतळावर 'मे आय हेल्प डेस्क'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आता नवीन टर्मिनलच्या बाहेर पडण्याच्या गेटवरच टॅक्सी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. याकरिता प्रशासनाने येथे 'मे आय हेल्प डेस्क' उभारला आहे. याने पुणे विमानतळावरून प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिलांना आता मोठा दिलासा मिळाला आहे. त्यांना आता नवीन टर्मिनलवर उतरल्यावर एरोमॉलपर्यंत पायपीट करावी लागणार नाही.

विमानतळ टर्मिनल परिसरात टॅक्सींमुळे होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी विमानतळ प्रशासनाने टॅक्सी आणि रिक्षाथांबे यांची एरोमॉल पार्किंगमध्ये तिसऱ्या मजल्यावर व्यवस्था केली. त्यामुळे सुरुवातीला प्रवाशांना विमानातून उतरल्यावर सामानाच्या बॅगा घेऊन मोठी पायपीट करावी लागत होती. त्याविषयी प्रवाशांनी प्रशासनाकडे नाराजी व्यक्त केली होती.




"विमानतळनवीन टर्मिनल परिसरात होणाऱ्या कोंडीमुळे आम्ही टॅक्सीला बंदी केली आहे. मात्र, ज्येष्ठ नागरिक आणि गरोदर महिलांसाठी टॅक्सीला आतमध्ये येण्यास आम्ही परवानगी देत आहे. याकरिता प्रवाशांनी आम्ही उभारलेल्या 'मे आय हेल्प डेस्क'वर संपर्क करावा. डेक्सवरून बोलावलेल्या टॅक्सीलाच टर्मिनलसमोरील परिसरात प्रवेश मिळत आहे. ज्येष्ठ नागरिक आणि गरोदर महिलांच्या सुरक्षित प्रवासासाठी या डेस्कशी संपर्क करावा."
— संतोष ढोके, संचालक, पुणे

मात्र, कालांतराने प्रशासनाने प्रवाशांना एरोमॉलपर्यंत जाण्यासाठी नवीन टर्मिनलसमोरच बॅटरीवरील गाड्या आणि इलेक्ट्रिक बसगाड्यांची व्यवस्था केली आहे. त्यामुळे प्रवासी बस आणि बॅटरीवरील गाड्यांमार्फत एरोमॉलपर्यंत जातात आणि तेथून टॅक्सीने निश्चित स्थळी जातात. परंतु, या ई-बस आणि बॅटरी गाड्यांची सुविधा असली तरी देखील ज्येष्ठ नागरिक आणि गरोदर महिलांची येथून जाताना मोठी कसरत होत होती.

त्याची दखल आता विमानतळ प्रशासनाने घेतली आहे. त्या पार्श्वभूमीवर विमानतळ प्रशासनाने येथे आता फक्त ज्येष्ठ नागरिक आणि गरोदर महिलांसाठी 'मे आय हेल्प डेस्क' सुरू केला आहे. नवीन टर्मिनलसमोरच हा डेस्क असून, या डेस्कमार्फत फक्त ज्येष्ठ नागरिक आणि गरोदर महिला विमान प्रवाशांसाठीच नव्या टर्मिनल परिसरात टॅक्सीला प्रवेश मिळत आहे. त्याद्वारे या प्रवाशांना निश्चित स्थळी सुरक्षित प्रवास करता येत आहे. त्यामुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

# सिंहगडावर पर्यटकाचा दरीत कोसळून मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंहगडावर फिरण्यासाठी आलेल्या ६० वर्षीय पर्यटकाचा किल्ल्याच्या कल्याण दरवाजालगतच्या अतिदुर्गम झुंजार बुरुजावरून ३०० फूट खोल दरीत कोसळून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही घटना रविवारी (दि. २७) सकाळी उघडकीस आली. मृताची ओळख पटविण्याचे काम राजगड पोलिस करत आहेत. ६० वर्षीय पर्यटक हा शनिवारी (दि. २६) सिंहगडावर फिरण्यासाठी आला होता. तो सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास झुंजार बुरुजावरून खोल दरीत कोसळल्याचे गडावरील काही विक्रेत्यांनी पाहिले. मात्र, पोलिसांच्या भीतीमुळे याची खबर कोणाला दिली नाही.

# दिवाळीमुळे भुसार बाजारात उलाढाल वाढली



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिवाळी सणाला कालपासून (सोमवार) झाली आहे. या पार्श्वभूमीवर मार्केट यार्डात फराळासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या खरेदीसाठी मार्केट यार्डात गर्दी होत आहे. दुकानदारांसह किरकोळ ग्राहकही मोठ्या संख्येने बाजारात येत आहे. दरम्यान, मटकी आणि मटकीडाळीच्या दरातील घसरण सुरूच असून, गेल्या आठवड्यातही दरात मोठी घट झाली. मागणीअभावी हरभराडाळ, बेसन, साखरेचे दरही उतरले.

बाजारात साखरेची आवक मुबलक प्रमाणात होत आहे. मात्र, अपेक्षित मागणी नसल्यामुळे दर मंदीतच आहेत. गेल्या आठवड्यातही साखर दरात क्विंटलमागे आणखी पंचवीस रुपयांनी घट झाली. पिठी साखरेस देखील मागणी साधारणच असल्याचे सांगण्यात आले. दिवाळीची खरेदी संपल्यामुळे गुळाची उलाढालही मंदावली आहे. गेल्या आठवड्यात गुळाचे दर सर्वसाधारणपणे स्थिर होते. दरम्यान, डाळींच्या दरात घसरण झाली आहे.

# ड्रोन खरेदीसाठी चार कोटींचा निधी मंजूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना माहिती कळवावी, असेही सूचित केले आहे. केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उप अभियान योजनेमध्ये सन २०२४-२५ अंतर्गत ड्रोन खरेदीसाठी सुमारे चार कोटी रुपयांचा निधीचा वार्षिक कृती आराखडा मंजूर केल्याच्या सूचना कृषी संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण) सुनील बोरकर यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

"पुणेड्रोन खरेदीसाठी व्यक्तिगत शेतकऱ्यांना अनुदान मिळते. त्याचबरोबर ते शेतकरी गट अथवा समूह व शेतकरी कंपन्यांनादेखील मिळू शकते. ड्रोनची किमत १०.१५ लाख रुपये ते १०.४८ लाख रुपयांदरम्यान आहे. ड्रोनची खरेदी कृषी विभागाकडे नोंदणीकृत असणाऱ्या पुरवठादाराकडूनच करावयाची आहे. अनुदानाच्या पन्नास टक्के अथवा जास्तीत जास्त चार लाख रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती देय राहते. मात्र, अर्जदार कृषी पदवीधर असल्यास अनुदानाची मर्यादा पाच लाख रुपये अशी आहे. मात्र, अनुदानाचा दर पन्नास टक्केच राहील."
— सुनील बोरकर, कृषी संचालक, कृषी आयुक्तालय..

केंद्राने सन २०२२-२३ मध्ये राज्यासाठी किसान ड्रोन अर्थसाहाय्य सेवा सुविधा केंद्र स्थापण्यासाठी २५ व कृषी पदवीधरांसाठी १३ असे एकूण ३८ ड्रोनसाठी एक कोटी ६५ लाख रुपयांएवढे अनुदान मंजूर केले होते. या मंजूर लक्षांकापैकी सन २०२२-२३ मध्ये आठ ड्रोन व २०२३-२ मध्ये १७ ड्रोन तसेच उर्वरित १३ ड्रोन सन २०२४-२५ मध्ये ऑफलाइन पद्धतीने



राबविण्यात येऊन सन २०२२-२३ चा मंजूर लक्षांक पूर्ण झाला आहे. कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे यांच्या निर्देशान्वये ड्रोन हा घटक इतर औजारांप्रमाणे महाडीबीटी पोर्टलवर राबविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार ड्रोन हा घटक फार्मर पोर्टलवर अर्ज करण्यासाठी तसेच महाडीबीटी पोर्टलवर निवड प्रक्रियेसाठी सेवा सुविधा केंद्र या घटकामध्ये उपलब्ध करून दिलेला आहे.

## RS NEWS DIGEST

### 'स्वच्छ'कडून ७३ टन पुनर्वापर वस्तूंचे संकलन

**पुणे :** दिवाळीपूर्वी नागरिकांकडून घरातील आवराआवर करताना पुनर्वापर योग्य वस्तू संकलन करण्यासाठी राबवविलेल्या 'स्वच्छ व्ही कलेक्ट'च्या माध्यमातून ७३ टन वस्तू स्वच्छ संस्थेला प्राप्त झाल्या आहेत. कपडे, पुस्तके, भांड्यांसह लहान मुलांची खेळणी अशा विविध वस्तूंचा त्यात समावेश आहे. स्वच्छ संस्थेकडून मागील काही वर्षांपासून 'स्वच्छ व्ही कलेक्ट' हा उपक्रम राबविला जात आहे. नागरिकांकडून गणेशोत्सव, दसरा, दिवाळी या सणासुदीच्या काळात नवीन वस्तूंची खरेदी केली जाते. त्याचबरोबर घरातील पुनर्वापर करण्यायोग्य, जुन्या वस्तू टाकून देण्याकडे कल असतो. या पार्श्वभूमीवर स्वच्छ संस्थेने दरवर्षीप्रमाणे यंदाही पुनर्वापर योग्य वस्तू संकलनाची मोहीम राबविली. यावर्षी ७३ टन वस्तू संकलित झाल्या. त्यात ४५ टन कपडे, पाच टन पुस्तके, चार टन ई-वेस्ट, एक टन भांडी, चार टन खेळणी आणि अन्य साहित्य असे एकूण ७३ टन वस्तूंचे संकलन करण्यात आले. संबंधित वस्तू या पुनर्वापर करण्यासाठी संकलित करण्यात आल्या आहेत.

### मिठाईने दिवाळीचा वाढणार गोडवा

**पुणे :** दिवाळीनिमित्त गिफ्ट देण्यासाठी सध्या मिठाईची मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे. दिवाळीचा गोडवा वाढविण्यासाठी दोनशेहून अधिक प्रकारच्या मिठाई बाजारात उपलब्ध आहेत. यासर्वात बंगाली, राजस्थानी मिठाईला सर्वाधिक पसंती असून फरसाण आणि चिवड्याचीही खरेदी होत आहे.



दिवाळीत पारंपरिक फराळाप्रमाणेच विविध प्रकारची मिठाई चाखली जाते. त्यामुळे बाजारात यंदा काय नवीन गोड पदार्थ आले आहेत याचा शोध घेत खवय्ये स्वीट मार्ट गाठत आहेत. हे पदार्थ खात असताना त्याचा आरोग्यावर काही विपरीत परिमाण होवू नये. खासकरून शरीरातील साखर वाढू नये म्हणून आजकाल नागरिक आरोग्याबाबत जागरूक असल्याने विविध फ्लेवरच्या 'शुगर फ्री' आणि सेंद्रिय पद्धतीने बनवलेल्या मिठाईला पसंती देत आहेत. गेल्या काही दिवसांत विविध प्रकारच्या कुकीज, लो-कॅलरी प्रीमिअम बिस्किटे आणि बेकरी उत्पादनांना सुमारे ३० टक्के मागणी वाढली आहे, अशी माहिती मिठाई विक्रेत्यांनी दिली.

### ३६ ट्रॅव्हल्स बसचालकांना दंड

**पुणे :** दिवाळी सुट्या सुरू झाल्यामुळे गावी जाणाऱ्यांची रेल्वे, एसटीसह खासगी ट्रॅव्हल्सला गर्दी वाढली आहे. मात्र, खासगी ट्रॅव्हल्सवाल्यांकडून प्रवाशांची लूट होऊ नये. तसेच यासह प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पुणे आरटीओच्या पथकाककडून ट्रॅव्हल्स तपासणी सुरू करण्यात आली. पहिल्याच दिवशी ८२ खासगी ट्रॅव्हल्सच्या तपासणीत ३६ ट्रॅव्हल्सकडून नियमभंग झाल्याचे दिसून आल्यामुळे त्यांच्यावर साडेतीन लाख रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली. दिवाळीच्या काळात खासगी ट्रॅव्हल्सकडून तिकीटामध्ये दरवाढ करण्यात आल्याच्या तक्रारी येऊ लागल्या होत्या.

त्यानुसार आरटीओकडून खासगी ट्रॅव्हल्स संघटनांसोबत बैठक घेतली. त्यांना नियमांपेक्षा जास्त तिकीटदर आकारू नये, अशा सूचना दिल्या. तसेच, जास्त तिकीट दर आकारल्यास कारवाईचा इशारा दिला. त्यानुसार आरटीओने दोन पथकांमार्फत गुरुवारी (दि. २४) रात्रीपासून ट्रॅव्हल्सची तपासणी सुरू केली.





### शक्तिप्रदर्शन करत मनिष आनंद यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

**पुणे :** विधानसभा निवडणूकीत छत्रपती शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातून इच्छुक असेलले उमेदवार, खडकी कँटॉन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष मनिष आनंद यांनी सोमवारी प्रचंड शक्तिप्रदर्शन करत आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. एकच आनंद .. मनिष आनंद च्या घोषणांनी संपूर्ण परिसर कार्यकर्त्यांनी दणाणून सोडल्याचे पाहायला मिळाले. मनिष आनंद यांच्या उमेदवारी अर्ज भरण्यासाठी मुळा रोड येथील त्यांच्या कार्यालयापासून भव्य रॅलीची सुरुवात झाली. यामध्ये मनिष आनंद यांचे शेकडो समर्थक सहभागी झाले होते.खडकी, बोपोडी,औंध रोड,मॉडेल कॉलनी मार्गे निघालेल्या या रॅलीचा समारोप घोले रोड येथे करण्यात आला. यानंतर मनिष आनंद यांनी मोजक्या कार्यकर्त्यांसह निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

### बीआरडीएसच्यावतीने भारतातील सर्वात मोठे डिझाईन प्रदर्शन

**पुणे :** निसर्ग चित्र, मुक्तहस्त चित्र, वस्तू चित्र आणि कलाकृती, संकल्प चित्र, कोलाज आदी कलाकृतींबरोबर 3D मॉडेल्स आणि कॅनव्हासेस अशा विविध कलाकृतीचे प्रदर्शन नुकतेच पुण्यात पार पडले. भंवर राठौर डिझाईन स्टुडिओ (बीआरडीएस) या इंस्टिट्यूटच्या वतीने लोहगाव येथील गीताई लॉन्स येथे या प्रदर्शने आयोजन करण्यात आले होते. भारततातील २५ हून अधिक डिझाईन कॉलेज आणि विद्यापीठांनी या प्रदर्शनामध्ये सहभाग नोंदविला. बीआरडीएसच्या वतीने भारतातील सर्वात मोठे डिझाईन प्रदर्शन संपन्न. डिझाईन क्षेत्रातील शिक्षण या क्षेत्रातील नोकरी आणि व्यवसायाच्या संधी तसेच एकंदरीत डिजाईन क्षेत्राविषयीची जागरूकता निर्माण करण्यासाठी या प्रदर्शनाचे आयोजन दरवर्षी भारतातील १२ शहरांमध्ये आयोजित केले जाते. यामध्ये प्रामुख्याने पुणे, मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, नाशिक, बंगलोर, कोलकाता, जयपूर, लखनौ, भोपाळ, हैदराबाद आणि नागपूर आदी शहरांचा समावेश आहे.



## महायुतीत फूट; दौंडमध्ये

# रमेश थोरात आणि राहुल कुलच


रमेश थोरात


राहुल कुल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगांव :** दौंडमध्ये महायुतीत फूट पडली असून, माजी आमदार रमेश थोरात यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला रामराम करून शरद पवार गटाची तुतारी हातात घेतली आहे.

सोमवारी असंख्य कार्यकर्ते व समर्थकांच्या उपस्थितीत रमेश थोरातांनी आपला उमेदवारी अर्ज भरला. मागील लोकसभा निवडणूकांच्यावेळी शरद पवार आणि अजित पवार हे विभक्त झाले. यावेळी अजित पवार यांचे खंदे निष्ठावंत समर्थक माजी आमदार रमेश थोरात यांनी अजित पवार यांच्या बाजूने राहण्याचा ठाम निश्चय घेत, लोकसभेवेळी महायुतीमध्ये प्रवेश केला होता. आणि ते अजित पवार गटामध्ये समील झाले. यावेळी सुनेत्रा पवार यांचा एकत्रित प्रचार करताना सर्व तालुक्यांनी पाहिले. यावेळी राहुल कुल यांनी लोकसभेच्या निवडणुकीत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा लोकसभेच्या निवडणुकीत एकत्रित प्रचाराचे काम केले आहे. भाजपकडुन राहुल कुल यांच्या तालुक्यातील चांगल्या कामगिरीमुळे त्यांना भाजप महायुतीकडून दौंड विधानसभा निवडणुकीसाठी पसंती देण्यात आली.

शेवटी गेली महिनाभर रंगलेल्या तू तू मे मे चर्चेला आता पूर्णविराम मिळत, राष्ट्रवादी शरद पवार गटातील इच्छुकांची अखेर रमेश थोरात यांना पाठिंबा दिल्याने रमेश थोरात यांचा तुतारी चिन्हावर लढण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला.

दौंड तालुक्यातील गेले दोन महिने चाललेल्या शक्तिप्रदर्शन आणि चलबिचल राजकीय घडामोडींचा मतदारांनी सुद्धा चांगलाच आनंद घेतला आहे. आता या निवडणुकीत कोण बाजी मारणार याची संपूर्ण दौंड तालुक्याला आता उत्सुकता लागली आहे.

## खेड-आळंदीत दोन सासऱ्यांची जावयांसाठी फिल्डिंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

विधानसभा निवडणुक २०२४

**राजगुरूनगर :** खेड-आळंदी विधानसभा मतदार संघात दोन बड्या सासऱ्यांनी आपल्या जावयांना आमदार करण्यासाठी फिल्डिंग लावल्याचा गौप्यस्फोट राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे इच्छुक उमेदवार अतुल देशमुख यांनी केला. चांडोली येथे आपल्या समर्थक मेळाव्यात त्यांनी सबुरीचा मंत्र दिला. त्यांचा रोख भोसरीचे आमदार विलास लांडे यांचे जावई सुधीर मुंगसे आणि खेडचे कारभारी नानासाहेब टाकळकर यांचे जावई बाबाजी काळे यांच्यावर होता. काळजी करुन नका खेडचा निकाल अतुल देशमुखच ठरवणार असं म्हणत त्यांनी सर्वांनांच आव्हान दिले आहे. मात्र आपण शरद पवार गटात रहाणार असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले.

दरम्यान, खेड आळंदी मतदार संघात २०१९ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दिलीप दत्तात्रय मोहिते निवडून आले होते. त्यांनी शिवसेना उमेदवार सुरेश नामदेव गोरे यांचा पराभव केला होता. दिलीप मोहिते यांना ९६,८६६ तर गोरे यांना ६३,६२४ मते मिळाली होती. त्यावेळी अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरलेले अतुल देशमुख यांनी निवडणुकीत रंगत आणली होती. त्यांनी ५३,८७४ मते घेतली होती. त्यामुळे त्यांच्या भूमिकेला महत्व प्राप्त झाले आहे.

## Selected

## भांबर्डेत जखमी मोराला प्राणीमित्रांकडून जीवदान



**शिक्रापूर:** भांबर्डे (ता. शिरुर) येथे मागील आठवडा भरापासून पायाला दुखापत झालेल्या मोराला जीवदान देण्यात प्राणीमित्रांना यश आले. भांबर्डे येथील खेडकर वस्ती येथे एक मोर जखमी अवस्थेत चालत असल्याचे येथील नागरिकांना दिसले. त्यानंतर हनुमंत खेडकर, यश खेडकर, कावेरी खेडकर यांनी या मोराला गोठयामध्ये बंद करत याबाबतची माहिती निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख यांना दिली. त्यानंतर शेरखान शेख, शुभम वाघ, पोलीस पाटील शैला खेडकर यांनी जखमी मोराला ताब्यात घेत, याबाबतची माहिती शिरुर वनविभागाचे वनपरिमंडळ अधिकारी भानुदास शिंदे, नियतक्षेत्र अधिकारी संतोष भुतेकर यांना दिली. पुढील उपचारासाठी बावधन येथील शासकीय प्राणी अनाथालयच्या नियतक्षेत्र अधिकारी ऋतुजा भोरडे, रेस्क्यू ट्रस्टचे अमित तोडकर, आकाश राऊत यांच्या ताब्यात त्याला देण्यात आले.

## शेताच्या बांधावर जात मतदान जनजागृती



**शिक्रापूर :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने शिरूर विधानसभा मतदारसंघात विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देवून मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदारांना आवाहन करण्यात येत असताना स्वीप पथकामार्फत अनेक गावातील शेताच्या बांधावर जावून प्रत्येक शेतकरी मतदाराच्या भेटी घेवून मतदान जनजागृती करण्यात आली आहे.पिंपळे जगताप येथे शिरुर विधानसभेच्या निवडणूक निर्णय अधिकारी संगिता राजापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप नोडल अधिकारी तथा शिरूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांच्या अधिपत्याखाली मतदारसंघातील विविध गावात मतदार जनजागृती कार्यक्रम राबविला जात आहे. मतदानाचा टक्का वाढावा तसेच लोकशाहीच्या या महाउत्सवात प्रत्येक मतदाराने सहभाग नोंदवत मतदानाचे आपले कर्तव्य बजावावे, असे आवाहन या माध्यमातून करण्यात येत आहे. पिंपळे जगताप येथे सेवाधाम मतिमंद निवासी विद्यालयातील विद्यार्थी व पालकांमार्फत देखील मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांकडून आई वडिलांना मतदान करण्यासाठी पत्र लिहित विद्यार्थ्यांच्या पालकांना मतदानाची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाला समाज कल्याण विभागाचे अतुल टाकळकर यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक पवन कट्यारमल यांसह शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# खेडच्या पश्चिम भागात भात काढणीला वेग

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** खेडच्या पश्चिम पट्यातील वाडा, वाळद, आव्हाट, खरोशी, डेहणे, धुवोली, शिरगांव, भिवेगांव, भोरगिरी यांसह अन्य भागात भात कापणीसह भात झोडणीच्या कामाला वेग आला आहे. त्यामुळे कामाला मजूर मिळवण्यासाठी भात शेती मालकांची लगबग मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे.

भाताचे आगार म्हणून ओळखले जाणाऱ्या खेड तालुक्याच्या पश्चिम पट्यात पावसाने उसंत घेतली आहे. यामुळे रखडलेल्या भात कापणीसह भात झोडणीच्या कामांना वेग आला आहे. खेडमध्ये भात हेच खरिपातील मुख्य पीक आहे. सध्या ते परिपक्व झाले असून, कापणी सुरू झाली आहे. कापणीबरोबरच झोडणीची कामेही सुरू आहे. परंतु शेताच्या कामासाठी मजूरवर्ग मिळेनासा झाल्याने सावड पद्धतीने भाताची कापणी करण्यास शेतकरी प्राधान्य देत आहेत.

पाऊस दीर्घकाळपर्यंत राहिल्याने पाण्याची असलेली उपलब्धता व जमिनीत असलेल्या ओलीचा उपयोग करून घेण्यासाठी खरिपाची पिके काढून रब्बी हंगामाच्या पिकांसाठी शेतीचे क्षेत्र मोकळे करण्यास शेतकरी प्राधान्य देतो आहे.

**लगबग सुरू**

- खेडच्या पश्चिम पट्ट्यात सुमारे ३१४० हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड केली होती. हळवा आणि गरवा अशा दोन प्रकारात भातलागवड होत असून, हळवा भातपीक साधारण १०० ते १०५ दिवसात कापणीस येत असून, गरवा भाताच्या पिकास सरासरी १२० ते १२५ दिवस कालावधी अपेक्षीत असतो. सद्य स्थितीत हळवा प्रकारच्या भाताच्या पिकाची कापणी करण्यास सुरुवात झाली आहे.



## आदिवासी कातकरी कुटुंबांची दिवाळी गोड!


चाकण ( ता. खेड ) येथील कातकरी वस्तीवर दिवाळी निमित्त किरण वाटप. छायाचित्र : अविनाश दुधवडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** चाकण (ता. खेड) जवळील कातकरी वस्तीवरील एकूण बावीस कुटुंबांना दिवाळी निमित्त सामाजिक संस्थाच्या वतीने आवश्यक किराणा किटचे वाटप करण्यात आले . त्यामुळे या गोरगरीब, आदिवासी कुटुंबांची दिवाळी गोड झाली आहे.

मानवतेच्या भावनेतून चाकण जवळील आदिवासी कातकरी कुटबांना दिवाळीनिमित्त किराणा मालाचे वाटप करण्यात आले. यामध्ये एक तेलपुडा, साखर, रवा, मैदा, हरभरा डाळ, मोती साबण, सुगंधी तेल, पणत्या, उटणे, व मिठाईचा पूडा तसेच बिस्कीटे यांचा समावेश होता. कातकरी कुटुंबे ही अनेक वर्षापासून चाकण येथील स्वप्ननगरी जवळील माळरानावर वास्तव्यास आहेत. रस्ता, वीज, पाणी या मुलभूत सुविधाही अद्याप त्यांच्यापर्यंत पोचल्या नाहीत. हातावर पोट असणारी ही कुटुंबे रोजच मजुरीसाठी दुसऱ्यांच्या शेतात राबतात. कधी खेकडे, मासे, भंगार विकून स्वतःची गुजराण करतात. मात्र त्यांना दिवाळीचा आनंद घेता यावा. त्यांचीही दिवाळी गोड व्हावी म्हणून चाकण फांऊडेशन व मित्रपरिवाराने रोख वर्गणी जमा करून या कुटुंबांना वीस हजार रुपये किंमतीचा किराणा वाटप केला. दिवाळी फराळ बनवण्याकरीता किराणा मिळाल्याने महिलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार मनोहर मोहरे यांनी मानले.

## निवडणूक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** आंबेगाव विधानसभा मतदासंघांतर्गत निवडणूक कामाकरिता नियूक्त केलेल्या मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकरी एक, दोन, तीन या अधिकार्यांसाठी ईव्हीएस हाताळणीचे प्रशिक्षण आयोजित केले होते. अवसरी खुर्द (ता. आंबेगाव ) येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कवयित्री शांता शेळके सभागृह येथे आयोजित प्रशिक्षणावेळी आंबेगाव विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागिय अधिकारी जुन्नर-आंबेगाव गोविंद शिंदे,सहायक निवडणूक निर्णय अधिकार तथा तहसिलदार संजय नागटिळक, सहायक निवडणूक निर्णय अधिकार तथा गटविकास अधिकारी प्रमिला वाळूंज, निवडणूक नायब तहसिलदार सचिन वाघ आदि अधिकारी उपस्थित होते. शनिवार (दि.२६) व रविवार दि.२७) या दोन दिवसीय सत्रात आयोजित केलेल्या प्रशिक्षणात कंट्रोल यूनिट,बॅलेट यूनिट-ईव्हिएम व व्हिव्हिपॅट मशिनच्या वापराचे प्रशिक्षण देण्यात आले.सहायक निवडणूक अधिकारी तथा तहसिलदार संजय नागटिळक व त्यांच्या सहकार्यांनी मतदान यंत्राबाबत अत्यंत सोप्या भाषेत प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिले व प्रात्यक्षिक करून दाखवले.

## लोकशाहीचा राखू मान, करु शंभर टक्के मतदान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** खेड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारापाटी कमान या शाळेमध्ये मतदान विषयक जनजागृती अभियान राबविण्यात आले.

खेड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत बारापाटी शाळेने स्वयंप्रेरणेने एक आकर्षक सेल्फी पॉईंट बनवला आहे. त्यामध्ये उभे राहून नागरिकांनी अधिका-यांनी ग्रामस्थ व पालकांनी देखील फोटो काढले आणि शंभर टक्के मतदानाचा संकल्प केला. केंद्रप्रमुख संजीवनी घाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे मुख्याध्यापक संजय नाईकरे व सहशिक्षिका वैशाली मुके यांनी राबविलेल्या या अभिनव उपक्रमांची दखल घेत पुणे ज़िल्हा परिषद शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी शाळेला भेट देऊन विद्यार्थी, शिक्षक व अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

"लोकशाहीचा राखू मान, करु या शंभर टक्के मतदान" या अभियानांतर्गत आपल्या परिसरातील आणि गावातील नागरिकांनी शंभर टक्के मतदान करावे, असे आवाहन बारापाटी शाळेच्या वतीने करण्यात आले. या शाळेतील विद्यार्थ्यांनी सलग आठ दिवसांच्या मतदार जनजागृती अभियानांतर्गत विविध उपक्रमांच्या माध्यमातून मतदान विषयक जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये रांगोळी स्पर्धा, मतदान विषयक चित्रकला स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, निबंध स्पर्धा, पथनाट्य सादरीकरण, संकल्प पत्र, लाडक्या लेकीचे आई-वडिलांना पत्र अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून मतदान विषयक जनजागृती करण्यात आली. मागील सर्व निवडणुकांच्या मध्ये सुद्धा या शाळेच्या वतीने विविध उपक्रम राबवून मतदानाबाबत मतदारांमध्ये जनजागृती करून नागरिकांना शंभर टक्के मतदानासाठी प्रवृत्त करण्यात आले.

## जुन्नर मतदारसंघात सात उमेदवारी अर्ज

**जुन्नर :** जुन्नर विधानसभा मतदार संघाच्या निवडणूकी करिता सोमवार दि २८ रोजी सात उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी घाडगे यांनी दिली.

जुन्नर विधानसभा मतदार संघाकरिता अतुल बेनके राष्ट्रवादी कॉंग्रेस, देवराम लांडे वंचित बहुजन आघाडी, रमेश हांडे अपक्ष, माऊली खंडागळे अपक्ष, माऊली खंडागळे शिवसेना ठाकरे गट, आशा बुचके अपक्ष, काळू गागरे अपक्ष, शरद सोनवणे अपक्ष या उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

## निवडणूक प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कामकाजाच्या अनुषंगाने अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली जबाबदारी चोखपणे पाडावी, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करावी, अशा सूचना निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी दिले.

अभियांत्रिकी महाविद्यालय माळेगाव येथे आयोजित दोन दिवसीय प्रशिक्षण सत्राच्यावेळी ते बोलत होते. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी गणेश शिंदे, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी महेश हरिश्चंद्रे, नायब तहसीलदार पूनम दंडिले आदी उपस्थित होते.

नावडकर यांनी मतदानाची प्रक्रिया, मतदान यंत्र हाताळणी, वाहतूक, मतदान केंद्रांची रचना, केंद्रावरील सुरक्षा व्यवस्था, अभिरुप व ईडीसी मतदान प्रक्रिया, दिव्यांग मतदारांचे मतदान, मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे अहवाल, निवडणूकविषयक कागदपत्रे आदीबाबत संगणकीय सादरीकरणाद्वारे माहिती देऊन ते म्हणाले, या सर्व बाबींमध्ये अतिशय काळजीपूर्वक भूमिका बजावावी. निवडणुकीचे कामकाज अतिशय गांभीर्याने घ्यावे, याकामी कोणताही हलगर्जीपणा करु नका, असेही ते म्हणाले.

दि. २६ व २७ ऑक्टोबर या दोन दिवशीय आयोजित प्रशिक्षणात मतदान केंद्रांवर नियुक्त केंद्राध्यक्ष, सहाय्यक केंद्राध्यक्ष व इतर सहायक कर्मचारी असे ३ हजार १२० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. मतदान यंत्र ईव्हीएम हाताळणी आणि निवडणूक प्रक्रियेविषयी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले.

**जाहीर नोटीस**

तमाम सर्व लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत सौ. वैशाली यशवंत कापसे यांचे मालकी वहिवाटीची असून, सदर मिळकत व मिळकतीमधील सर्व तदंगभूत वस्तूंसहितः वहिवाटीचे व इजमेंटचे हक्कासहित आमचे अशिलांना तबदील करण्याचे ठरविले आहे. सदर दुकानाचे हक्कांबाबत व प्रभुत्वाबाबत शहनिशा करण्याचे हेतूने व स्वामित्व (टायटल) हक्काचे पडताळणीसाठी प्रस्तुतची जाहीर नोटीस देण्यात येत आहे. तरी सर्व कायेदशीर व्यक्ती त्यांचे सदर गाळा/दुकानावर मालकीहक्क दर्शविणारे मूळ दस्तऐवज कागदपत्रे, खरेदी, अदलाबदल, गहाण वा कोणत्याही कसल्याही स्वरूपाचा बोजा, कौटुंबिक व्यवस्थापत्र, करार, बक्षीस, वाटणी, लीन, लीज, कर्ज, पोटगी, वहिवाट अथवा कोणत्याही न्यायालयाचे हुकूम, आदेश वा अन्य कोणत्याही स्वरूपाचे कसलेही हक्क हितसंबंध, अधिकार इ. असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ (सात) दिवसांचे** आत लेखी कळवून त्याबाबतच्या योग्य त्या कागदपत्रांनिशी आमचे अशिलांची खात्री पटवून द्यावी; अन्यथा सदर दुकानामध्ये कोणाचेही कसलेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे गृहीत धरून आमचे अशील त्यांचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर त्याबाबत कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :** तुकडी पुणे, पोटतुकडी ता. हवेली, मे. सब रजिस्ट्रार साहेब यांचे हद्दीतील तसेच पुणे महानगरपालिका यांचे कार्यक्षेत्रातील धनकवडी सर्वे क्र.: ३७/५ यासी क्षेत्र १९ आर वर बांधलेल्या **समर्थ कॉम्प्लेक्स** या इमारतीतील तळ मजल्यावरील दुकान नं. -९ (ओ-९) यांसी क्षेत्र ३६६.५६ चौ. फूट म्हणजेच ३४.०६ चौ.मी. हा या प्रस्तुतच्या टीसचा विषय आहे.

पुणे, दि. २७/१०/२०२४

**ॲड.श्रीकांत वाघचौरे,** बी.कॉम., एल.एल.बी.
समर्थ कॉम्प्लेक्स, धनकवडी बसस्टॉपजवळ,
पुणे ४११०४३. मो.: ९४२२३२२३४७

### मेघ मल्हार संगीत क्लासमध्ये कवी संमेलनास रसिकांचा उदंड प्रतिसाद

# सासवड येथे काव्य दीपावली उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड :** दिवाळी सणाच्या निमित्ताने पुरंदर कला मंचने काव्य रसिकांसाठी आयोजित केलेल्या काव्य दिपावली या कवी संमेलनास रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. सासवड येथील मेघ मल्हार संगीत क्लास मध्ये आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रानकवी हनुमंत चांदगुडे व विशेष अतिथी म्हणून गझलकार सुभानन चिंचकर उपस्थित होते. याच कार्यक्रमात पुरंदर कलामंचच्या वतीने वीर येथील प्रसिद्ध ढोलकीवादक नंदकुमार उर्फ पिंटू कुडाळकर यांचा जुन्या काळातील कलावंत म्हणून विशेष सन्मान करण्यात आला.

मुस्कान, कुंदन जगताप, ज्ञानेश्वरी लांडगे, शरद पाडसे, रेश्मा कामथे, नीता सुभागडे, ऋता खांडेकर, नसरीन अन्सारी, पराग दिवेकर, निलेश शिंदे यांसह ज्येष्ठ कवी अनिल कदम या स्थानिक कवींनी वेगवेगळ्या सामाजिक विषयांवर आपल्या रचना सादर केल्या. नसरीन यांची शब्दांचे माहेर, रेश्मा कामथे यांची एक दिवा, पराग दिवेकर यांची अशी कबुतरे येती, नीता सुभागडे यांच्या आठवते का बघ, नीलम क्षीरसागर यांची दीव्यांग या रचनांना रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात हनुमंत चांदगुडे यांची "नको माझ्या बाळा असा धिक्कारू अवेळी.. व्हावा आधार तू माझा आयुष्याच्या सांजवेळी" ही वृध्दाश्रमावर भाष्य करणारी तसेच अवती भोवती मळ्यात माझ्या घानेरीची फुल.. न मळवट भरलाय बाभळीन कानात पिवळी डूल या रचना आणि सुभानन चिंचकर् यांची काडीपेटी या रचना रसिकांच्या टाळ्या घेवून गेल्या. डॉ दिनेश जगताप यांनी प्रास्तविक तर क्षितीज निरगुडे यांनी सुत्र संचालन केले. संजय काटकर यांनी आभार मानले. अमोल बागडे, परशूराम देशमुख, डॉ राजेश दळवी, डॉ घनशाम खांडेकर, राजकुमार पवार, तानाजी सातव, राजाभाऊ बाठे, अमोल बागडे, केलास बेल्हेकर, अमोल बेलसरे, डॉली पंडोल,गणेश बागडे स्नेहा शेवाळे यांसह अनेक साहित्य प्रेमी या प्रसंगी उपस्थित होते.

#रा

## सुरक्षारक्षकाचा मृतदेह खडकवासला धरणात सापडला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खडकवासला :** पानशेत रस्त्यावरील मालखेड (ता. हवेली) येथील ओढ्यालगतच्या खडकवासला धरण पाणलोट क्षेत्रात रविवारी सकाळी दहाच्या सुमारास वेंकटेश्वर हॅचरीच कंपनीतील बेपत्ता सुरक्षारक्षकाचा मृतदेह सापडला.

प्रसनजित इंद्रजित सिन्हा (वय ३८, सध्या रा. वरदाडे, ता. हवेली, मूळ रा. आसाम) मृताचे नाव आहे. वरदाडे गावच्या स्मशानभूमी शेजारील ओढ्यालगत धरणाच्या पाणलोट क्षेत्रात प्रसन्नजित याचा मृतदेह तरंगताना स्थानिक शेतकऱ्यांनी पाहिला.

**प्रतिज्ञापत्र**

मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे यांस मागितलेवरून प्रतिज्ञापत्र करतो कि मी, मंगल अरुण भुजबळ, वय ४५, वर्षे, धंदा गृहिणी रा. महाराष्ट्र बैंक जवळ, रांजणगाव गणपती ता. शिरुर जि. पुणे. सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की, माझे पती कै. अरुण कोंडिभाऊ भुजबळ यांचे दि. २७/०३/२०२२ रोजी रांजणगाव गणपती येथे निधन झाले. ग्रामपंचायत रांजणगाव यांनी दिलेला मृत्युचा दाखला सोबत जोडला आहे. प्रादेशिक अधिकारी पुणे यांचे कार्यालयात खालील वर्णनाचे वाहन नोंदविण्यात आलेले आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे :

१. मारुती व्हिटारा ब्रिझा क्रमांक MH 12 RF 8206 मॉडेल २०१९ उत्पादक मारुती
माझे मुलाचे पश्चात खालील प्रमाणे वारसदार आहेत.

| अ.क्र. | नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | मंगल अरुण भुजबळ | ४५ | पत्नी |
| २ | शुभम अरुण भुजबळ | २५ | मुलगा |
| ३ | भुवन अरुण भुजबळ | २३ | मुलगा |

वरील वारसांशिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत. वरील वाहन माझे नावावर करणेसाठी सदर प्रतिज्ञापत्र करीत आहे. वरील हस्तातरणाच्या बाबतीत कोणतीही कायदेशीर अडचण आल्यास मी जबाबदार राहीन. प्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे राहणार नाहीत. तरी कृपया कायदेशीर वारस म्हणून सदर वाहन माझे नावावर करून मिळावे ही विनंती.

आमचे कुटुंबाचे रेशन कार्ड नंबर के के ०१३५२३ असुन वरील रेशनकार्डप्रमाणे सर्व वारसदारांची नावे लिहिली असुन त्यातील प्रत्येकाने संमती दिलेली आहे.

प्रतिज्ञापत्र आज दि. २८/१०/२०२४ रोजी पुणे मुक्कामी केले असे.

दिनांक :- २८/१०/२०२४

ॲफिडेव्हिट करणारांस ओळखतो.

फोटो

शिक्का

सही/-
**अभिषेक हनुमान मिसाळ**
पत्ता : सोनार आळी, शिरुर
ता. शिरुर जि. पुणे.

**ॲफिडेव्हिट करणार**
सही/-
**मंगल अरुण भुजबळ**
संमती देणार
**शुभम अरुण भुजबळ**
**भुवन अरुण भुजबळ**

## अजित पवार यांची ग्वाही, अर्ज दाखल

# कोणतीही योजना बंद होणार नाही !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** लाडकी बहिण योजनेसह महायुती सरकारच्या अन्य कोणत्याही योजना बंद होणार नाहीत आणि त्या पुढील काळात सुरू राहण्यासाठी महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

कन्हेरी (ता. बारामती) येथील मारुतीरायाच्या दर्शनानंतर, प्रचाराचा नारळ फोडल्यानंतर तसेच नामांकन अर्ज भरल्यानंतर, प्रचाराच्या शुभारंभ प्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. याप्रसंगी खा. सुनेत्रा पवार, आमदार अमोल मिटकरी आणि तालुक्यातील महायुतीचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तत्पूर्वी, बारामती शहरातून भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कसबा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रॅलीला प्रारंभ करण्यात आला. यामध्ये हजारो कार्यकर्ते तसेच मतदारांनी सहभाग घेतला होता.

अजित पवार म्हणाले की, लाडकी बहिण योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज बील याबाबत विरोधक टीका करतात. ज्याचे हातावरचे पोट आहे, त्यांना दीड हजार रुपयांची किंमत कळते. रक्षाबंधनाच्या अगोदर बहिणींच्या खात्यावर म्हणूनच पैसे जमा केले आहेत. याबाबत विरोधकांना वाईट का वाटते, असा प्रश्न त्यांनी केला.

ते म्हणाले की, भारतात विकासाच्या बाबतीत महाराष्ट्रात जास्त गुंतवणूक होत असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्र गुजरातच्या पाठीमागे आहे. हा विरोधकांचा आरोप आपल्या राज्याला कमी दाखवणारा आहे. या निवडणुकीत विरोधक भावनिक होत तुम्हाला आवाहन करतील. मात्र, भावनिक होऊन विकास होत नाही. म्हणून बारामतीचे नाव आता मला भारतात विकासाचे मॉडेल म्हणून करायचे आहे. त्यासाठी आपल्याला मतदान करा, असे आवाहन त्यांनी केले.

## शक्ती प्रदर्शनात शिवतारे यांचा अर्ज दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड :** माजी आमदार विजय शिवतारे यांनी सोमवारी आपल्या समर्थकांसह शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. शिवसेना शिंदे गटाच्या वतीने त्यांना उमेदवारी मिळाली असून, रिपब्लिकन पार्टी आठवले गट, भारतीय जनता पार्टी व इतर मित्र पक्षाच्या वतीने त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेवारी अर्ज दाखल केल्यानंतर येथील मोहीनी चौकात त्यांनी सभा घेतली.

या सभेत बोलताना शिवतारे म्हणाले की, गेल्या ५ वर्षांत कोणत्याही प्रकारची कामे झाली नाहीत तसेच गुंजवणी पाणी प्रश्न सुटला नाही, विज पुरवठा सुरळीत होत नाही. फुरुसुंगीसह इतर गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही. विविध विकास कामे रखडली आहेत. पुन्हा सत्तेवर आल्यानंतर ही कामे तातडीने मार्गी लागली जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.

या वेळी माजी आमदार अशोक टेकवडे, बाबासाहेब जाधवराव, संभाजी कुंजीर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## अक्षय जाधवांचा महाराष्ट्र स्वराज्य पक्षात प्रवेश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** पुणे जिल्हा शिवसेना संघटक अक्षय जाधव यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत माजी महाराष्ट्र स्वराज्य पक्षात रविवारी (दि. २७) प्रवेश केला. प्रवेश झाल्यानंतर छत्रपती संभाजीराजे यांनी त्यांची अधिकृत उमेदवार म्हणून घोषणा केली आहे.
जाधव यांनी शुक्रवारी (दि. २५) मोठे शक्तीप्रदर्शन करत अपक्ष अर्ज दाखल केला होता.

## विद्यार्थ्यांना सहलीचे गिफ्ट



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** निरगुडसर (ता.आंबेगाव ) येथील निरगुडेश्वर शिक्षण विकास मंडळाच्या पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक (एन.एम.एम.एस) परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असल्याने व ते शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या ३६ विद्यार्थ्यांना स्पूर्ती मिळावी व या विद्यार्थ्यांचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनी घ्यावा यासाठी शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांसाठी ओझर आणि शिवनेरी या ठिकाणी सहलीचे आयोजन संस्थेच्या वतीने केले आहे, असे प्राचार्य कांताराम टाव्हरे यांनी सांगितले.

## आमदार दिलीप मोहिते यांच्यावर ९० लाखांचे कर्ज



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** खेडचे आमदार दिलीप मोहिते यांनी विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून सोमवारी (दि. २८) मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत जंगी सभा घेऊन अर्ज दाखल केला. आमदार मोहिते यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार त्यांच्यावर ९० लाख ७१ हजार ८७३ रुपयांचे कर्ज असून पत्नी सुरेखा मोहिते यांच्यावर ८१ लाख ७१ हजार ६१० रुपयांचे कर्ज आहे.

आमदार मोहिते यांची शैक्षणिक पात्रता १० वी पास आहे. मोहिते यांच्यावर मराठा क्रांती मोर्चा आंदोलन, अट्रॉसिटी, विनयभंग, बैलगाडा शर्यत आंदोलन आणि कंपनी कायदा अन्वये गुन्हे दाखल आहेत. त्यांच्याकडे २० तोळे सोने व १ किलो चांदी असून पत्नीकडे ३० तोळे सोने व १ किलो चांदी आहे. दिलीप मोहिते यांच्याकडे ५ हेक्टर ८७ गुंठे जमीन असून त्याचे मूल्यांकन १९ कोटी २१ लाख ८५ हजार २०१ रुपये आहे. सुरेखा मोहिते यांच्याकडे ८ हेक्टर ४८ गुंठे जमीन असून त्याचे मूल्यांकन १९ कोटी ४७ लाख ९० हजार ४४३ एवढे आहे. मोहिते कुटुंबाकडे १ दुचाकी व ३ चारचाकी आहेत.

## जेजुरीत रक्तदान शिबीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी, दुर्गामाता ट्रस्ट व श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्ट यांच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमास नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला.

थॅलेसेमिया तसेच डायलिसिस रुग्णांसाठी सध्या असलेला रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी सेवाभावी कार्य म्हणून या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे रक्तदान शिबिर मल्हार भक्तनिवास येथे घेण्यात आले. जेजुरी देवसंस्थानच्या सहकार्याने प्रथमच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पुरातत्व विभागाचे, सहा. संचालक विलास वहाणे यांच्या हस्ते करण्यात आले.



## भारताला 'एव्हिएशन हब' बनवू; मोदी यांचा निर्धार

# 'टाटा एअरक्राफ्ट कॉम्प्लेक्स'चे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वडोदरा :** गेल्या दशकात भारताच्या विमान वाहतूक क्षेत्राची अभूतपूर्व वाढ आणि परिवर्तन तुम्ही सर्वांनी पाहिले आहे. आम्ही भारताला 'एव्हिएशन हब' बनवण्यासाठी काम करत आहोत. या परिसंस्थेमुळे भविष्यात 'मेड इन इंडिया' नागरी विमानांचा मार्ग मोकळा होईल. विविध भारतीय विमान कंपन्यांनी १२०० नवीन विमानांची ऑर्डर दिली आहे. भारत आणि जगाच्या भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी नागरी विमानांच्या डिझाइन आणि निर्मितीमध्ये हा कारखाना महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. मोदी आणि स्पेनचे अध्यक्ष पेड्रो सांचेझी यांच्या हस्ते सी-२९५ विमानांच्या निर्मितीसाठी 'टाटा एअरक्राफ्ट कॉम्प्लेक्स' चे उद्घाटन करण्यात आले. तत्पूर्वी भारत भेटीवर पहिल्यांदाच आलेल्या सांचेझी यांच्यासह मोदी यांनी वडोदऱ्यात रॅली काढली. मोदी म्हणाले, की माझा मित्र पेड्रो सांचेझ यांची ही पहिलीच भारत भेट आहे.



आजपासून आम्ही भारत आणि स्पेन यांच्यातील भागीदारीला नवी दिशा देत आहोत. आम्ही सी-२९५ विमानांच्या उत्पादन कारखान्याचे उद्घाटन करत आहोत. या कारखान्यामुळे भारत-स्पेन संबंध तसेच 'मेक इन इंडिया, मेक फॉर द वर्ल्ड' मिशन अधिक मजबूत होईल. या वेळी रतन टाटा यांचेही मोदी यांनी स्मरण केले. ते म्हणाले, की नुकतेच आपण देशाचे महान सुपुत्र रतन टाटा यांना गमावले. ते असते, तर त्यांना अधिक आनंद झाला असता. हा सी-२९५ विमान कारखाना नव्या भारताची नवीन कार्यसंस्कृती प्रतिबिंबित करतो. मी गुजरातचा मुख्यमंत्री असताना वडोदरात ट्रेनचे डबे बनवण्याचा कारखाना काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. कारखानाही विक्रमी वेळेत उत्पादनासाठी सज्ज झाला. आज आपण त्या कारखान्यात बनवलेले मेट्रोचे डबे इतर देशांमध्ये निर्यात करत आहोत.

भविष्यात या कारखान्यात तयार होणारी विमाने इतर देशांमध्येही निर्यात केली जातील, असा मला पूर्ण विश्वास आहे.

मोदी म्हणाले, 'आज भारतातील संरक्षण उत्पादन परिसंस्था नवीन उंचीला स्पर्श करत आहे. दहा वर्षांपूर्वी जर आपण ठोस पावले उचलली नसती, तर आज ही पातळी गाठणे अशक्य झाले असते. संरक्षण निर्मिती भारतात एवढ्या मोठ्या प्रमाणावर होऊ शकते, याची कल्पनाही त्या वेळी कोणीही केली नसेल; पण आम्ही नव्या वाटेवर चालायचे ठरवले, स्वतःसाठी नवीन ध्येय ठेवले. आज निकाल आपल्या समोर आहे. आम्ही संरक्षण उत्पादनात खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवला. सार्वजनिक क्षेत्र कार्यक्षम केले. शस्त्रास्त्र कारखान्यांचे सात मेगा-कंपन्यांमध्ये रूपांतर केले. 'डीआरडीओ' आणि 'एचएएल'ला मजबूत केले. उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये दोन प्रमुख संरक्षण कॉरिडॉर तयार केले. अशा अनेक निर्णयांनी संरक्षण क्षेत्रात नवी ऊर्जा भरली.

### ४० विमानांची भारतात बांधणी

- सी-२९५ कार्यक्रमांतर्गत एकूण ५६ विमाने तयार केली जाणार आहेत, त्यापैकी १६ विमाने थेट स्पेनमधून एअरबसद्वारे वितरित केली जात आहेत आणि उर्वरित ४० भारतात बांधली जाणार आहेत. 'टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्स लिमिटेड' या ४० विमानांची निर्मिती भारतात करणार आहे. ही सुविधा भारतातील लष्करी विमानांसाठी खासगी क्षेत्रातील पहिली 'फायनल असेंब्ली लाइन'असेल.

# कैदेत मृत्यू पावलेल्याच्या कुटुंबियांना घर, नोकरी : योगी आदित्यनाथ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनऊ :** उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊमध्ये मोहित पांडे नावाच्या तरुणाचा पोलिस कोठडीत मृत्यू झाला. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी पांडेच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्याच्या कुटुंबाला दहा लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. कुटुंबासाठी घर आणि मुलांना मोफत शिक्षणाची व्यवस्थाही सरकार करणार आहे.

मोहितच्या कुटुंबीयांशी झालेल्या भेटीदरम्यान आदित्यनाथ म्हणाले, की संपूर्ण प्रकरण माझ्या माहितीत आहे आणि चौकशीनंतर कठोर कारवाई केली जाईल. दोषी पोलिसांना सोडले जाणार नाही.



पोलिस कोठडीत मृत्यू झालेल्या मोहित पांडे या तरुणाच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबीयांचे सांत्वन करताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ.

चिन्हाटमधील कोठडीतील मृत्यूच्या प्रकरणावर उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक म्हणाले, "हे दुर्दैवी आहे. सरकारने याची गंभीर दखल घेतली आहे. उच्चस्तरीय चौकशी सुरू आहे. आरोपी पोलिसांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये जो कोणी सहभागी असेल त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. सरकार पीडित कुटुंबाच्या पाठीशी आहे, आम्ही त्यांना न्याय मिळवून देऊ."

३२ वर्षीय कापड व्यावसायिक मोहित पांडे यांचा रविवारी पोलिस कोठडीत मृत्यू झाला. शांतता भंग केल्याप्रकरणी कापड व्यापाऱ्याला अटक करण्यात आली. पोलिस कोठडीत मृत्यूनंतर खून आणि गुन्हेगारी कट रचल्याच्या आरोपाखाली लखनौमधील चिन्हाट पोलिस स्टेशनचे ठाण्याचे अधिकारी आणि इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहितचा शेजारी आदेश कुमारसोबत एका क्षुल्लक गोष्टीवरून वाद झाला होता. यानंतर मोहितला पोलिस ठाण्यात आणले असता त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर स्थानिकांनी पोलिस आणि इतर आरोपींवर कारवाईची मागणी करत निषेध केला. मोहितच्या कुटुंबीयांनी दावा केला की, पोलिसांनी त्याच्या काका आणि राजकीय नेत्याच्या सांगण्यावरून, त्याला अमानुषपणे मारहाण केली. त्यात त्याचा मृत्यू झाला.

# 'भाजप स्वबळावर जिंकणे अशक्य!- देवेंद्र फडणवीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रात भारतीय जनता पक्ष स्वबळावर जिंकू शकत नाही; पण तो सर्वात मोठा पक्ष म्हणून निश्चितच पुढे येईल, असे महत्त्वपूर्ण विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी हे विधान केल्यामुळे त्याची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

फडणवीस एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले, की राज्यात भाजप स्वबळावर विधानसभा निवडणूक जिंकू शकत नाही; पण आमच्याकडे सर्वाधिक जागा व सर्वाधिक मतांची टक्केवारी आहे. वस्तुस्थिती व नेमकी परिस्थिती काय आहे? याविषयी आपण व्यावहारिक असले पाहिजे. त्यामुळे निवडणुकीनंतर भाजप राज्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास येईल. तिन्ही पक्षांच्या मतांचे एकत्रीकरणच आम्हाला निवडणुकीत विजयी करू शकेल.

फडणवीस यांनी जागावाटपाच्या चर्चेतील नेत्यांची नाराजी व बंडखोरीवरही भाष्य केले. जागावाटपाच्या मुद्यावर कुणीही तडजोड करण्यास तयार नाही. त्यामुळे या वेळी ज्या नेत्यांना निवडणूक लढवण्याची संधी देता आली नाही, त्या आमच्या काही महत्त्वकांक्षी नेत्यांसाठी मला वाईट वाटते. फडणवीस यांनी या वेळी विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीचेच सरकार सत्तेत येणार असल्याचा दावाही केला. तसेच लोकसभा निवडणुकीतील निकालाचा विधानसभा निवडणुकीच्या निकालावर कोणताही परिणाम पडणार नाही असेही ठासून सांगितले.

## » Selected

### विद्यार्थिनीचा शाळेत संशयास्पद मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर जिल्ह्यातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. सिखरा येथील कस्तुरबा गांधी निवासी शाळेतील इयत्ता सहावीच्या विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. मृत्यूचे वृत्त समजताच शाळेत एकच खळबळ उडाली. एका अधिकाऱ्याने सोमवारी ही माहिती दिली. मूलभूत शिक्षण अधिकारी संदीप कुमार यांनी सांगितले, की या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वर्तिका अजय कुमार असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे.

### माजी आमदाराकडून पत्रकाराचा विनयभंग


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकात्ता :** भारतीय कम्युनिस्ट पार्टी (एम) नेते आणि माजी आमदार तन्मय भट्टाचार्य यांच्याविरोधात महिला पत्रकाराचा विनयभंग केल्याप्रकरणी कोलकाता येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पत्रकाराने फेसबुकवर गंभीर आरोप केले आहेत. माजी आमदाराने अश्लील हावभाव केल्याचे महिला पत्रकाराने म्हटले होते. तन्मयने तिचा हात धरून तिला अयोग्य स्पर्श केला. तिच्या मांडीवर बसले. त्यांची मुलाखत घेण्यासाठी ती घरी गेली होती.

### अपक्ष भुजबळांना महायुतीचा पाठिंबा?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** राज्याचे लक्ष लागलेल्या नांदगाव मतदारसंघात आज माजी खासदार समीर भुजबळ यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत नांदगाव शहरातून रॅली काढली. भयमुक्त नांदगाव, विकसित नांदगाव ही संकल्पना घेवून माझी उमेदवारी असल्याचे समीर भुजबळ यांनी सांगितले. या रॅलीत राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट ) पदाधिकारी, समता परिषद कार्यकर्ते मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले आहेत.



समीर भुजबळ यांच्या भूमिकेबाबत छगन भुजबळ म्हणाले, आज त्यांच्या रॅलीत जेवढी गर्दी आहे, तेवढीच मतांच्या मतपेटीत तुम्हाला पाहायला मिळेल.

### माजी मंत्री अहमद 'वंचित'चे उमेदवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** काँग्रेसचे माजी मंत्री अनिस अहमद यांनी आज मुंबईत 'वंचित' मध्ये प्रवेश केला. मुंबई येथील राजगृह येथे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत त्यांनी प्रवेश केला. मध्य नागपूर मतदारसंघातून त्यांना उमेदवारी देण्यात येणार आहे. एक प्रकारे नाराज हलबा आणि मुस्लिम समाज यात भाजपचा फायदा तर काँग्रेसचे कोंडी होणार असल्याचे दिसत आहे. अहमद यांनी यापूर्वी नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. भाजपने विधानपरिषद सदस्य माजी महापौर प्रवीण दटके यांना उमेदवारी दिली आहे, तर काँग्रेसने माजी नगरसेवक बंटी शेळके यांना उमेदवारी दिली आहे.



# वक्फ दुरुस्ती बैठकीवर विरोधकांचा बहिष्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** वक्फ दुरुस्ती विधेयकावर आज संसद भवन परिसरात संयुक्त संसदीय समितीची बैठक सुरू आहे. या बैठकीतून विरोधी पक्षांचे अनेक सदस्य बाहेर आले आहेत. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभात्याग केला. दिल्ली वक्फ बोर्डाच्या 'सीईओं'च्या अहवालावर विरोधी सदस्यांनी आक्षेप घेतला आहे.

या सदस्यांचे म्हणणे आहे, की दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी त्या अहवालावर संयुक्त संसदीय समितीच्या अध्यक्षांना आधीच पत्र लिहिले आहे. त्या अहवालाची दखल घेऊ नये, असे त्यांनी या पत्रात म्हटले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अहवालात वक्फ मालमत्तेबाबत विविध अनियमितता नमूद करण्यात आल्या आहेत. हरियाणा, दिल्ली, पंजाब आणि उत्तराखंडमधील वक्फ बोर्डाशी संबंधित प्रतिनिधींनी तोंडी पुरावे आणि सूचना संयुक्त संसदीय समितीसमोर सादर करायच्या आहेत. आतिशी यांनी हा अहवाल अवैध ठरवला. त्यांनी खासदार जगदंबिका पाल (वक्फ दुरुस्तीच्या संयुक्त समितीच्या अध्यक्ष) यांना पत्र लिहून आयएएस अश्विनी कुमार यांनी सादर केलेला अहवाल अवैध असल्याचे म्हटले केले.



कुमार यांनी हा अहवाल 'जीएनसीटीडी'च्या मान्यतेशिवाय समितीला सादर केला होता. यापूर्वी संयुक्त संसदीय समितीच्या बैठकीत वक्फ विधेयकाबाबत जोरदार खडाजंगी झाली होती. भाजप आणि तृणमूल काँग्रेसमध्ये हा संघर्ष झाला. यात कल्याण बॅनर्जी जखमी झाले. मिळालेल्या माहितीनुसार, खासदार कल्याण बॅनर्जी यांनी तिथे ठेवलेली काचेची पाण्याची बाटली उचलून टेबलावर फेकली. यानंतर बॅनर्जी यांना निलंबित करण्यात आले. बॅनर्जी यांनी रागाच्या भरात टेबलावर पाण्याची बाटली फेकल्याचा आरोप भाजपने केला होता. विरोधकांनी या घटनेसाठी भाजप खासदारांना जबाबदार धरले होते.

## मणिपूर असुरक्षितच..

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**इंफाळ :** मणिपूरच्या राज्यपालांच्या निवासस्थानानजीक शंभर मीटर अंतरावर हँड ग्रेनेड सापडल्याने पोलिस यंत्रणा सक्रिय झाली असून, राजभवनाभोवती बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

# नाना पटोलेंविरुद्ध भाजपचा उमेदवार अखेर ठरला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भंडारा :** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याविरुद्ध साकोली मतदारसंघातून भाजपाचा उमेदवार अखेर ठरला. भाजपमधील सर्व इच्छुकांना डावलून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातून २४ तासांपूर्वी भाजपमध्ये सामील झालेले अविनाश ब्राह्मणकर यांना भाजपने उमेदवारी दिली आहे. आतापर्यंत भाजपच्या दोन याद्यांमध्ये १२२ उमेदवार जाहीर करण्यात आले, काल (सोमवारी) भाजपची तिसरी यादी जाहीर झाली, यामध्ये २५ उमेदवार जाहीर करण्यात आले.



भाजपच्या पहिल्या दोन याद्यांमध्ये साकोली विधानसभा मतदारसंघाचा समावेश नव्हता. त्यामुळे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याविरुद्ध भाजपचा उमेदवार कोण ?, अशा चर्चा दिल्लीपासून गल्लीपर्यंत होत्या. अखेर भाजपने यावर निर्णय घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी प्रदेश सचिव तथा जि. प. सदस्य अविनाश ब्राम्हणकर यांना उमेदवारी दिली आहे. तिसऱ्या यादीत याची औपचारिक घोषणा करण्यात आली आहे.

# भाजपने नाकारली तीन आमदारांना उमेदवारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने तिसरी यादी जाहीर केली आहे. पहिली यादी ९९ उमेदवारांची, दुसरी यादी २२ उमेदवारांची होती. यापाठोपाठ भाजपने आज तिसरी यादी २५ उमेदवारांची जाहीर केली आहे. आता महायुतीमध्ये भारतीय जनता पक्षाकडून १४६ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे मोर्शी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून देवेंद्र भुयार यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आता भाजपनेही या मतदारसंघातून यावलकर यांना उमेदवारी दिली आहे.

भाजपने आज जाहीर केलेल्या उमेदवार यादीमध्ये तीन विद्यमान आमदारांची तिकिटे कापल्याचे दिसून येत आहे. त्यात आर्णीतून संदीप दुर्वे यांच्याऐवजी राजू तोडसाम यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नागपूर मध्यमधून विकास कुंभारे यांच्याऐवजी प्रवीण दटके यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. आर्वीतून दादाराव केचे यांच्याऐवजी सुमीर वानखेडे यांना तिकीट देण्यात आले आहे.

# प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीबाबत रेल्वेचा मोठा निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईतील वांद्रे टर्मिनस येथे झालेल्या चेंगराचेंगरीत नऊ प्रवासी जखमी झाले आहेत. यातील २ जणांची प्रकृती गंभीर आहे. यूपीतील गोरखपूरला जाणाऱ्या ट्रेनमध्ये प्रवाशी चढण्याचा प्रयत्न करत असताना हा अपघात झाला. या दुर्घटनेनंतर सणासुदीच्या काळात प्लॅटफॉर्मवर होणारी गर्दी पाहता मध्य रेल्वेने मोठा निर्णय घेतला आहे. मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस, ठाणे, कल्याण, पुणे, नागपूर सह निवडक प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर बंदी घातली आहे. प्लॅटफॉर्मवरील गर्दीवर नियंत्रण ठेवणे आणि स्थानक परिसरात



प्रवाशांची वाहतूक सुरळीत व्हावी, यासाठी हा निर्णय घेतल्याचे मध्य रेल्वेने म्हटले आहे. दिवाळी आणि छठपूजे दरम्यान प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवरील बंदी ८ नोव्हेंबरपर्यंत तात्काळ लागू होणार आहे. याशिवाय ज्येष्ठ नागरिक आणि वैद्यकीय गरजा असलेल्या लोकांना या निर्बंधांमधून सूट देण्यात आली आहे. मुंबईतील वांद्रे रेल्वे स्थानकावर गोरखपूरला जाणाऱ्या ट्रेनमध्ये चढण्यासाठी झालेल्या झटापटीनंतर झालेल्या चेंगराचेंगरीत नऊ जण जखमी झाले आहेत.

आगामी दिवाळी आणि छठ सणासाठी आपापल्या घरी परतण्यासाठी वांद्रे टर्मिनलवर मोठ्या संख्येने लोकांनी गर्दी केली होती. अनारक्षित गाडी प्लॅटफॉर्मवर आणली जात असताना अनेक प्रवाशांनी त्यात चढण्यासाठी धाव घेतली. २२९२१ वांद्रे-गोरखपूर अंत्योदय एक्स्प्रेसमध्ये चढण्यासाठी वांद्रे टर्मिनलच्या प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर मोठ्या संख्येने लोक असताना ही घटना घडली.

## 'वन चायना' धोरणाला हरताळ

# चीनची अमेरिकेमुळे वाढली चिंता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**न्यूयार्कः :** अमेरिकन सरकारच्या एका हालचालीने चीनची चिंता वाढली आहे. अमेरिकेने तैवानसाठी दोन अब्ज डॉलर शस्त्रास्त्र विक्री पॅकेज मंजूर केले. त्यात आशिया पॅसिफिक प्रदेशात चीनच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याचा सामना करण्यासाठी पृष्ठभागावरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र प्रणाली आणि रडारचा समावेश आहे.

चीन आणि अमेरिका एकमेकांविरुद्ध धोरणात्मक निर्णय घेण्यात कधीच कमी पडत नाहीत. अमेरिकेचे दोन सर्वात मोठे शत्रू रशिया आणि इराण यांच्याशी चीन जवळीक वाढवत असताना गेल्या काही वर्षांत अमेरिकेनेही तैवानला पाठिंबा देऊन चीनला चिडवण्यात कोणतीही कसर सोडली नाही. चीन तैवानला आपला भाग मानतो



आणि तैवानशी राजनैतिक किंवा कोणत्याही प्रकारचे संबंध प्रस्थापित करण्याचा कोणताही देश त्याच्या सार्वभौमत्वावर हल्ला मानतो. काही दिवसांपूर्वीच चिनी सैन्याने तैवानला वेढा घातला आणि लष्करी कवायती केल्या. बीजिंगचे हे पाऊल तैवान सरकार आणि त्यांच्या समर्थकांसाठी इशारा म्हणून पाहिले जात होते. या कराराला अद्याप अमेरिकन काँग्रेसने मंजुरी दिली नसली, तरी काँग्रेस लवकरच याला मंजुरी देऊ शकते, असे मानले जात आहे. ही शस्त्रे अमेरिकन हवाई दलाकडून तैवानला पुरवली जाणार आहेत. तैवानला अमेरिकन शस्त्रास्त्रे विकल्याबद्दल चीनने बायडेन प्रशासनावर टीका केली आहे.

तैवानवर आपले सार्वभौमत्व असल्याचा दावा करत चीनने अमेरिकेच्या या प्रयत्नांविरुद्ध 'सर्व आवश्यक उपाययोजना' करण्याचा इशारा दिला आहे. तैपेईच्या संरक्षण मंत्रालयाने या कराराबद्दल अमेरिकेचे आभार व्यक्त करताना म्हटले आहे, की यामुळे लष्कराला सतत सैन्य शक्ती वाढवण्यास मदत होईल आणि तैवान सामुद्रधुनी आणि प्रादेशिक स्थिरता राखण्यासाठी संयुक्त प्रयत्नांना बळ मिळेल. तैवानला दिलेले नवीनतम शस्त्र पॅकेज 'चीनच्या सार्वभौमत्व आणि सुरक्षा हितांचे गंभीरपणे उल्लंघन करते, चीन-अमेरिका संबंधांना तसेच प्रादेशिक शांतता आणि सुरक्षेला धोका निर्माण करते,' असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने म्हटले आहे. चीनने अमेरिकेच्या या कृतीचा तीव्र निषेध केला आहे.

### तैवानच्या स्वातंत्र्याचे समर्थन

- अमेरिका आणि तैवानमध्ये कोणत्याही प्रकारचे राजनैतिक संबंध नाहीत; परंतु अमेरिका चीनच्या विरोधात तैपेईला सतत पाठिंबा देत आहे. तैवानला मिळत असलेल्या आंतरराष्ट्रीय पाठिंब्यावर नाराजी व्यक्त करत चीनने वॉशिंग्टनवर अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप केल्याचा आरोप केला आहे. चीनचे म्हणणे आहे, की अमेरिका आपल्या 'एक चीन' धोरणापासून मागे हटत आहे, ज्या अंतर्गत वॉशिंग्टन तैवानच्या स्वातंत्र्याला उघडपणे समर्थन देत नाही.

#रा



"विराट कोहली सध्या संघर्ष करतोय आणि ही मालिका त्याच्यासाठी चांगली राहिलेली नाही. चारपैकी तीन डावांमध्ये त्याने निराश केले. फिरकीपटूंनी त्याला त्रास दिला आहे आणि मला वाटते की त्याने याचा विचार करायला हवा आणि त्यावर काम करायला हवं. — दिनेश कार्तिक

"ती पुन्हा म्हणाली, 'तुम्ही बघा, ते त्याला परत बोलावतील. वाईड बॉलवर तुम्ही स्टम्प होऊ शकत नाही'. मी म्हणालो की वाइड बॉलवर फलंदाज स्टम्प आऊट होतो, ते नो-बॉलवर करता येत नाही. तेव्हा ती लगेच म्हणाली, 'तुला काहीच माहीत नाही. तुम्ही फक्त थांबा, पंच त्याला परत बोलवतील'. — एम.एस.धोनी



# पश्चिम बंगाल संघाला विजेतेपद

## एस.पी.जी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४ दिव्यांग क्रिकेट स्पर्धा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** दिव्यांग क्रिकेट असोसिएशन पुणे जिल्हा यांच्यावतीने आयोजित व ऑल इंडिया क्रिकेट असोसिएशन फॉर फिजिकली चॅलेंज्ड,इंडिया या संस्थेच्या मान्यतेने होत असलेल्या दिव्यांग क्रिकेट खेळाडूंच्या तिरंगी एस.पी.जी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४ स्पर्धेत अंतिम फेरीत तपन बैरागी(३-१०) व २१धावा) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर पश्चिम बंगाल दिव्यांग क्रिकेट संघटना संघाने महाराष्ट्र संघाचा 8गडी राखून पराभव करत विजेतेपद संपादन केले. तर, महाराष्ट्र संघाने उप विजेतेपद पटकावले.

आर एस खांदवे स्पोर्ट्स ग्राउंड येथे पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम सामन्यात पश्चिम बंगाल दिव्यांग क्रिकेट संघटनेच्या तपन बैरागी(३-१०), सुमन डे(३-३०), पूर्णब ओरो(१-८) यांच्या भेदक माऱ्यापुढे महाराष्ट्र संघाचा डाव १८.५षटकात सर्वबाद ९३ धावावर कोसळला. यात सोमनाथ नलावडे ३२, नयन शिंदे २१, आश्विन शिंदे ११ यांनी थोडासा प्रतिकार केला.

हे आव्हान पश्चिम बंगाल दिव्यांग क्रिकेट संघटना संघाने १४.३षटकात २बाद ९४धावा करून पूर्ण केले. यात समरेश बिस्वासने २७ चेंडूत ४चौकार व १ षटकारासह नाबाद ३७, सुकुमारने ४२चेंडूत २चौकाराच्या मदतीने नाबाद २९, तपन बैरागीने २१ धावा काढून संघाला विजय मिळवून दिला.

स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण माजी भारतीय खेळाडू व एआयसीएपीसी संस्थेचे अध्यक्ष श्री कर्सन घावरीसर,उपाध्यक्ष श्री अनिल जोगळेकर,श्री विनोद देशपांडे सर यांच्या हस्ते तसेच कार्यवाह ब्रिजेश सोलकर, सचिव शिवानंद गुंजाळ,दिनेश सेन,अभिजीत बिश्वास,या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखात पार पडला.

सदर स्पर्धेचे आयोजन दिव्यांग क्रिकेट असोसिएशन पुणे जिल्हा या दिव्यांग मुलांच्या हितासाठी महाराष्ट्रात अग्रक्रमाने काम करणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून नियोजन करण्यात आले संस्थेचे सचिव श्री राजू मुजावर माजी भारतीय दिव्यांग खेळाडू आणि संस्थेचे कार्याध्यक्ष श्री शरद सावंत यांच्या अथक प्रयत्नातून ही स्पर्धा अतिशय सुंदर पद्धतीने संपन्न झाली.

## जयपूर-तमिळ यांच्यात बरोबरी,

# तर युपीचा गुजरातवर दणदणीत विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** जयपूर पिंक पँथर्स-तमीळ थलैवाज यांच्यामधील प्रो कबड्डी लीगमधील लढतीत ३०-३० अशी बरोबरी झाली. तसेच रविवारी झालेल्या अन्य लढतीत यूपी योद्धास संघाने गुजरात जायंट्स संघावर ३५-२९ असा विजय साकारला.

जयपूर - तमीळ यांच्यामध्ये अटीतटीची लढाई रंगली. पूर्वार्धात जयपूर संघाकडे २१-१६ अशी आघाडी होती. उत्तरार्धात मात्र तमीळ संघाने झोकात पुनरागमन केले. या सत्रात तमीळ संघाने १४ गुणांची, तर जयपूर संघाने फक्त नऊ गुणांची कमाई केली.

जयपूरकडून अर्जुन देशवालने सात गुणांची, तर विकास कंडोलाने सहा गुणांची कमाई केली. तमीळ संघासाठी सचिन या चढाईपटूने उल्लेखनीय कामगिरी केली. त्याने ११ गुणांची कमाई करीत संघाला बरोबरी साधून दिली.

यूपी योद्धास संघाच्या गुजरात जायंट्सवरील विजयात भारत चमकला. त्याने अष्टपैलू खेळ करीत १३ गुणांची कमाई करतानाच यूपीला दिमाखदार विजय मिळवून दिला. गुजरातकडून हिमांशू सिंग व राकेश यांनी प्रभावी खेळ केला. मात्र त्यांना काही विजय साकारता आला नाही.


# सोलापूर, रत्नागिरी, नाशिकच्या दोन्ही संघाची विजयी सलामी



**पुणे :** सोलापूर, रत्नागिरी व नाशिक या संघाच्या कुमार व मुली संघाने सुवर्ण महोत्सवी ५० वी कुमार व मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेची विजयी सलामी दिली. महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व उस्मानाबाद जिल्हा खो खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा ३० ऑक्टोबरपर्यंत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर आयोजित केली आहे. रविवारी सुरू झालेल्या या स्पर्धेत सलामीच्या दिवशी सकाळच्या सत्रात सर्व सामने एकतर्फी झाले. सोलापूरच्या मुलांनी जालन्यावर २१-८ व मुलींनी बीडवर १७-५ असा एक डाव राखून दणदणीत विजय मिळविला. रत्नागिरीच्या मुलांनी लातूरचा १७-७ व मुलींनी नांदेडचा १९-६ असा एक डावाने धुव्वा उडवला. नाशिकच्या मुलांनी हिंगोलीला २६-४ तर मुलींनी नंदुरबारला २०-४ असे एका डावाने नमवले. मुलींच्या गटात धाराशिव, जालना व मुलांच्या गटात सांगली, बीड यांनीही प्रतिस्पर्धी संघावर शानदार विजय मिळविले.

# भाऊ कोकणे, फ्रेन्ड्स क्रिकेट संघांची विजयी कामगिरी !


**पुणे :** स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंट तर्फे पहिल्या 'लीग ऑफ लिजंड्स करंडक' (४० वर्षावरील गट) १०० चेंडू क्रिकेट स्पर्धेचे भाऊ कोकणे क्लब आणि





फ्रेन्ड्स क्रिकेट क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी कामगिरी केली. दापोली येथील रॉयल गोल्डफिल्ड क्लब मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत महेंद्र जगताप याने केलेल्या कामगिरीच्या जोरावर फ्रेन्ड्स क्रिकेट क्लबने रायगड वॉरीयर्सचा ५ गडी राखून पराभव करून सलग दुसरा विजय मिळवला. पहिल्यांदा फलंदाजी करताना रायगड वॉरीयर्सने ९० चेंडूत ९९ धावांचे आव्हान उभे केले. यामध्ये अमोद दिवेकर (२७ धावा) आणि विनोद भोईर (१८ धावा) यांनी संघाचा डाव सावरला. या आव्हानाला उत्तर देताना फ्रेन्ड्स क्रिकेट क्लबने ८१ चेंडूत आणि ५ गडी राखून १०३ धावा केल्या. महेंद्र जगताप याने ३२ धावा, सचिन जयवंत याने ३१ धावा आणि भुषण देशपांडे याने नाबाद १९ धावा करून संघाला विजय मिळवून दिला. दुसऱ्या सामन्यामध्ये संभाजी शिंदे याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे भाऊ कोकणे क्लबने रेवेल विनर्सचा २ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या रेवेल विनर्सला ९० चेंडूत ९६ धावा जमविता आल्या.

# भारताच्या चिरागनं गाजवला आखाडा ! सुवर्णपदक जिंकले



**नवी दिल्ली :** भारताचा १८ वर्षीय कुस्तीपटू चिराग चिगक्काने मोठा पराक्रम केला आहे. त्याने २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. चिरागने मुलांच्या फ्री स्टाईल ५७ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकण्याचा कारनामा केला आहे. अल्बेनियातील तिराना येथे झालेल्या या स्पर्धेत अंतिम सामन्यात चिरागने किर्गिस्तानच्या अब्दिमालिक काराचावचा ४-३ अशा फरकाने पराभव केला आणि सुवर्णपदकाला गवसणी घातली. तो २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा भारताचा दुसराच पुरुष कुस्तीपटू ठरला आहे. यापूर्वी २३ वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत सर्वात पहिल्यांदा सुवर्णपदक २०२२ साली अमन सेहरावतने जिंकले होते. त्याच्यानंतर आता चिरागनेही सुवर्णपदक जिंकले.

## महाराष्ट्राला आघाडी घेण्याची संधी

# पदार्पणाच्या लढतीत हर्षलचा शतकी धमाका!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** राष्ट्रसंचार पहिल्या दोन लढतींत अवघ्या एका गुणाची कमाई करणाऱ्या महाराष्ट्राच्या क्रिकेट संघाने मेघालय संघाविरुद्धच्या रणजी क्रिकेट करंडकातील अ गटातील लढतीत दुसऱ्या दिवसअखेरीस पाच बाद २६३ धावा फटकावल्या.

पहिलाच रणजी सामना खेळत असलेल्या हर्षल काटे याने नाबाद ११७ धावांची खेळी साकारत दिवस गाजवला. त्याने या खेळीमध्ये १६ चौकारांचा पाऊस पाडला. मेघालय संघाने पहिल्या डावात २७६ धावा केल्या असून आता महाराष्ट्राचा संघ फक्त १३ धावांनी पिछाडीवर आहे.

मेघालय संघाने आठ बाद २७४ या धावसंख्येवरून पुढे खेळायला सुरुवात केली, मात्र त्यांचा डाव २७६ धावांवरच आटोपला. बालचंदर अनिरुद्धने १४२ धावांची खेळी साकारली. महाराष्ट्राकडून मुकेश चौधरीने ८८ धावा देत चार फलंदाजांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. रजनीश गुरबानीने ४४ धावा देत तीन फलंदाज बाद केले. महाराष्ट्राच्या डावाची अडखळती सुरुवात झाली.

## हर्षित राणाने दाखवली ताकद!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताचा २२ वर्षीय वेगवान गोलंदाज हर्षित राणाला आगामी ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय संघात संधी मिळाली आहे. या दौऱ्यात भारतीय संघाला बॉर्डर-गावसकर ट्रॉफी ही ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. या बहुप्रतिक्षित मालिकेसाठी काही दिवसांपूर्वीच भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघात हर्षित राणाचीही निवड झाली असल्याने आता त्याला कसोटी क्रिकेटमध्येही पदार्पणाची संधी मिळू शकते.

दरम्यान, त्याच्याकडे प्रथम श्रेणीचा कमी अनुभव असल्याने त्याच्या निवडीवर अनेकांनी शंका घेतली होती. मात्र नुकतेच रणजी ट्रॉफीमध्ये अष्टपैलू कामगिरी करत त्याने टीकाकारांना सध्यातरी चोख उत्तर दिले आहे.

# डेक्कन जिमखाना क्रिकेट लीग २०२४ स्पर्धेत वुल्व्हस संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** डेक्कन जिमखाना क्लबच्या वतीने आयोजित नहुश जाधव पुरस्कृत अनिल जी.रानडे मेमोरियल डेक्कन जिमखाना क्रिकेट लीग २०२४ स्पर्धेत अंतिम फेरीत नहूश जाधवच्या नाबाद ४८ धावांच्या खेळीच्या जोरावर वुल्व्हस संघाने शार्क्स संघाचा पराभव करून विजेतेपद संपादन केले.

डेक्कन जिमखानाच्या मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत प्रथम फलंदाजी करताना शार्क्स संघाने ७षटकात ५बाद ६६धावा केल्या. यात प्रसाद जाधव १९, अंकुश जाधव १८, पराग चोपडा १६ यांनी धावा केल्या. वुल्व्हसकडून प्रतीक वैद्य(२-१६), आनंद परचुरे(१-११), ऋषभ गादिया(१-७) यांनी सुरेख गोलंदाजी करत शार्क्स संघाला ६६ धावांवर रोखले.

हे आव्हान वुल्व्हस संघाने ६षटकात १बाद ६७धावा करून पूर्ण केले. यात नहूश जाधवने २०चेंडूत ४चौकार व ३ षटकारासह नाबाद ४८धावा काढून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. त्याला प्रतीक वैद्यने नाबाद 11 धावा काढून साथ दिली. सामनावीर - नहुश जाधव; वुल्व्हस संघ 8 गडी राखून विजयी;

स्पर्धेतील विजेत्या वुल्व्हस संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण श्रीकांत जाधव, कोटक बँकेचे ओंकार जलादी, मुकाईवाडीचे सुनिलकुमार देशमुख, क्षितिज जोशी, ९टू९ ऑटोकेअर कुणाल मोहिते, अभिनेत्री शिल्पा तोळसकर यांच्या हस्ते करण्यात आले.

## 'थाला फॉर अ रीजन' म्हणजे काय?


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जेव्हा एमएस धोनीला एका प्रमोशनल इव्हेंटमध्ये 'थाला फॉर अ रीजन' म्हणजे काय? याबद्दल प्रश्न विचारण्यात आला तेव्हा त्याने उत्तर दिले की, ते कुठून आले हे मला माहित नाही, कश्यासाठी बोलतात ही कारण देखील माहित नाही.

मला असे वाटते की हे मला माझ्या चाहत्यांनी दिले आहे आणि मी निश्चितपणे म्हणू शकतो की माझे चाहते अद्भुत आहेत. आयपीएलचा पहिला सीझन २००८ मध्ये खेळला गेला होता, त्यानंतर धोनी चेन्नई सुपर किंग्जचा खूप महत्त्वाचा भाग होता.

# गॅरी कर्स्टनचा राजीनामा अन पाकिस्तानला लगेच नवा प्रशिक्षक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** पाकिस्तान क्रिकेटमध्ये गेल्या काही दिवसांपासून मोठे बदल पाहायला मिळत आहेत. नुकतेच रविवारी (२७ ऑक्टोबर) पाकिस्तानने नव्या वनडे आणि टी२० कर्णधाराची घोषणा केली होती. मोहम्मद रिझवानकडे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने ही जबाबदारी सोपवली आहे.

पाकिस्तानला पुढील महिन्यात ऑस्ट्रेलिया आणि झिम्बाब्वे दौऱ्यावर जायचे असून दोन्ही दौऱ्यामध्ये वनडे आणि टी२० मालिका खेळायची आहे. मात्र या दौऱ्यांपूर्वीच पाकिस्तान संघासाठी मोठा बदल झाला आहे.

गॅरी कर्स्टर्न यांनी पाकिस्तान्या वनडे आणि टी२० संघाचे प्रशिक्षकपद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी सहा महिन्यांच्या आतच प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला आहे. कर्स्टन यांना एप्रिल २०२४ च्या अखेरीस वनडे आणि टी२० संघाचा प्रशिक्षक म्हणून नियुक्त केले होते.

# यादवच्या कॅचने चाहत्यांच्या डोळ्यांचे फेडले पारणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय महिला क्रिकेट संघ आणि न्यूझीलंड महिला क्रिकेट संघ यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळली जात आहे. या मालिकेसाठी न्यूझीलंडचा संघ भारत दौऱ्यावर आहे. त्याचबरोबर पाहुण्या संघाने सलग पहिले दोन सामने जिंकून मालिका जिंतच २-० अशी अभेद्य आघाडी घेतली. दुसरा एकदिवसीय सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. ज्यामध्ये न्यूझीलंडने भारताचा ७६ धावांनी पराभव केला. दरम्यान या सामन्यात भारताच्या राधा यादवने उत्कृष्ट झेल घेतला, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

भारतीय महिला क्रिकेट संघाने जरी हा सामना हरला असला, तरी पण संघाची स्टार खेळाडू राधा यादवने या सामन्यात आपल्या अष्टपैलू कामगिरीची छाप सोडली. तिने गोलंदाजी आणि फलंदाजीत कमाल केली. उल्लेखणीय म्हणजे राधाने या सामन्यात दोन उत्कृष्ट झेल टिपले. विशेष म्हणजे त्यातील एक झेल खूपच खास होता. जो तिने हवेत उडत अप्रतिम झेल टिपला, त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

# 'कागज के शेर घर में हुए ढेर...',

**नवी दिल्ली :** न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारताला ६९ वर्षांत पहिल्यांदा कसोटी मालिका गमवावी लागली. ज्यामुळे रोहित शर्माच्या संघाला माजी क्रिकेटपटूंसह चाहत्यांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. पुणे कसोटी सामन्यात भारताने न्यूझीलंडच्या मिचेल सँटनरच्या फिरकीसमोर सपशेल शरणागती पत्करली. आता पाकिस्तानच्या माजी खेळाडूने भारताच्या पराभवाची खिल्ली उडवली आहे. त्याने भारताच्या खेळाडूंना 'कागज के शेर' असे संबोधले आहे. भारतीय संघ आता एक नोव्हेंबरपासून मुंबईत होणाऱ्या तिसऱ्या कसोटी सामन्यात क्लीन स्वीपपासून वाचण्याचा प्रयत्न करेल. भारताने गेल्या १२ वर्षांत घरच्या मैदानावर एकूण १८ मालिका जिंकल्या आहेत.

# दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी लक्ष्मण भारतीय संघाचे कोच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** भारताचा माजी क्रिकेटपटू व्हीव्हीएस लक्ष्मण याची दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी टीम इंडियाच्या प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांना ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जायचे आहे. अशा स्थितीत लक्ष्मणला पांढऱ्या चेंडूच्या संघाचे प्रशिक्षक बनवण्यात आले आहे.

लक्ष्मणला करण्यात आल्याचा दावा क्रिकेट वेबसाइट क्रिकबाजने केला आहे, मात्र बीसीसीआयने याला दुजोरा दिलेला नाही. भारतीय संघाला पुढील महिन्यात दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर जायचे आहे. ही मालिका ८ नोव्हेंबरपासून खेळवली जाणार आहे. लक्ष्मण यांच्यासोबत राष्ट्रीय क्रिकेट अकादमीशी संबंधित साईराज बहुतुले, हृषिकेश कानिटकर आणि सुभदीप घोष हे स्पोर्टिंग स्टाफ म्हणून जाणार आहेत.

## विराटवर टांगती तलवार, जडेजा-बुमराहही आऊट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या दोन कसोटी सामन्यातील पराभवानंतर कर्णधार रोहित शर्मा तिसऱ्या कसोटीत अनेक बदल करू शकतो. खराब फॉर्ममध्ये झगडत असलेल्या विराट कोहलीची हकालपट्टी करण्याची मागणीही चाहते करत आहेत. तसे, काही खेळाडूंना तिसऱ्या कसोटीतही विश्रांती मिळू शकते. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह यात प्रमुख आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसरा कसोटी सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे.

## इमर्जिंग आशिया कपमध्ये श्रीलंकेचा पराभव

# अफगाणिस्तान संघाने पहिली आयसीसी स्पर्धा जिंकली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** अफगाणिस्तान-अ संघाने प्रथमच इमर्जिंग आशिया कपचे विजेतेपद पटकावले आहे. रविवारी अल अमिराती स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात संघाने श्रीलंका-अ संघाचा ७ गडी राखून पराभव केला. अफगाणिस्तान क्रिकेटसाठी हा ऐतिहासिक विजय आहे. क्रिकेटच्या कोणत्याही फॉरमॅट किंवा वयोगटातील स्पर्धेतील हे संघाचे पहिले विजेतेपद आहे.

अफगाणिस्तान-अ संघाने २०१७ आणि २०१९ मध्ये उपांत्य फेरी गाठली होती. यावेळी त्याने प्रथमच अंतिम फेरी गाठली आणि विजेतेपदही पटकावले.

या सामन्यात श्रीलंकेचा कर्णधार नुवानिडू फर्नांडोने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अफगाणिस्तानविरुद्ध प्रथम खेळताना श्रीलंकेने २० षटकांत ७ बाद १३३ धावा केल्या आणि अफगाणिस्तान संघाला विजयासाठी १३४ धावांचे लक्ष्य दिले. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानने १८.१ षटकांत ३ गडी गमावून लक्ष्य गाठले.

अफगाणिस्तानकडून सेदिकुल्ला अटलने अर्धशतक झळकावले. या स्पर्धेतील पाचही सामन्यांमध्ये त्याने अर्धशतके झळकावली. अफगाणिस्तानकडून सेदिकुल्लाह अटलने नाबाद ५५ धावा केल्या. करीम जनातने ३३ धावांची खेळी केली. मोहम्मद इशाकने नाबाद १६ धावा केल्या. सहान अरचिगे, दुशान हेमंथा आणि इशान मलिंगाला प्रत्येकी १ बळी मिळाला. श्रीलंका अ संघाची सुरुवात खूपच खराब झाली आणि अवघ्या १५ धावांवर या संघाच्या ४ विकेट पडल्या. येथून सहान अरचिगेने संघासाठी महत्त्वपूर्ण खेळी केली.

#रा